|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ८ | अंक : ४१ | सोमवार दि. २८ सप्टेंबर २०२० ते रविवार दि. ४ ऑक्टोंबर २०२० | पाने : ८ | किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

# लॉकडाऊनमुळे कामधंदा गेल्याने नशिबच फुटले
# मजबूर पतीने पत्नीला मित्राच्या बिछान्यावर लोटले

जळगाव/क्राईम रिपोर्टर

अग्नी भोवती सात फेरे घेऊन बांधलेली लग्नगाठ संसारात पती पत्नीच्या नात्याला घट्ट बांधून ठेवते. त्यामुळे या नात्याचा दोगानीही आदर करायचा असतो. संसारात एकमेकांना सांभाळून घ्यायचं असतं आणि सर्वात म्हत्वाच म्हणजे एकमेकांवरील विश्वासाला कधीही तडा जाणार नाही याची काळजी घ्यायची असते. पत्नीच्या शरीरावर फक्त आणि फक्त पतीचाच अधिकार असतो. अशावेळी जर पतीने स्वतःच्या स्वार्थासाठी आपल्या पत्नीला दुसऱ्याच्या बिछान्यावर ढकलण्याचे पाप केले, तर त्या पत्नीची काय अवस्था होईल याची कल्पनाही करवत नाही. मात्र कोरोनाच्या संकट काळातील लॉकडाऊनमध्ये काही मजबूर तर काही व्यसनी लोकांनी पैशासाठी चक्क आपल्या बायकोचा सौदा केला. सगळ्यात संतापाची गोष्ट म्हणजे लॉकडाऊनमध्ये काम धंदा गमावून बसलेल्या लोकांचा त्यांच्या मित्रांनीच गैरफायदा घेतला आणि काहींना आर्थिक मदत करून तर काहींना दारू मटक्याचे व्यासन लावून त्यांच्या बायकांवर वाईट नजर ठेवली आणि त्यांच्या मजबुरीचा फायदा घेऊन त्यांचा बळजबरीने उपभोग घेतला. अत्यंत वेदनादायी अशा या घटना आहेत. जळगावमध्ये एका टेलरच्या बाबतीत असेच घडले. लॉकडाऊनमध्ये धंदा बंद झाल्याने पोटापाण्यासाठी त्याला स्थलांतर करावे लागले. यावेळी त्याच्या मदतीला धावलेल्या त्याच्या मित्रानेच त्याला व्यसनी बनवून त्याच्या पत्नीला आपल्या बिछान्यात ओढले आणि तेही तिच्या पतीच्या मदतीने. या प्रकरणी त्या महिलेच्या फिर्यादीवरून पोलिसांनी तिच्या पतीला व त्याच्या मित्राला अटक केली आहे.











सागर आणि सायली (दोन्ही नावे काल्पनिक) हे पती पत्नी होते. दोघांचा संसार सुखाने सुरु होता. धुळे येथील माहेरवाशीन असलेली सायली लग्नानंतर पतीसोबत जळगाव येथे सासरी आली. सायलीचा पती टेलरींग काम करत होता. जळगाव शहरातील फुले मार्केट परिसरात शिलाई मशीन लावून आलेल्या ग्राहकांचे शिलाईचे किरकोळ कामे तो करत असे. शिलाईच्या किरकोळ कामातून त्याला चांगले उत्पन्न मिळत होते. शिलाई कामातून मिळणाऱ्या उत्पन्नावर त्याचा संसार सुखाने सुरु होता....पान २ वर

# बंगल्याचा वाद प्राणावर बेतला
# भावानेच भावाचा जीव घेतला

ठाणे/क्राईम रिपोर्टर



मयत राकेश

आजकाल प्रत्येक माणूस पैशाच्या मागे धावतोय आणि हाच पैसा माणसाला रक्ताची नातीगोती दोस्ती यारी प्रेम नितीमत्ता सारे काही विसरायला लावतो. त्यामुळेच धनसंपत्तीच्या वादातून रक्ताच्या नात्यातली माणसेच एकमेकांच्या जीवावर उठतात. त्यातून आपल्याच माणसांचे मुडदे पाडतात आणि स्वतःचेही आयुष्य बरबाद करून घेतात. ठाण्यातील घोडबंदर येथे घडलेल्या अशाच एका घटनेत शिवसेना नगरसेवकाच्या मुलाने केवळ बंगल्याच्या वाटणीवरून ड्रायव्हरच्या मदतीने आपल्या सावत्र भावाची हत्या करून मृतदेह खाडीत फेकून दिला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी ड्रायव्हरला अटक केली असून नगरसेवकाचा मुलगा फरारी आहे.

ठाण्यातील शिवसेनेचे नगरसेवक माणिक पाटील यांच्या मुलाची गोळ्या झाडून हत्या करुन मृतदेह वाशीच्या खाडीत टाकण्यात आला असल्याची धक्कादायक घटना गुरुवारी उघडकीस आली. तसेच माणिक पाटील यांच्या घरातील साडेतीन किलो सोन्याचे दागिने देखील चोरीला गेले असल्याची माहिती कासारवडवली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किशोर खैरनार यांनी ही माहिती दिली. ही हत्या माणिक पाटील यांच्या सावत्र मुलगा सचिन पाटील याने संपत्तीच्या वादातून केली असल्याचा संशय वरिष्ठ पोलीस निरीक्षक किशोर खैरनार यांनी व्यक्त केला आहे. हा प्रकार माणिक पाटील यांच्या वाहन चालकाला ताब्यात घेतल्यानंतर उघडकीस आला असून मुख्य संशयित आरोपी सचिन पाटील फरार असून त्याचा कसून शोध घेण्यात येत आहे. तसेच मृतदेह शोधण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. राकेश माणिक पाटील (३४) असे हत्या करण्यात आलेल्या नगरसेवक पुत्राचे नाव आहे. ...पान २ वर

# उसन्या पैशावरून तिने शिवीगाळ केली
# प्रियकराच्या हातून अखेर प्रेयसी मेली





पनवेल/एस.कुमार

प्रेमात भलेही एकमेकांना मदत केली जात असली तरी जेंव्हा पैशाचे व्यवहार होतात तेंव्हा मात्र किती जरी निस्सीम प्रेम असले तरी पैशाच्या व्यवहारावरून त्यात वितुष्ट येते आणि अनैतिक संबंधात जेंव्हा पैशाचे व्यवहार होतात तेंव्हा तर कुणीही मागचा पुढचा विचार करीत नाही. कारण असे संबंध तकलादू असतात. ते कायम राहिले काय किंवा तुटले काय दोघांपैकी कुणालाही फारसा फरक पडत नाही. पनवेल नजीकच्या आकुर्ली गावात असेच एका उत्तर भारतीय महिलेचे मराठी तरुणाशी अनैतिक संबंध होते आणि त्याने तिच्याकडून उसने पैसे घेतले होते. पण ते पैसे तो परत करीत नसल्याने तिने त्याच्या घरी जावून त्याला शिवीगाळ केली आणि तोच राग मनात धरून त्याने आपल्या साथीदारांच्या सहाय्याने त्या महिलेची हत्त्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

मोरबे जलाशयात सापडलेल्या महिलेचा मृतदेहाची ओळख तिच्या हातातील बांगड्या आणि गोंदण यावरून ४८ तासात पटवून पनवेल तालुका पोलिसांनी आरोपींना सातारा जिल्ह्यातून अटक केले आहे. संबंधित महिलेच्या प्रियकराने आर्थिक हितसंबंधांमुळे तिची...पान २ वर

# दोन बायकांचा दादला पेचात पडला
# दुसऱ्या बायकोचा त्याने मुडदाच पाडला



मयत गिता

निपाणी/क्राईम रिपोर्टर

दोन बायका फजेती ऐका अशी जी म्हण आहे ती खरीच आहे. कारण पती पत्नीच्या संसारात जर कुणी तिसरी आली तर त्यांचा संसार पार विस्कटून जातो. कारण एकाच वेळी दोन्ही बायका पाटीवर हक्क सांगू लागतात आणि मग सवती सवतीच्या या भांडणात नवऱ्याचे अक्षरश सँडविच होते, तो गुदमरून जातो आणि मग यातून सुटका करून घेण्यासाठी त्याला त्या दोघीं पैकी एकीचा जीव घ्यावाच लागतो. गोरंबे येथील सागर शिरगावकरच्या बाबतीत असेच घडले. लग्नापूर्वीची त्याची प्रेयसी दुसरी बायको बनून जेंव्हा त्याच्या जीवनात आली तेंव्हापासून दोन बायकांच्या कचाट्यात सापडलेल्या सागरचे जिने हराम झाले होते. अखेर या त्रासातून मार्ग काढण्यासाठी त्याने दुसऱ्या बायकोचा सुपारी देवून खून केला आणि बायको बेपत्ता झाल्याची पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली. पण आरोपी किती जरी हुशार असला तरी कधीना कधी तो पोलिसांच्या तावडीत सापडतो. सागरचे सुद्धा तेच झाले. तब्बल दोन महिन्याने या हत्या प्रकरणाचा उलगडा झाला आणि मोबाईलच्या सीडीआर वरून पोलिसांनी सागरच्या मुसक्या आवळल्या.



कागल तालुक्यातील गोरंबे येथील गीताचा विवाह गेल्या पंधरा वर्षापूर्वी कोल्हापुर जिल्हयातील कोगे येथील एका तरूणाशी झाला होता. या दाम्पत्यांना कालातरांने दोन मुले ही झाली होती.ती दिसायला देखणी आणि सुंदर होती. त्याचा संसार हा चांगला सुरळीत चालला होता. तिचा नवरा ही शांत आणि समाधानी होता. पण गीता मात्र मनातून अस्वस्थ वागत होती. ती बैचेन असायची ती पंधरा दिवसातून महिन्यातून एकदा तरी आपले माहेर गोरंबे येथे येऊन राहत होती. याला कारण ही तसेच होते. लग्नाअगोदरपासून तिचे गावातीलच सागर शिरगावर या तरूणाबरोबर प्रेम संबंध होते. गेल्या पंधरा वर्षापासून त्या दोघांचे प्रेमसंबंध हे वाढीस लागलेले होते....पान २ वर

# दारुड्या मुलाने छळ केला भारी
# आईनेच दिली त्याच्या हत्येची सुपारी

सातारा/राजेंद्र वेदांते

सातारा दारुडा माणूस हा संपूर्ण कुटुंबासाठी डोकेदुःखी ठरलेला असतो. कारण त्याच्या मुळे घरात तर सतत भांडणे होताच असतात. पण बलेही त्याची भांडणे चालू असल्याने आणि त्याचा तक्रारी घरापर्यंन येत असल्याने घरातली माणसे अक्षरशः त्याला कंटाळून गेलेली असतात. त्याच्याविषयी घरातल्या लोकांमध्ये संतापाची भावना निर्माण झालेली असते आणि या संतापाचा जेंव्हा कडेलोट होतो, तेंव्हा मग अशा दारुड्या माणसाचा घरातलीच माणसे काटा काढतात. सातारा जिल्ह्यातील काळसे गावात असाच प्रकार घडला. दारू पिवून सतत आईला शिवीगाळ करणाऱ्या एका तरुणाला त्याच्या आईनेच सुपारी देवून ठार मारले. मात्र पोलिसांनी या प्रकरणाचा मोठ्या कौशल्याने पर्दाफाश करून मुलाची सुपारी देणाऱ्या आईला तिच्या दोन नातेवाईकांसह अटक केली आहे.

सातारा जिल्ह्यातल्या वळसे गावात राहणार प्रकाश कदम हा मुंबई सोडून गावी आल्यापासून दारू पिवून आईला त्रास द्यायचा. तसेच अधून मधून आठ आठ दिवस घरातून गायब व्हायचा. ऑगस्ट मधेही तो असाच गायब झाला होता. त्यामुळे तो नेहमी ...पान २ वर

# सात लाखांसाठी सराफांनी इमान विकले
# बँक मॅनेजरला ठार मारून खाडीत टाकले

रत्नागिरी/क्राईम रिपोर्टर



मयत सुनेत्रा

पैशासाठी कोण काय करील याचा नेम नाही. म्हणूनच आजकाल माणसाने कोणावरही सहजासहजी विश्वास ठेवू नये. पण काही गोष्टी विश्वासावरच चालत असल्याने त्याचाच काही लोकं गैरफायदा घेतात. रत्नागिरी नजीकच्या वेलदूर येथील कोकण विदर्भ बँकेच्या बाबतीत हि असेच घडले. बँकेत तारण ठेवलेल्या सोन्याच्या मूल्यांकनासाठी बँकेने जे दोन सराफ ठेवले होते तेच लुटारू निघाले आणि त्यांनी सात लाखांची रोकड लुटण्यासाठी चक्क बँकेच्या महिला मॅनेजारचा खून करून मृतदेह खाडीत फेकला. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही सराफांना अटक केली आहे.



सुनिता दुर्गोले या वेलदूर येथील कोकण विदर्भ बॅकेच्या शाखेच्या व्यवस्थापिका म्हणून काम पाहत होत्या. त्या बॅकेत काम करीत असल्याने त्यांची अर्थिक परिस्थीती ही सधन होती. त्या मुळच्या चिपळूच्या बॅकेत काम करीत असल्याने त्या वेलदूर येथे राहत होत्या. बॅकेचा सपुंर्ण अर्थिक व्यवहार त्या शाखा व्यस्थापिका...पान ६ वर

# दारूच्या नशेत भलताच प्रकार घडला
# चोरीचा आळ घेऊन वृद्धाचा मुडदा पाडला

वाडा/क्राईम रिपोर्टर



मयत नारायण

संशय खूप वाईट असतो. एकदाका माणसाच्या मनात संशयाचे भूत शिरले कि माणूस समोर कोण आहे याचा जराही विचार करीत नाही. अशा वेळेस रागाच्या भरात त्याच्या हातून काहीही घडू शकते. असाच काहीसा प्रकार वाडा तालुक्यातील कुडूस नजीकच्या दिनकरपाडा येथे घडला आहे. मच्छी पकडण्यासाठी गेलेल्या एका वृद्ध इसमावर मच्छी चोरल्याचा आळ घेऊन दारूच्या नशेत असलेल्या पती पत्नीने त्या वृद्ध इसमाचा दगडाने ठेचून खून केला आणि मृतदेह लपवण्याचा प्रयत्न केला. २० दिवसात घडलेल्या या दुसऱ्या हत्येने परिसरात खळबळ माजली असून पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

दिनांक ८ सप्टेंबर रोजी वाड्यातील कादिवली येथे शुल्लक कारणा वरून एका वृद्ध महिलेची डोक्यात दगड मारून हत्या करून प्रेत लपविण्याचा प्रयत्न करण्यात आला होता, असाच प्रकार शनिवारी (दि.१९) रात्रीच्या सुमारास दिनकर पाडा येथे घडला आहे. या घटनेतही एका वृद्धाच्या डोक्यात दगड मारून ...पान ६ वर

# पोलिसांना नाव सांगितल्याने तुटली दोस्ती यारी
# मित्रानेच तोडली मित्राच्या आयुष्याची दोरी



मयत शैलेश

सोलापूर/क्राईम रिपोर्टर



आरोपी बबलू

चोरी चकारी करणाऱ्यांमध्ये किती जरी दोस्ती यारी असली तरी ती फार काळ टिकत नाही. कारण पैशाच्या वाटणीवरून किंवा धंद्यातल्या स्पर्धेतून त्यांच्यात कधीना कधी बिनसते आणि त्यानंतर ते एकमेकांच्या जीवावर उठतात. मैत्रीचे रुपांतर दुष्मनीत होते आणि त्यातूनच मग एकाला कोणाला तरी जीव गमवावा लागतो. सोलापूरमध्ये घरफोड्या, चोऱ्या करणाऱ्या दोन मित्रांचे असेच बिनसले. एका घरफोडीच्या प्रकरणात अटक झालेल्या शैलेशने त्याचा मित्र बबलूचे नाव पोलिसांना सांगितले. त्यामुळे बबलू चिडला आणि त्यातूनच शैलेश आणि बबलूची दुष्मनी सुरु झाली आणि याच दुष्मनीतून बबलूने शैलेशचा गेम केला. या प्रकरणी आरोपीला अटक करण्यात आली आहे.



सोल्हापूरातील दमाणी नगरातील बल्लार चाळ येथे शैलेश कोकाटे आणि बबुल नरळे हे राहत होते. दोघेही तसे सराईत गुन्हेगारी क्षेत्राकडे वळाले असल्याने त्यातून त्याची ओळख झाली होती. त्या दोघात मैत्रीचे संबंध निर्माण झाल्याने ते दोघे ही एखाद्या ठिकाणी घरफोडी ...पान ६ वर

# अंबरनाथमध्ये अपहरणकर्त्यांच्या
# तावडीतून चिमुकल्याची सुटका



अंबरनाथ/क्राईम रिपोर्टर

अंबरनाथ पश्चिम येथिल सर्कस मैदाना जवळ राहणाऱ्या एका अडीच वर्षीय मुलाचे अपहरण करुन त्याला उल्हासनगर येथे ७० हजार रुपयात विकणाऱ्या टोळीला ग्राहक महिले सह अटक केली आहे. तर पोलिसानी त्या मुलाला आपल्या पालका कडे सुपूर्द केल्याने अंबरनाथ पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

अंबरनाथ पश्चिम येथिल भाजी मार्केट शेजारी असलेल्या सर्कस मैदाना जवळ लिलया मंडल ही महिला तीन वर्षा पासुन आपल्या परिवारासह राहते १५ सप्टेंबर रोजी तिचा अडीच वर्षीय विकास हा मुलगा आपल्या भावंडा सोबत घरा बाहेर खेळत होता. परंतु तो अचानक गायब झाला . त्याचा सर्वत्र शोध घेतला ...पान ६ वर

# म्हाताऱ्याच्या रागाची परिसीमा झाली
# म्हातारीला ठार मारुन आत्महत्या केली

रावेर/क्राईम रिपोर्टर

माणसाचे एकदाका वय झाले कि तो स्वतःला देवधर्माच्या कार्यात वाहून घेतो आणि त्यातच आपला वेळ घालवतो. पण काही लोकं मात्र आपले म्हातारपण विसरून पूर्वी सारखेच वागू लागतात आणि ज्या माणसाचा स्वभाव रंगेल असतो त्याचा रंगेल स्वभाव म्हातारपणीही कायम राहतो आणि रागाला डोळे नसल्याने अशा रंगेल माणसाच्या हातून काहीही घडू शकते. रावेर येथील अशाच एका वृद्ध माणसाने रागाच्या भरात पत्नीला ठार मारून स्वतःही गळफास घेवून आत्महत्या केली. या घटनेमुळे रावेर तालुक्यातील नेहते गावात खळबळ माजली आहे.









राग हा शक्यतो नसावा. असला तरी तो क्षणीक असावा. कायमस्वरुपी अथवा रोजची कटकट असलेला राग घातक असतो. क्षणभराचा राग आपले व दुसऱ्याचे आयुष्य उध्वस्त करण्यास ...पान ६ वर

28 SEPTEMBER TO 04 OCTBER 2020 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 26/09/2020 8:04 PM Page 1



पान १ वरून....

## लॉकडाऊनमुळे कामधंदा गेल्याने...

एकंदरीत सर्व काही सुरळीत सुरु असतांना अचानक मार्च महिन्यात लॉकडाऊन सुरु झाले. सर्व दुनीया घरात बसली. दुकानदारी ठप्प झाली. रस्त्यावर शुकशुकाट झाला. उडणारी पाखरे देखील आपल्या घरट्यात जावून जगाची अवस्था बघू लागली. त्या लॉक डाऊनमुळे सागरच्या शिलाई मशीनचे चाक देखील थांबले. अर्थातच त्याचा आर्थिक स्त्रोत बंद झाला. हातावर पोट असणारा सागर डोक्याला हात लावून बसला. आता काय करावे असा विचार तो करु लागला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरुवातीला केवळ इक्कीस दिन लॉकडाऊनची घोषणा केली. जावू द्या - काढून घेवू इक्कीस दिन असा विचार सागरने मनाशी विचार केला. हळूहळू कोरोना विषाणूचा फैलाव वाढत गेला. तो आटोक्यात येण्याची चिन्हे दिसत नव्हती. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना त्यांचा इक्कीस दिन चा प्रस्ताव सतरंजीप्रमाणे गुंडाळून ठेवावा लागला. परिस्थितीच तशी होती. शिलाई मशीनचे चाक व त्यातून फिरणारे आर्थिक गणीताचे चाक थांबल्यामुळे हतबल झालेला सागर आता काय करावे असा विचार करु लागला. आपल्या संसार वेली वर पत्नीसह दोन मुली व एक मुलगा अशा चार फांद्या वाढल्याचे त्याला दिसत होते. जेव्हा शिलाई मशीनचे चाक जोरात फिरत होते त्यावेळी सागर त्याचे सट्टा, पत्ता व दारु पिण्याचे शोक पुर्ण करत होता. आलेल्या पैशातून आपले शोक पुर्ण करण्यात त्याला काही वाटत नव्हते. मात्र आता उलाढाल थांबली होती. सर्वत्र लॉक डाऊन सुरु असले तरी भाजीपाला विक्रीला मनाई नव्हती. अत्यावश्यक सेवेत मोडला जाणारा भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करणारा त्याचा एक मित्र होता. त्याचे नाव रमेश काकडे असे होते. तो पिंप्राळा हुडको परिसरात रहात होता. लॉकडाऊन काळात भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करण्याचा सल्ला रमेश काकडे याने सागर यास दिला. मात्र ज्या भागात सागर रहात होता त्या भागात भाजीपाला विक्री करण्यास त्याला लज्जा अर्थात संकोच वाटत होता. आपण टेलर काम करणारे व आता भाजीपाला कसा विकायचा? व तो देखील आपण रहात असलेल्या परिसरात. लोक काय म्हणतील असा विचार तो करु लागला. त्यावर उपाय म्हणून रमेश काकडे याने सागर यास तो रहात असलेल्या पिंप्राळा हुडको परिसरात रहायला येण्यास सुचवले. रमेश काकडे हा एकटाच रहात होता. त्यातल्या त्यात तो फाजील होता. स्त्री देहावर त्याची नजर चांगली नव्हती. एवढे सर्व माहीत असतांना देखील सागर त्याच्या नादाला लागून तो रहात असलेल्या पिंप्राळा हुडको परिसरात भाड्याच्या घरात राहण्यास आला. या परिसरात आपल्याला कुणी ओळखत नाही व भाजीपाला विक्री करतांना आपल्याला लाज अथवा संकोच बाळगण्याचे कारण नाही असा त्यामागचा हेतू होता. सागरची पत्नी सायली हिला पिंप्राळा हुडको भागात रहायला जाण्याचा प्रस्ताव अजिबात आवडला नव्हता. परंतू तिचे म्हणणे ऐकून घेण्यास सागरची तयारी नव्हती. तो त्याचा फाजील दोस्त रमेश काकडे याच्या नादी लागला होता. २० मे रोजी सागर व त्याची पत्नी सायली व मुले असे सर्व जण पिंप्राळा हुडको भागात राहण्यास आले. सायली दिसायला देखणी होती. तिचे तारुण्य लाजवाब होते. तिच्य देखण्या कटीबद्ध शरीरावर फाजील मित्र रमेश काकडे याची नजर जाताच तो घायाळ झाला. काहीही करुन तिला आपलेसे करण्याचे त्याने मनाशी ठरवले होते. त्यासाठी कच्चा दुवा असलेला तिचा पती सागर यास आमिष दाखवण्यास त्याने सुरुवात केली. सायलीचा पती आपल्या ताब्यात आला म्हणजे सायली आपल्या ताब्यात आली हे त्याचे गणीत होते. त्यात तो ब-याच प्रमाणात यशस्वी झाला. त्याने अगोदर सागरवर मोहीनी घातली. रमेशच्या आमिषाला व बोलण्याला सागर बळी पडला. रमेशकडून आपल्याला या लॉक डाऊन काळात आर्थिक मदत होईल असे सागरने ठरवले. त्यासाठी त्याने पत्नी सायलीचाच बळी देण्याचे ठरवले. सागर यास दारु, सट्टा, पत्ता याचे व्यसन होते. त्याचे व्यसन लबाड व कावेबाज रमेश काकडे याने हेरले होते. ५ जून रोजी दुपारी सागर त्याची पत्नी सायली जवळ आला. त्याने तिला म्हटले की तु किचन मधे कपडे बदलत जावू नको. तु माझा मित्र रमेश याच्या समोर कपडे बदलत जा. असे केल्यास आपल्याला व्यवसायात फायदा होईल. आपला पती आपल्याला मित्रासमोर कपडे बदलण्यास सांगत असल्याचे बघून सायलीला धक्काच बसला. ज्या पतीरुपी कवचाच्या बळावर आपण लग्न करुन आलो तो पतीच अर्थात ते कुंपनच आपल्याला मित्रासमोर कपडे बदलण्यास सांगत असल्याचे ऐकून ती हादरली. तिने तसे करण्यास स्पष्ट नकार दिला. तिचा नकार ऐकताच सागर चिडला. त्याने तिला धमकी दिली की तु जर माझ्या मित्रासमोर कपडे बदलले नाही तर मी आपल्या मुलांना ठार करेन व स्वत: देखील आत्महत्या करुन घेईन. मी अगोदरच या लॉकडाऊन मुळे वैतागला आहे. अगदी नाईलाज झाल्यामुळे अंग चोरुन चोरुन तिने रमेश काकडे याच्यासमोर बाहेरच्या खोलीत कपडे बदलण्यास सुरुवात केली. तिची अंगकाठी बघून रमेश काकडे याची नियत फिरली. तो तिच्याकडे अतिशय वाईट नजरेने बघू लागला. त्यानंतर तिन दिवस असेच निघून गेले. या तिन दिवसांच्या कालावधीत रमेशने सागरला आमिष दाखवून सायलीसोबत शैय्यासोबत करण्याची व्यवस्था करण्यास सांगितले. ८ जून रोजी रात्री आठ वाजता सायलीने घरातील सर्व सदस्यांची क्षुधाशांती केली. सर्वांचे जेवण आटोपल्यानंतर तिने भांडीकुंडी घासून आवरण्यास सुरुवात केली. मुलांना झोपवून ती देखील झोपण्याच्य तयारीत होती. त्याचवेळी सागर तिच्याजवळ आला. त्याने तिला म्हटले की आजची रात्र तू माझा मित्र रमेश सोबत घालव. तु त्याला शैय्यासोबत कर. आता हद्द झाल्याचे बघून सायली चिडली. हा प्रकार मी तुमच्या आईवडीलांना सांगेन असे ती म्हणू लागली. तिची धमकी ऐकून सागर चिडला. तु जर माझे ऐकले नाही तर मी आपल्या मुलांना मारुन टाकीन व स्वत: देखील आत्महत्या करुन घेईन अशी तो तिला धमकी देवू लागला. त्यानंतर तो तावातावने घरातून निघून गेला. काही वेळाने सागर घरात आला. सोबत येतांना त्याने शितपेयाची बाटली घेवून आला. तु टेन्शन घेवू नको. हे शितपेय घे त्यामुळे तुझ्या मनावरील ताण दुर होईल. त्याच्या बोलण्याकडे तिने दुर्लक्ष केले. त्यामुळे त्याने तिला बळजबरी ते शितपेय प्राशन करण्यास भाग पाडले. ते शितपेय घेतल्यानंतर तिला गुंगी आल्यासारखे वाटू लागले. तिच्या नजरेसमोर समोरचे अस्पष्ट दिसू लागले. मात्र तिला काही प्रमाणात समजत होते. त्याचवेळी सागरचा मित्र रमेश तेथे आला होता. तिचा पती सागर व त्याचा मित्र रमेश या दोघांनी तिला बळजबरी बाथरुम मधे नेले. तिला तिच्याच पतीने अर्थात सागरने पकडून ठेवले. त्यानंतर रमेश काकडे याने तिच्यासोबत नको ते कृत्य करण्यास सुरुवात केली. पतीच आपल्या पत्नीला मित्राच्या हवाली करत होता. त्याला आपल्या नजरेसमोर चुकीचे कृत्य करण्यास मदत करत होता. पतीचा मित्र व्हिलन होता हे स्पष्ट होते मात्र पती देखील व्हिलन झाला होता. अतिशय घृणास्पद प्रकार त्यावेळी सायलीसोबत झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी तिने हा सर्व प्रकार रडत रडत माहेरी व सासू सासऱ्यांच्या कानावर घालणार असल्याचे पती सागर यास सांगितले. त्यावेळी सागरने तिला धमकी दिली की तु जर कुणाला सांगितले तर मी आत्महत्या करुन घेईन. रात्री घडलेला प्रकार मी मोबाईलमधे शुट केलेला आहे. ती शुटींग मी व्हायरल करेन अशी धमकी त्याने तिला दिली. या प्रकारामुळे सायलीची तब्येत बिघडली होती. त्यामुळे सागरने तिला १७ जून रोजी माहेरी धुळे येथे सोडून दिले. माहेरी आल्यावर सायली उदास राहू लागली. तिच्या वहिणीने तिची सखोल विचारपुस केली असता सायलीने खरा प्रकार कथन केला. त्यामुळे या प्रकाराबाबत पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करुन नराधम पतीला अद्दल घडवण्याचे तिने ठरवले. त्यामुळे तिने माहेरच्या मंडळींना सोबत घेत जळगाव येथील रामानंद नगर पोलिस स्टेशन गाठले. तिने सर्व प्रकार जिल्हा पेठ पोलिस स्टेशनचे प्रभारी पोलिस निरिक्षक अकबर पटेल यांच्या कानावर घातला. पो.नि. अकबर पटेल यांनी तिची कैफीयत ऐकून घेतली. या प्रकरणी तिने दिलेल्या फिर्यादीनुसार तिचा पती व मित्र रमेश काकडे या दोघांविरुद्ध रितसर कायदेशीर गुन्हा दाखल केला. सदर गुन्हा भाग ५ गु.र.न.२९९/२० भा.द.वि. ३२८, ३७६, ३७७, ५०६ व ३४ अन्वये दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक संदिप परदेशी यांच्याकडे देण्यात आला. त्यानंतर रामानंद नगर पोलिस स्टेशनचे पो.नि. अनिल बडगुजर रुजू झाले. त्यांनी याप्रकरणी आरोपींच्या मुसक्या आवळण्यासाठी आपली सुत्रे वेगाने फिरवण्यास सुरुवात केली. याकामी तपास अधिकारी स.पो.नि. संदिप परदेशी यांच्यासह सुनील पाटील, रुपेश ठाकुर, भुषण पाटील, तुषार विसपुते, होमगार्ड स्वप्निल निकम यांनी परिश्रम घेण्यास सुरुवात केली. रवीवार दि.२० सप्टेबर रोजी जळगाव बस स्थानकातून पळून जाण्याच्या बेतात असतांना आरोपी पती सागर यास रामनंद नगर पोलिसांच्या पथकाने अटक केली. पो.नि. अनिल बडगुजर यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार पिडीतेचा पती बसने पळून जाण्याच्या बेतात असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार सापळा लावून स.पो.नि. संदिप परदेशी यांच्या सह सुनील पाटील, रुपेश ठाकुर, भुषण पाटील, तुषार विसपुते, होमगार्ड स्वप्निल निकम आदींनी त्याच्या मुसक्या आवळल्या. त्याला अटक करण्यात आली. त्यानंतर मंगळवार २२ सप्टेबर रोजी पिडीत महिलेच्या पतीचा नराधम मित्र रमेश काकडे याला देखील जळगाव शहरातील वाल्मिक नगर परिसरातून अटक करण्यात आली.

## बंगल्याचा वाद प्राणावर बेतला...

शिवसेनेचे नगर माणिक पाटील हे ठाण्यातील घोडबंदर रोड येथे राहण्यास आहे. राकेश हा जवळच असणाऱ्या शिवसृष्टी इमारत येथे राहण्यास होता. २० सप्टेंबर रोजी रात्रीपासून बेपत्ता असणाऱ्या राकेश पाटील यांचा मोबाईल फोन बंद लागत असल्यामुळे माणिक पाटील यांनी कासारवडवली पोलीस ठाण्यात हरवल्याची तक्रार दाखल केली होती. राकेशचा शोध सुरू असताना माणिक पाटील यांच्या बंगल्यातील साडेतीन किलो सोन्याचे दागिने गायब असल्याचे माणिक पाटील यांच्या लक्षात आले. नगरसेवक पाटील यांनी याप्रकरणी पोलिसांना कळवले. मुलगा आणि सोनं गायब झाल्यामुळे कासारवडवली पोलिसांनी हे प्रकरण गंभीरतेने घेऊन कासारवडवली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किशोर खैरनार यांनी राकेशच्या शोधासाठी पोलिसांचे एक विशेष पथक तयार केले. राकेशचा शोध सुरू असताना त्याची मोटारसायकल माणिक पाटील यांचा वाहन चालक गौरव सिंह यांच्याकडे पोलिसांना सापडली. पोलिसांनी संशयावरून गौरव सिंह याला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी करताच त्याने राकेशची हत्या करून मृतदेह वाशीच्या खाडीत फेकला असल्याची कबुली दिली. सचिन पाटील हा राकेशचा सावत्र भाऊ असून त्याने बंगल्याच्या वाटणीवरून राकेशची गोळ्या झाडून हत्या केली, त्यानंतर आम्ही दोघांनी मिळून मृतदेह वाशीच्या खाडीत फेकला असल्याची कबुली गौरव सिंह याने पोलिसांकडे दिली असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किशोर खैरनार यांनी सांगितले. राकेश आणि सचिन या सावत्र भावांमध्ये माणिक पाटील यांच्या बंगल्याच्या वाटणीवरून वाद सुरू होता. २० सप्टेंबर रोजी रात्री सचिनने राकेशला विजय गार्डन येथील बंगल्यावर बोलावून घेतले होते. त्या ठिकाणी गौरव सिंह हा देखील हजर होता. या तिघांशिवाय बंगल्यावर दुसरे कोणीही नव्हते. तिघे मिळून रात्रभर दारू प्यायले. यादरम्यान सचिन आणि राकेश यांच्यात बंगल्याच्या वाटणीवरून वाद देखील झाला. दुसऱ्या दिवशी पहाटे सचिन हा झोपेतून जागा झाला आणि स्वतःजवळील पिस्तूलामधून झोपेत असणाऱ्या राकेशवर गोळ्या झाडून ठार केले. त्यानंतर सचिन आणि गौरव सिंह यांनी राकेशचा मृतदेह गोणीत भरून वाशी पुलावरून खाडीत फेकून दिला, अशी कबुली गौरवने पोलिसांना दिली. याप्रकरणी कासारवडवली पोलिसांनी हत्या, पुरावा नष्ट करणे आणि हत्यारबंदी कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करून गौरव सिंह याला अटक केली असून फरार झालेल्या सचिन पाटील याचा कसून शोध घेण्यात येत असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक खैरनार यांनी दिली. तसेच सोन्याच्या दागिन्यांबाबत गौरवला काही माहीत नसून हे दागिने नगरसेवक यांचा सावत्र मुलगा सचिन पाटील याने चोरी केले असावेत, अशी शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. राकेशचा मृतदेह अद्याप मिळून आलेला नसून वाशीच्या खाडीत मृतदेहाचा शोध घेण्यासाठी स्थानिक मच्छिमार यांची मदत घेण्यात येत असून मृतदेह शोधण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू असल्याचे खैरनार यांनी सांगितले.

## उसन्या पैशावरून तिने शिवीगाळ केली...

हत्या केल्याचे उघड झाले आहे. दिनांक १६ सप्टेंबर रोजी सकाळी ८:३० च्या सुमारास पनवेल तालुक्यातील मोरबे गाव च्या हद्दीत असलेल्या मोरबे धरणात एका महिलेचा मृतदेह पडला असल्याची माहिती गावच्या पोलीस पाटलाने पनवेल तालुका पोलिसांना दिली .घटनेची माहिती एकूण वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक राजपुत, सपोनि विजय खेडकर ,नितीन पगार, नितीन बडगुजर, मसपोनि योगिता कुदळे, पोउपनिरी सुनिल गुरव, पोह .मंगेश महाडीक इत्यादी तातडीने घटनास्थळी दाखल झाले .पोलिसांनी मोरबे धरणाचे जलाशयामध्ये रस्सीने व तारेने एका ४८ किलो वजनाचे सिमेंटचे पोलभोवती समांतर गुंडाळुन बांधलेले स्थितीत एका अंदाजे ३० ते ३५ वर्षे वयोगटातील महीलेचा मृतदेह तरंगत दिसून आला. मृतदेह पाण्यात जास्त काळ राहील्याने तो सडलेले व फुगलेले अवस्थेत असल्याने मृतदेहाचा चेहरा विदुष झालेला असल्याने ओळखण्याचे स्थितीत नव्हता. पोलिसांनी तो बाहेर काढून इंस्केट पंचनामा केला व तो शवविच्छेदन साठी पाठविण्यात आला. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं.१३१/२०२० भादवि कलम ३०२,२०१ अन्वेय गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू करण्यात आला. मृतदेह मिळुन आला त्यावेळी मयत महीलेचे एका हातामध्ये फक्त बांगडया व गोंदलेले चिन्ह होते, मयत महिलेच्या अंगावर कोणत्याही प्रकारची कपडे नसल्याने व संपुर्ण प्रेत फुगल्याने चेह-यावरून मृतदेहाची ओळख पटवणे अवघड होते. गुन्हयाचे घटनेचे ठिकाणी वरीष्ठांनी भेट देवुन तपासाबाबत सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे नवी मुंबइचे पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह सह पोलीस आयुक्त डॉ. जय जाधव, पोलीस उपायुक्त अशोक दुघे व गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त प्रविण पाटील , सहाय्यक पोलीस आयुक्त रविंद्र गिड्डे व गुन्हे शाखेचे सपोआ विनोद चव्हाण यांच्या मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे पनवेल तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक राजपुत यांनी गुन्हयाचा तपास चालु करून, गुन्हयाचे तपासकामी पनवेल तालुका पोलीस ठाणेकडील पोलीस अधिकारी अंमलदार यांचे तपास पथक तयार करण्यात आले . त्यानुसार पनवेल तालुका पोलीस ठाणे व गुन्हे शाखेकडील तपास पथकाने गुन्हयाचा तपास चालु करून, मयताचे एका हातात असलेले बांगडया व गोंदलेले चिन्ह या छोटयाशा पुराव्यावरून साक्षीदारांचे मार्फतीने मृतदेहाची ओळख बारा तासाचे आत पटवण्यात यश प्राप्त झाले. रेश्मा मौर्य (वय २७) असे मृतक महिलेचे नाव असून ती मूळची उत्तरप्रदेश येथील रहिवासी आहे. ती पनवेलच्या आकुर्ली गावात आपल्या ७ वर्षीय मुलीसोबत राहत होती . रेशमाचे कोप्रोलीगाव येथे राहणारे ३२ वर्षीय युवक शशी पाटील या तरुणाशी अनैतिक संबंध होते. तसेच त्याने तिच्याकडून काही रक्कमही घेतलेली होती. या पैशांवरून त्या दोघांत नेहमी वाद होत होते. त्या वादातून त्यानेच साथीदारांचे मदतीने वरील कृत्य केल्याबाबत बातमीदाराकडून खात्रीशिर माहीती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी शशी पाटील या युवकाचा शोध घेत असताना तो गुन्हा दाखल झाल्यापासुन गावातून पसार झाल्याची माहीती मिळून आली. संशयित आरोपी हा त्याचे इतर साथीदार व मयताचे लहान मुलीसह सध्या सातारा जिल्हयातील कोरेगाव परिसरात फिरत असल्याची माहीती बातमीदाराकडून मिळाली होती. त्याप्रमाणे पनवेल तालुका पोलीस ठाणेकडील तपास पथकातील अधिकारी अंमलदार कोरेगाव, जि. सातारा येथे पाठवण्यात आले होते. तपास पथकातील अधिकारी अमलदारांनी कोरेगाव पोलीस स्टेशनचे पोनि. सुनिल गोडसे व त्यांचे अधिकारी अंमलदार यांचे मदतीने संशयित आरोपींचा शोध घेवुन गुन्हयातील मयत महीलेशी अनैतिक संबंध ठेवणारा ३२ वर्षीय युवकासह त्याचे २३ ते २९ वर्षे वयाचे तीन साथीदार या तिघांनाही दिनांक १८ सप्टेंबर रोजी कोरगाव, जि. सातारा येथुन ताब्यात घेवुन, पनवेल तालुका पोलीस स्टेशन येथे आणले .पोलीस ठाण्यात आणून त्यांचेकडे गुन्हयाबाबत चौकशी केली असता त्यांचा या गुन्हयातील सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने या चारही संशियत आरोपींना पनवेल शहर पोलिसांनी अटक केली. त्यावेळी त्यानी गुन्ह्याची पुढीलप्रमाणे पोलिसांजवळ कबुली दिली. ती अशी... ! रेश्मा मौर्य असे या दुर्दैवी तरुणीचे नाव असून ती मूळची उत्तरप्रदेशातील रहिवासी आहे . ती तरुणी पनवेल तालुक्यातील बोनशेत येथे सात वर्षाच्या मुलीसोबत राहत होती . तिचे कोप्रोली गावातील शशी पाटील नावाच्या तरुणासोबत विवाहबाह्य संबंध होते . त्यानेच तिला भाड्याने खोली घेवून दिली होती . दोघांतील संबंध आणि निकडीनुसार पैशाची देवाणघेवाण सुरू होती . दोघेही मद्यपान करत होते . त्यातूनच ती चिडून त्याच्याकडे पैसे परत मिळावेत म्हणून तगादा लावत होती . मागच्या महिन्यात तिने शशी पाटीलच्या कोप्रोली येथील घरी जावून तमाशा घातला होता . तिने त्याला शिव्या हासडल्या होत्या . पैसे न दिल्याने त्रागा केला होता . त्याचा राग शशीने मनात ठेवला होता . यया रागातून त्याचे आपला मित्र रवी ठाकूर आणि अक्षय पांचाळ यांच्या मदतीने रेशमाच्या हत्येचा कट रचला . ठरल्याप्रमाणे या तिघांनी रेशमाला कोप्रोली येथील स्मशानभूमीत बोलावले. दोघे जण बाजूला दबा धरून बसले होते . शशी त्याच्या गाडीत बसला होता . दुपारी अडीच वाजता रेश्मा रिक्षातून शशीजवळ आली. ती त्याच्या गाडीत बसली . ती गाडीत बसताच रवी आणि अक्षयने तिचा ताकतीने गळा दाबला. त्याचवेळी शशीने रेशमावर सुऱ्याने वार करून तिला भोसकले . त्यात तिचा मृत्यू झाला . दिवसभर एका खोलीत तिचा मृतदेह लपून ठेवला. रात्री अडीच वाजता तिचा मृतदेहाला सिमेंट पोल व खांब बांधून तो मृतदेह मोरबे धरणात फेकून दिला आणि रेशमाच्या मुलीला घेवून ते तिघे कोरेगावकडे पळून गेले. इकडे चार दिवसात मृतदेह नदीच्या किनारी तरंगला आणि त्यांचे ग्रह फिरले. तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक राजपूत यांनी अतिशय कौशल्यपूर्ण तपास करण्यासाठी माहितीगारांकडून खबर घेतली. साताऱ्यात पथक पाठविले. कोरेगाव पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुनील गोडसे आणि कर्मचाऱ्यांच्या मदतीने तिथे सापळा रचला आणि आरोपींना बेड्या ठोकल्या. अशा प्रकारे ४८ तासाचे आत सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यात पनवेल तालुका पोलीस स्टेशनला यश आलेले आहे. अटक आरोपी यांचे ताब्यात मयत महीलेची ७ वर्षीय मुलगीही मिळुन आलेली आहे. तिचेबाबत बाल कल्याण अधिकारी, पनवेल-रायगड यांचेकडून आदेश प्राप्त करून घेवुन सुरक्षिततेसाठी सद्या बालगृहात ठेवण्यात आले आहे. हा गुन्हा उघडकीस आणण्यामध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक राजपुत, सपोनि विजय खेडकर सपोनि नितीन पगार, सपोनि नितीन बडगुजर, मसपोनि योगिता कुदळे, पोउपनिरी सुनिल गुरव, पोह .मंगेश महाडीक, संकर अवतार, अजित म्हात्रे,अमोल कांबळे, मंगेश भुमकर पो ना . सागर रसाळ , राकेश मोकल, पोकॉ. संदिप चौधरी, तुषार पाटील, संतोष पाटील, राजकुमार सोनकांबळे, सुनिल खैरनार, लिंबाजी कायपलवाड यांनी महत्वपुर्ण कामगिरी केलेली आहे. गुन्हयाचा अधिक तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक राजपुत हे करीत आहेत.

## दोन बायकांचा दादला पेचात पडला...

त्याचे ही लग्न झाले होते. त्याला ही मुलेबाळे होती. लग्नाअगोदरचे प्रेमसंबंध गीताला स्वस्थ बसू देत नव्हते.ती काही तरी कारण सांगून गोरंबे येथे येऊन सागरला भेटत होती. त्याच्याबरोबर शरीर सुख लुटत होती. तो ही तिला पाहिजे तसे सुख देत असल्याने त्या सुखाला ती चटावलेली होती. तिला आता नवरा नकोच वाटत होता. ती त्याच्याशी प्रतारणा करीत होती. माहेरला जातो असे सांगून प्रियकराबरोबर गुलछर्रे उडवित होती. त्यातच त्या दोघांच्या संबंधाची चर्चा ही होऊ लागली होती. त्यातून गीताचे नवऱ्याबरोबर कायम भांडणे होत होती. त्याला ही तिच्या लग्नाअगोदरच्या प्रेमसंबंधाबद्दल समजले होते. माहेरी जातो असे सांगुन ती तिच्या प्रियकराला भेटायला जात होती हे ही त्याला माहित झाले होते.त्या दोघांची भांडणे विकोपाला गेली होती. तिच्या भरल्या संसारात वादळ निर्माण झाले होते. ती प्रियकराला आपल्या अंगावर घेऊन मजा मारत असल्याने तिला आता नवरा नकोच वाटत होता. पंधरा वर्षापासून चालत आलेला संसार मोडायला ती निघाली होती. ती आता गोरंबेला येऊन सागरला आपल्या बरोबर लग्न करण्याचा घाट घालत होती. त्याचे ही लग्न झाले असल्याने तो तिच्याबरोबर लग्न करायला टाळत होता. पण ती आपला हेका काही सोडायला तयार नव्हती. त्यातच तिने तू तुझ्या बायकोला सोड, मी माझ्या नवऱ्याला सोडते. आपण लग्न करून सुखाचा संसार करूया असे म्हणत त्याच्या मागे लग्नाचा तगादा लावीत होती.सागरच्या बायकोला ती तिने मी सागरबरोबर लग्न करणार आहे.तो माझा नवरा आहे.तु त्याला सोडून दे. असे सांगितले होते. त्यातून त्याच्या ही घरात भांडणे लागलेली होती. एकीकडे लग्नापूर्वीच्या प्रियेसीचा लग्नासाठी तगादा.तर दुसरीकडे लग्नाची बायको भांडणे काढू लागली असल्याने तो कात्रीत सापडला होता. त्याला ही काय करावे आणि काय नको असे झाले होते. गीता तर त्याला आपल्या प्रेमाचा वास्ता देत होती. तो काही बोलला तर तुला माझे शरीर पाहिजे आणि माझ्याशी लग्न करायला नको म्हणून भांडत काढीत होती. तिच्या भांडणाला कंटाळुन तो वैतागलेला होता. त्यातच ती गेल्या सात आठ महिन्यापूर्वी आपल्या नवऱ्याला आणि मुलांना सोडून सागरबरोबर लग्न करण्याच्या हेतूने गोरंब्याला आली होती. यावेळी तर तिने सागरला तु माझ्याशी लग्न केले नाहीस तर मी आत्महत्या करणार अशी धमकी दिली होती. तिच्या या धमकीला आणि तगादयाला कंटाळून सागरने गेल्या सहा सात महिन्यापूर्वी तिच्याशी दत्त देवस्थान नृसिंहवाडी येथे तिच्याबरोबर दुसरे लग्न केले होते. त्याने तिच्याशी लग्न केले असल्याने गीता ही आता त्याच्या घरात त्याच्या पहिल्या पत्नीबरोबर येऊन राहत होती. त्या दोघी आता सवती सवती झाल्या होत्या.आपल्या नवऱ्याने दुसरे लग्न केल्याने त्याच्या पहिल्या बायकोचा राग अनावर झाला होता. ती आता सागरबरोबर भांडणे काढत होती.पोलीसात तक्रार देण्याची धमकी देत होती.त्या दोघींच्या भांडणात त्याची गोची होत होती. तो दोघीना ही समजावून सांगत होता.पण भांडणात त्या दोघी ही ऐकत नव्हत्या त्याची अवस्था ही दोन बायका आणि फजिती ऐका अशी झाली होती.गीताच्या प्रवेशामुळे त्याच्या ही भरल्या संसारात वादल उठले होते. एकाच म्यानात दोन तलवार राहू शकत नाही याची प्रचिती सागरला लवकरच आली होती. तो दोघींच्या भांडणाला वैतागलेला होता. त्याची पहिली पत्नी ही त्याला धमकी देत होती.गीताला सोडून दया.म्हणून ती त्याच्याशी भांडण काढीत होती.त्याची भांडणे ही विकोपाला गेली होती. गीता मात्र तिच्या नकावर टिचून राहत होती. नातेवाईकांनी ही बऱ्याचवेळेला त्यांची भांडणे मिटविण्याचा प्रयत्न केला होता. परंतु ती भांडणे काही मिटत नव्हती.सागर तर दोघींच्या भांडणाला वैतागलेला होता.त्याला ही आपले जीवन नकोसे झाले होते. यातून काय मार्ग काढयाचा याचा तो विचार करीत होता. त्यातच त्याला एक आयडीया सुचली होती. त्याने गीताचाच कायमचा काटा काढायचा असे ठरविले होते. कारण जी लग्नानंतर तिच्या नवऱ्याची नाही झाली ती आपली काय होईल याची त्याला चिंता सतावत होती. म्हणून त्याने गेल्या २६ जुलै २०२० रोजी गीताला गोड बोलुन निपाणी येथे नेले होते. त्यानंतर त्याने २८ जुलै रोजी पत्नी गीता ही बेपत्ता झाल्याची तक्रार कगल पोलीसात दिली होती. कागल पोलीस ही या घटनेचा तपास करीत होते. त्यातच गुरूवार दि.१७ सप्टेंबर २०२० रोजी निपाणी पोलीसांना चिकोडी रोडवरील जत्राट वेस येथील एका ऊसाच्या शेतात एका महिलेचा सडलेला आणि कुजलेल्या अवस्थेत सांगडा मिळून आलेला होता. निपाणी पोलीस या घटनेचा तपास करीत असताना पोलीस संशयीत आरोपीच्या पर्यत पोहचले होते. बऱ्याचदा अशा घटनेत गुन्हा शेजारच्या राज्यात करायचा आणि मृतदेहाची विल्हेवाट लावायची कर्नाटकातील हद्दीत लावायची असा प्रकार होत असतो हे हेरून निपाणी पोलीस महाराष्ट्रातील शेजारच्या पोलीस ठाण्यातून कुणी महिला बेपत्ता आहे का? याचा तपास करीत होते. त्याचवेळी कागल तालुक्यातून गोरंबे येथून गीता शिरगावकर ही ३४ वर्षीय महिला बेपत्ता असल्याची माहिती पोलीसांना मिळाली होती. पोलीस त्या अंनुषगाने तपास करीत असताना अचानक मयत गीताचा मोबाईल सुरू झालेला होता. त्या मोबाईल कॉलच्या ट्रेसिंगवरून पोलीसांनी या गुन्हयातील बेपत्ता गीता हिचा पती सागर याला चौकशी साठी ताब्यात घेतले होते. त्याने गीताचा खून मित्रांना सुपारी देऊन केला होता.आणि तिचा मोबाईल एकाला विकला होता. तो मोबाईल चालु झाल्यावर गुन्हयाची उकल झाली होती. पोलीस त्याच्याकडे चौकशी करीत असताना त्याने सांगितलेली माहिती ही चक्रावून टाकणारी होती. गीताचे आणि त्याचे लग्नअगोदर पासून प्रेमसंबंध होते.त्यातूनच गीताही तिच्या नवऱ्याला आणि तीन मुलांना सोडून त्याच्याबरोबर दुसरे लग्न करून राहू लागली. त्यामुळे त्याच्या पहिल्या बायकोचा त्याच्या मागे ससेमीरा वाढला. दररोज घरात भांडणे होऊ लागली आणि त्यातूनच त्याने गीताला मारून टाकण्यासाठी निपाणी येथील आपल्या ओळखीच्या तिघांना सुपारी दिली. त्यांनी ठरवलेल्या प्लॅननुसार घटनेच्या दिवशी संध्याकाळी तो गीताला गोरंबे येथून घेऊन निपाणी येथे गेला होता. त्यावेळी त्याने तिला कोणताही अंदाज लागु दिला नाही. ठरल्या प्रमाणे तो त्या रात्री ११.३०च्या दरम्यान एका निर्जन ठिकाणी घेऊन गेला. तेथे त्या दोघांची बोलाचाली होत असताना भांडणाला सुरूवात झाली होती. त्या दोघांचे भांडण सुरू झाले होते. ती ही त्याला त्या भांडणात अरे तुरे बोलत होती.त्याला जशास तसे उतर देत होती. त्यावेळी तेथे त्याने सुपारी दिलेले त्याचे मित्र आकाश अनिल पसारे, गणेश राजू सय्यद,आणि प्रशांत प्रकाश मोरे, हे तिघेजण तेथे आले. त्यावेळी सागरने त्यांना इशारा केल्यावर रात्रीच्या अंधारात आकाश पसारे याने बेसावध असलेल्या गीताच्या डोक्यात लोंखडाने जोरदार प्रहार केला. त्यासरशी तिच्या तोंडातून किचांळी बाहेर पडून तिच्या डोक्यातुन मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झाला.आणि जागीच तिचा मृत्यू झाला होता. त्यावेळी ते तिघेही निपाणी येथीलच असल्याने तिच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी म्हणून चिकोडी रोडवरील बसवेश्वर नगराच्या जवळील जत्राटवेस येथील वखारी मागच्या असणाऱ्या शेतात त्यांनी तिचा मृतदेह नेऊन एक खड्डा काढून पुरून टाकला. आणि त्यावर तणनाशक औषधाची फवारणी केली.त्यानंतर ते तेथून परत फिरले. दुसऱ्या दिवशी त्याच्या ठरल्या प्लॅनप्रमाणे सागर याने कागल येथे येऊन पत्नी गीता ही बेपत्ता झाल्याची तक्रार पोलीस स्टेशनला दिली. त्याचबरोबर त्याने तिचा मोबाईल निपाणी येथील एकाला विकला. शेतात पुरलेला तिच्या मृतदेहाची खुद्द त्या शेतमालकाला किंवा कुणालाच कसली शंका आलेली नव्हती. दिवसामागून दिवस जात होते. त्याचवेळी गीताच्या विकलेल्या मोबाईलचे कॉलट्रेसिंग काढण्याचे काम पोलीसाकडून सुरू असताना दोन महिन्यांनंतर कागल पोलीसांना तिचा मोबाईल चालु झाल्याचे समजले,आणि त्याचे कॉल ट्रेसिंग कर्नाटकातील निपाणी दाखवित असल्याने कागल पोलीसांनी निपाणी पोलीसांची संधान साधून ज्याने मोबाईल विकत घेतलेला होता.त्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने कागल येथील गीताचा पती सागर शिरगावकर याचे नाव पोलीसांना सागितले.त्यावरून पोलीसांनी सागरला ताब्यात घेतले आणि त्याच्याकडे या गुन्हयाची चौकशी केली असता त्यानेच आपल्या पत्नीचा खून मित्राच्या मदत्तीने सुपारी देऊन केला होता. त्याने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी मृतदेह पुरलेल्या ठिकाणी जाऊन मृतदेह त्या शेतातील खड्डयातून उकरून बाहेर काढला असता. दुर्गंधी युक्त हांडाचा सापळा असलेला महिलेचा मृतदेह होता.निपाणी ग्रामीण पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून तो हांडाचा सापळा फॉरेन्सी लॅबकडे पाठवून दिला. गीता सागर शिरगावकर (वय ३४रा.गोरंबे कागल) हिचा खून करून मृतदेहाची विल्हेवाट लावल्याप्रकणी निपाणी पोलीसांनी तिचा पती सागर दिनकर शिरगावकर (वय ४२ रा.गोरंबे कागल) आकाश अनिल पसारे गणेश राजू सय्यद, प्रकाश प्रशांत मोरे रा.तिघेही निपाणी याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ २०१ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याना ताब्यात घेतले होते. त्याना अटक करून निपाणी येथील मा.कोर्टासमारे उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना आठ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. या चौघांनाही पोलीसांनी त्याची रवानगी हिंडलगा जेलमध्ये केली होती. या दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला लोंखडी रॉड जप्त केला होता. या घटनेचा तपास निपाणी पोलीसाबरोबर कागल पोलीसांनी ही केला होता.या गुन्हयाचा तपास योग्य पध्दतीने करून संशयीताना गजाआड केल्याबद्दल कागल पोलीसाचा यथोचित सत्कार गोरंबे ग्रमास्थाकडून करण्यात आला.

## दारुड्या मुलाने छळ केला भारी...

सारखा गायब झाला असेल पुन्हा येईल असे नातेवाईकांना वाटले आणि त्यामुळेच पोलिसांनी सुद्धा मिसिंगची तक्रार घेतली नाही. मात्र खिंड वाडीच्या जंगलात एक मृतदेह सापडला आणि त्याचे वर्णन बेपत्ता प्रकाशच्या मृतदेहाशी मिळते जुळते असल्याने पोलिसांनी प्रकाशच्या कुटुंबियांकडून तो मृतदेह प्रकाशचाच असल्याची ओळख पटवून घेतली आणि त्यानंतर अवघ्या दोन तासात त्याच्या हत्येचा छडा लावून त्याच्या आईला तिच्या दोन साथीदारासह अटक केली. पुणे- बंगळूर महामार्गालगत खिंडवाडीतील जंगलामध्ये युवकाचा खून झाल्याचे समोर आले. आईच्या सांगण्यावरूनच मुलाचा खून केल्याचे पोलिस तपासात समोर येत आहे. सातारा तालुका पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण विभागाच्या पथकाने हा गुन्हा उघडकीस आणला. प्रकाश कदम (वय ३०, रा. वळसे, ता. सातारा) असे खून झालेल्या युवकाचे नाव आहे. याप्रकरणी साहिल मुलाणी व प्रमोद साळुंखे (रा. देगाव, ता. सातारा) या दोघांना अटक करण्यात आली आहे, तर विजया सुदाम कदम (आई) हिलाही ताब्यात घेतले आहे. याबाबत घटनास्थळ व पोलिसांकडील माहितीनुसार, खिंडवाडीतील जंगलात विलासपूरच्या हद्दीत युवकाचा सडलेल्या अवस्थेतील मृतदेह असल्याची माहिती काही स्थानिकांनी पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिस पथक तातडीने घटनास्थळी गेले. पाहणीमध्ये पोलिसांना या युवकाच्या डोक्याजवळ दगड आणि रक्त दिसून आले. त्यामुळे त्याचा खून झाला असावा, या निष्कर्षापर्यंत पोलिस पोचले होते. सहायक पोलिस अधीक्षक समीर शेखही घटनास्थळी आले. गुन्हे प्रकटीकरण विभागाच्या पथकाला या घटनेचा तातडीने तपास करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तपास सुरू केल्यानंतर पोलिसांसमोर धक्कादायक माहिती उघड झाली. संबंधित मृतदेह वळसे येथील प्रकाशचा असल्याचे चौकशीत समोर आले. त्यानंतर अवघ्या दोन तासांत पोलिसांनी संशयित म्हणून साहिल व प्रमोद या दोघांनाही अटक केली. पोलिसांनी केलेल्या चौकशीत वेगळीच माहिती समोर आली. मुलाच्या खुनाची सुपारी दिल्याबद्दल पोलिसांनी प्रकाशच्या आईलाही बुधवारी रात्री उशिरा ताब्यात घेतले आहे. तिच्याकडे चौकशी सुरू आहे. या प्रकरणातील आणखी तथ्य उद्या (ता. ३) दुपारपर्यंत समोर येईल, असे पोलिसांचे म्हणणे आहे. पोलिस निरीक्षक सजन हंकारे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार सुजित भोसले, दादा परिहार, सागर निकम, नितीनराज थोरात, सतीश पवार, संदीप कुंभार यांनी ही कारवाई केली. प्रकाश हा दारू पिऊन वारंवार त्याच्या आईला त्रास देत होता. काही वर्षे तो मुंबईमध्ये काम करत होता. मात्र, गावी आल्यानंतर तो परत जात नव्हता. गावातही काहीही कामधंदा न करता तो आईला शिवीगाळ करत होता. या त्रासाला त्याची आई कंटाळली होती. त्यामुळे आईने नात्यातील प्रमोदला प्रकाशला संपविण्यास सांगितले होते. त्यानुसार प्रमोदने त्याचा मित्र साहिलला बरोबर घेतले. २६ ऑगस्टला दुपारी तिघे जण दारू पिण्यासाठी खिंडवाडीतील जंगलामध्ये गेले. तेथे प्रकाशला दारू पाजली. त्यानंतर दोघांनी त्याचा गळा चिरला. त्याच्या डोक्यात दगड घातला.

28 SEPTEMBER TO 04 OCTBER 2020 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 28/09/2020 4:21 PM Page 1



### ग्रामपंचायत गंगापुरचा नाविण्यपुर्ण निर्णय

# शेतकऱ्यांचा शेतीमाल घरपोच देणार





**लातूर/करकरे**

ग्रामपंचायत गंगापुरचा उपक्रम, गंगापूर गावातील शेतकऱ्यांना सुविधा, शेतीमधील शेतीमाल फक्त दोनशे रुपयात घरपोच देणार ग्रामपंचायत गंगापुर यांनी गावातील नागरिकासाठी अनेक सुविधा दिल्या असुन ग्रामपंचायत चा टॅक्स भरणारे साठी पिठाची गिरणी, मिरची कांडप व दररोज पिण्याचा १ झार देणे चालुच आहे.

सरपंच बाबु खंदाडे यांच्या नेतृत्वाखाली नवनवीन उपक्रम राबवले जात असुन नागरिकांना शुध्द पाणी देण्यासाठी दोन आर वो केन्द्र चालु असुन अजुन दोन आर वो केन्द्र उभारणी केली जात आहेत, कचरा वाहतुकी साठी ट्रॅक्टर व ट्राली घेतली आहे, गावामध्ये दुतर्फा रस्ते केले आहेत, शहरा प्रमाणे मधोमध डिव्हायडर व पोल आहेत, ८ किलोमीटर नाला सरळीकरण केले आहे, वृक्षलागवडी साठी टँकर घेतले आहे, स्मशानभुमी मध्ये रस्ता व बसण्याची सोय केली आहे, अद्यावत अश्या ग्रामपंचायत कार्यालयाचे बांधकाम चालु आहे. आता त्यात भर पडली असुन आज ग्रामपंचायत ने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे. गंगापुर गावातील राहणारे रहिवाशी ज्यांनी ग्रामपंचायत चा टॅक्स पुर्ण पणे भरला आहे, असे शेतकरी यांच्या शेतातील शेतीमाल हा किती ही पोते असेल तर फक्त २०० रुपये ट्रीप मध्ये आणण्याचा निर्णय घेतला आहे. शेतीमाल ट्रॉली मध्ये चढवणे, बांधणी करणे व माल उतरावुन घेणे हे त्या त्या शेतकरी यांनी करावयाचे आहे. डिझेल खर्च, ड्रायव्हर पगार व मेंन्टेस यासाठी हे २०० रुपये घेत असुन ही शेतकरी सेवा म्हणुन ग्रामपंचायत करत आहे. शेतकरी चा शेतातील शेतीमाल शेतकरी च्यां घरी घरपोच करण्याचा निर्णय घेणारी ही महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील पहिली ग्रामपंचायत ही गंगापुर ग्रामपंचायत आहे. यामुळे सतत संकटात असणारे शेतकरी वर्गास मोलाचा हातभार मिळणार आहे. प्रथम येणारेस प्रथम प्राधान्याने सेवा मिळणार आहे. गावातील सर्व नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहण ग्रामपंचायत गंगापुर तर्फे सरपंच बाबु खंदाडे, उपसरपंच रफीक शेख, ग्रामपंचायत सदस्य ईश्वर शेलार, भाऊसाहेब मिंड, गुणवंत वाघे, रेणुका वाघमारे, शोभा बनसोडे, शेख फरजानबी, गायकवाड उषाबाई, लष्कर काशीबाई, जन्नतबी पठाण व ग्रामविकास अधिकारी राजश्री परचंडराव यांनी केले आहे.

## दमनमध्ये हत्या करून फरार असलेले आरोपी गावठी कट्ट्यासह वालीव पोलिसांनी पकडले

**वसई/प्रतिनिधी**

वसई येथील कामण परिसरात मंगळवारी संध्याकाळी गावठी कट्टा आणि ३ जिवंत काडतुसांसह दोन आरोपींना वालीवच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी पकडले आहे. या दोघांनी दमन येथे हत्या करून वसईत येऊन लपले होते. यातील एक आरोपी तर नामांकित वकील माजिद मेमन यांच्यावर फायरिंग केलेल्या प्रकरणात सहभाग होता आणि त्याची सजा भोगली आहे. वसई पूर्वेकडील कामणच्या चिंचोटी नाका येथील सुलभ शौचालय मंगळवारी संध्याकाळी सहा वाजण्याच्या सुमारास दोन संशयित वालीव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलीस कर्मचाऱ्यांना दिसले. आरोपी विकी सुनील शर्मा (३४) आणि दिवेश निलेशभाई नायका (२८) या दोघांना ताब्यात घेऊन झडती घेतली. त्यांच्याकडून पाच हजारांचा गावठी कट्टा आणि तीन जिवंत काडतुसे भेटले. शस्त्रे बाळगण्याची मनाई आदेश असताना तो भंग केला आहे. या दोन्ही आरोपींनी ऑगस्ट महिन्यात मित्राचे पैसे एकाकडे येणे बाकी होती. याच्यावरून वाद झाल्यानंतर आरोपींनी त्याचा खून केला होता. तेव्हापासून ते फरार होते आणि ते नालासोपाऱ्यात येऊन राहत होते. आरोपी विकी शर्मा याचा सन २००५ साली मुंबईच्या बांद्रा परिसरात नामांकित वकील माजिद मेमन यांच्यावर फायरिंग करलेल्या प्रकरणात सहभागी होता. त्याला पोलिसांनी पकडल्यावर न्यायालयाने चार वर्षाची शिक्षा सुनावण्यात आली होती आणि त्याने ती शिक्षा भोगली आहे. या दोघांनी दमन येथे ऑगस्ट महिन्यात एकाचा खून केला होता व ते तेव्हापासून फरार होते. तसेच यातील एकाचा नामांकित वकील माजिद मेमन यांच्यावर फायरिंग केली होती असे विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वालीव यांनी सांगितले.

## जलजीवन योजनेत देवणी तालुक्यातील गावे समावेश करण्यासाठी राज्यमंत्र्याना निवेदन



**देवणी/प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या जलजिवन योजनेत देवणी तालुक्यातील बटणपुर, गुरणाळ, लासोना, विजयनगर, देवणी खु, होनाळी, भोपणी, कोनाळी, सावरगाव, संगम, विळेगाव, अंबेगाव, हेळंब, धनेगाव या गावचा महाराष्ट्र शासनाच्या जलजिवन योजनेत समावेश करुण, पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी सोडवावा अशी मागणी महाराष्ट्र राज्य पर्यावरण पाणीपुरवठा राज्यमंत्री संजय बनसोडे यांच्याकडे राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसच्या वतीने विकासकामांचे निवेदन देण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे प्रदेश कार्याध्यक्ष सुरज दादा चव्हाण व राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे प्रदेश सचिव मनोज कन्नाडे, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे सरचिटणीस प्रमोद सरवदे, काकडे सर उपस्थित होते. लागलीच मंत्री महोदय यांनी संबंधितांना आदेश देऊन हा विषय मार्गी लावण्याचे असे आश्वासन देण्यात आले असल्याचे मनोज कानडे यांनी सांगितले.

## भिवंडीत जिलानी इमारतीचे बचाव काम समाप्त मृत्यू पावलेल्या रहिवाश्यांना वाहिली श्रद्धांजली



**भिवंडी/प्रतिनिधी**

शहरातील धामणकरनाका परिसरातील पटेल नगर येथील जिलानी बिल्डिंग कोसळून दुर्घटना घडलेली होती. या दुर्घटनेत ३८ रहिवाशांचा इमारतीच्या ढिगाऱ्याखाली दबून मृत्यु झाला तर २५ जखमींना मलब्याखालून एनडीआरएफ, टीडीआरएफ, फायर ब्रिगेड व भिवंडी पालिकेचा अतिक्रमण विभागाच्या कर्मचाऱ्यांनी सुरक्षितपणे बाहेर काढण्यात यश मिळवलेले आहे. त्यामुळे महापालिका आयुक्त डॉ.पंकज आशिया यांनी एनडीआरएफ, टीडीआरएफचे प्रमुख संतोष कदम यांना लेखी प्रशस्तीपत्र देऊन सर्व जवानांचे अभिनंदन करीत यशस्वी काम केल्याबद्दल आभार मानले आहेत.सदर दुर्घटनेमध्ये २५ नागरिक जखमी झाले असून मृत्यूमुखी पडलेल्या रहिवाश्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो याकरिता जिलानी बिल्डिंग, पटेल कंपाऊंड या ठिकाणी उपस्थित पोलीस अधिकारी व पालिका अधिकारी, कर्मचारी सर्व जवानांच्यावतीने गुरुवारी सकाळी साडेअकरा वाजता श्रद्धांजली वाहण्यात आली ६५ तासानंतर काम बंद करण्यात आल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त शांताकुमार दिवटे यांनी दिली आहे.

## रसिका महाविद्यालयात शेततळ्यातील मत्स्य संवर्धनावर राष्ट्रीय वेबिनार संपन्न

**देवणी/प्रतिनिधी**

येथील कै. रसिका महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने शेततळ्यातील मत्स्य संवर्धन या विषयावर राष्ट्रीय वेबिनार घेण्यात आला. मत्स्यपालन हा शेतीपूरक व्यवसाय आहे. या व्यवसायातून शेतकऱ्यांना चांगला आर्थिक फायदा होऊ शकतो. त्यासाठी शेतकऱ्यांना शास्त्रशुद्ध पद्धतीने मत्स्यपालन करण्याचे ज्ञान मिळावे या उद्देशाने या वेबिनार चे आयोजन करण्यात आले होते. शेततळ्यात कोणत्या जातीचे वे मासे पाळावेत, त्यांना कोणते खाद्य देण्यात यावे, शेततळ्याचे व्यवस्थापन कसं करावं इत्यादी अनेक महत्त्वाच्या मुद्द्यावर मत्स्य विज्ञान महाविद्यालयातील डॉ. अजय कुलकर्णी यांनी सविस्तर असे मार्गदर्शन करून शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांचे समाधानकारक उत्तरे दिलीत.

या वेबिनारमध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून ६९० शेतकऱ्यांनी नाव नोंदणी करून या कार्यक्रमाचा लाभ घेतला. या वेबिनारचे अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर हे होते. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संजय ननावरे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे यांनी केले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप संस्था सचिव गजानन भोपणीकर यांनी केले. या वेबिनारचे आयोजन प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. पुरुषोत्तम मोरे डॉ. सुदर्शन पेडगे व IQ-C समन्वयक प्राध्यापक अंकुश भुसावळे यांनी केले. हा वेबिनार यशस्वी होण्यासाठी डॉ. पुरुषोत्तम मोरे डॉ. सुदर्शन पेडगे प्रा. अंकुश भुसावळे, डॉ. व्ही. एस. मोरे, डॉ. योगेश मुळे, डॉ. सचिन चामले, प्रा. अंकुश भास्कर इत्यादींनी परिश्रम घेतले.

### अवैध पाणीविक्रेत्यांना वसई-विरार महापालिकेचा दणका

# वसईतील दोन पाणी प्लान्टला ठोकले सील

**वसई/प्रतिनिधी**



वसई तालुक्यात अवैध पाण्याची विक्री करून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ मांडणाऱ्या अवैध पाणी विक्रेत्यांना वसई-विरार शहर महानगरपालिकेने कारवाईचा दणका दिला आहे. याबाबत लोकमतने बातमी प्रसिद्ध करून वाचा फोडल्यानंतर ही कारवाई करण्यात आल्याचे बोलले जात आहे. वसई पूर्वेतील दोन अवैध पाणी प्लान्ट सील करून संबंधित पाणी विक्रेत्यांवर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्याचे काम सुरू आहे. महापालिकेने केलेल्या कारवाईनंतर अवैध पाणी विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत. कोरोना काळात दर्जेदार बिस्लेरी कंपनीच्या जारमध्ये अशुद्ध पाणी भरून ते नागरिकांना विकण्याचा प्रताप या पाणी विक्रेत्यांनी हाती घेतला आहे. महापालिकेच्या वालीव विभागाचे सहआयुक्त सुरेंद्र पाटील यांनी आरोग्य विभागाचे अधिकारी सुखदेव दरवेशी यांना कारवाईच्या सूचना दिल्यानंतर त्यांनी आपल्या पथकासह सदर अनधिकृत पाणी प्लान्टवर कारवाई केली. सध्यस्थितीत जुंचद्र येथील महालक्ष्मी व बापाणे येथील एका अवैध पाणी प्लान्टवर कारवाई करून ते सील करण्यात आले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, वसई पूर्वेतील राजावली, टिवरी, जुचंद्र, चंद्रपाडा, वाकीपाडा, बापाणे, चिंचोटी, सातिवली आदि भागात बेकायदेशीर पाण्याचे प्लान्ट आहेत. महापालिकेच्या वालीव विभागाने दोन अवैध पाण्याचे प्लान्ट सील केल्यानंतर इतर पाणी विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत. अन्न व औषध प्रशासनाची तथा महापालिका प्रशासनाची कोणतीही परवानगी प्राप्त न करताच अवैध पाणी प्लान्ट उभारून त्याद्वारे अशुद्ध, प्रक्रिया न केलेले पाणी नागरिकांना पुरवठा केला जातो. सध्याच्या कोरोना काळात नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न चव्हाट्यावर आला असताना अवैध पाणी विक्रेते मात्र वाहत्या गंगेत हात धुण्याचा प्रताप करत सुटलेत. पावसाळ्यात साथीच्या रोगांचा प्रसार मोठ्या प्रमाणात होतो. अशावेळी अशुद्ध पाण्याचा पुरवठा करणाऱ्या पाणी विक्रेत्यांवर तातडीने कारवाई करण्याच्या तक्रारी वालीव विभागात आल्या होत्या. तक्रारी प्राप्त होताच सुरेंद्र पाटील यांनी आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांना अवैध पाणी प्लान्टवर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. वसई पूर्व भागात ठाण मांडून बसलेल्या बऱ्याचशा अवैध पाणी विक्रेत्यांकडे कोणताही परवाना तसेच त्यांच्या व्यवसायाचे साधे रजिस्ट्रेशन नाही. सध्यसिस्थितीत या विभागात सुमारे २९ बेकायदेशीर पाण्याचे अवैध प्लांट सुरू आहेत. या सर्व अवैध पाणी प्लान्टवर कारवाई करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याची माहिती आरोग्य अधिकारी सुखदेव दरवेशी यांनी बोलताना दिली.

## मुस्लिम नागरिकांवर हल्ला करणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाईची मागणी

**देवणी/प्रतिनिधी**

होळ तालुका केज जिल्हा बीड येथे मुस्लिम समाजातील नागरिकांवर हल्ला करणाऱ्या समाजकंटक दहशतवाद्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी अन्याय अत्याचार व भ्रष्टाचार विरोधी समिती शाखा वलांडी च्या वतीने गृहमंत्री यांना तहसीलदार मार्फत निवेदन देऊन करण्यात आली.



दिनांक १६ सप्टेंबर रोजी धारूर येथील तबलिग जमातचे अमीर साहब (प्रमूख) काझी निजामूंदीन व त्यांचे साथीदार अंबाजोगाई येथे एका अंत्यविधी कार्यासाठी जात असताना रात्री ९ वाजण्याच्या सुमारास केज तालुक्यातील होळ गावाजवळ त्यांच्या कारमध्ये तांत्रिक अडचणी, बीघाड झाल्याने ते रस्त्याच्या बाजूला थांबले होते. या वेळी काही अज्ञात समाजकंटकांनी जातीवाचक व धार्मिक शिवीगाळ करून त्यांच्यावर प्रानघातक हल्ला केला. या हल्ल्यात काझी निजामूंदीन व सोहेल तांबोळी हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत.पुरोगामी महाराष्ट्रात धर्माच्या नावाने हल्ला होणे खूप चींताजनक बाब आहे या पूर्वी पुण्यात मोहसीन शेख व पालघर येथे साधूंची मॉबलिंचिंग द्वारे हत्या करण्यात आली होती. आता धारूरच्या लोकांना धर्माच्या अधारावर मारहाण करणे म्हणजे मॉबलिंचिंगचाच भाग आहे. व ही एका प्रकारे भारतीय संविधानाच्या मुळावर हल्ला करणेच आहे.जिल्ह्यात व राज्यात कायदा व व्यवस्था बिघडेल व सामाजिक वातावरण दूषित होईल या अनूषंगाने धर्माच्या नावावर हल्ला करून दहशत निर्माण करणाऱ्या समाजकंटकावर कडक कारवाई करण्यात यावी. अशी मागणी समिती तर्फे करण्यात आली. यावेळी अन्याय अत्याचार भ्रष्टाचार विरोधी समिती चे वलांडी शाखाध्यक्ष सगीर मोमीन, यासिन मुरशेद, ग्रा.प.सदस्य धनराज बनसोडे,मौलाना इब्राहिम तांबोळी, साबेर पठाण इत्यादींच्या निवेदनावर स्वाक्षरी आहेत.

## थोडक्यात वृत्तांत

### मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांचा सत्कार

औसा : औसा नगर परिषदेच्या वतीने सेवानिवृत्त आणि कार्यरत कर्मचाऱ्यांना लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ,अफसर शेख आणि मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांच्या प्रयत्नातून सातव्या वेतन आयोगाचा पहिला हप्ता दिल्याबद्दल सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेच्या वतीने मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला, मागील अनेक दिवसापासून सातवा वेतन आयोग लागू होऊनही कर्मचाऱ्यांना त्यांचा लाभ मिळाला नव्हता, सातव्या वेतन आयोगाचा हप्ता मिळावा म्हणून पालिका कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचारी प्रयत्नशील होते, अखेर नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांनी सेवानिवृत्त सह सर्व कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाचा पहिला हप्ता प्रधान केला असून औसा नगर परिषद ही जिल्ह्यातील अशी एकमेव नगरपरिषद आहे, सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे सर्व श्री अशोक बनसोडे, आलिखा पठाण, प्रभाकर जोशी, लतिक शेख तसेच श्रीराम ताकभाते ,महमूद शेख ,अन्वर शेख ,भीमाशंकर मनगुळे आदींनी नगर परिषदेचे मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांचा सत्कार करून त्यांचे आभार मानले.


### राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहात

औसा : राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनाच्या निमित्ताने औसा येथील श्री कुमारस्वामी महाविद्यालयातील रासेयो विभागाने राष्ट्रीय सेवा योजना दिनाचे आयोजन केले होते. प्रस्तुत कार्यक्रमाला देशभरातील विभिन्न राज्यातून १६० पेक्षा ही अधिक प्राध्यापक व स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात शेख मसरत या रासेयो स्वयंसेविकेच्या स्वागतगीताने झाली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य, महेश्वर बेटकर हे होते. कार्यक्रमाचे उद्धघाटक स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे रा से यो संचालक डॉ.शिवराज जी बोकडे सर हे होते. उद्धघाटन प्रसंगीं त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची समाजविकासात भूमिका या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. याप्रसंगी त्यानी समाजावर, राष्ट्रावर वारंवार अनेक आपत्ती येतात त्याप्रसंगी रासेयोने स्वतःहून पुढे येऊन सहकार्याची भूमिका घेतली आहे.तसेच अलीकडे पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकास, रक्तदान, अवयव दान, स्त्री-पुरुष समानता, मुलगी वाचवा, ग्रामीण संस्कृतीशी जुळवून घेणे,तरुणांमध्ये श्रमसंस्काराचे बीजे रोवणे यासारख्या ज्वलंत विषयावर राष्ट्रीय सेवा योजनेतील प्रत्येक स्तरावरील घटक जीव ओतून काम करत आहे असे मत व्यक्त केले. नियोजित व्याख्यान मालेतील वक्ते डॉ.प्रज्ञा देशमुख मॅडम यांचा परीचय डॉ. अनिता ढोले यांनी करून दिला. डॉ.प्रज्ञा देशमुख मॅडम यांनी स्त्री-पुरुष समानता आणि जागतिकीकरणया विषयावर आपले अनमोल विचार मांडले. तर अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेश्वर बेटकर सर यांनी केला. कार्यक्रमाचे आभार प्रा.सुधीर गरड यांनी मांडले.

### अंबेगाव येथे शेतकऱ्याची पशुधनाची चोरी

देवणी : देवाणी तालुक्यातील मौजे अंबेगाव येथील शेतकरी नरसिंग मधुकर काटमपल्ले यांनी शेतातील जनावरे गोठ्यात बांधून कांही कामानिमीत्त तुगाव येथे गेले होते. परंतु त्यांना वाहन अडचणीमुळे गावाकडे येण्यास उशीर झाल्याने ते रात्री दहा वाजता शेतात गेले असता आठ महिन्याची एक गाबण गाय व एक कालवड किंमत सत्तर हजार रुपायचे जनावरे शेतातील गोठ्यात दिसुन आले नाहीत. तसेच भावकितील लोकांसोबत मागील कांही वर्षापासुन जमिनवाद होता. सदरील जमीनीचे प्रकरण कोर्ट डिग्री प्रमाणे जमिनीचा ताबा कायदेशीर फिर्यादीला मिळाला असल्याचे फिर्याद मध्ये सांगण्यात आले आहे. खोडसाळपणाने भावकितील लोकांनी बुधवारी रात्री नऊ ते दहा वाजण्याच्या सुमारास सत्तर हजार रुपये किंमतीचे पशुधन चोरून नेल्या प्रकरणी नरसींग मधुकर काटमपल्ले यांच्या फिर्यादीवरुन गुरुवारी सहा अरोपीच्या विरोधात देवणी पोलीस ठाण्यात गु.र.न.0१९0 कलम ३७९,३४ भा.द.वी. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आसुन पुढील तपास पोलिस नाईक विनायक कांबळे हे करीत आहेत.

### सादुराम कांबळे यांचे निधन



देवणी : देवणी खुर्द येथील बौद्ध उपासक सादुराम भद्राजी कांबळे यांचे वयाच्या ९५व्या वर्षी अल्पश्या आजाराने निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी चार मुलं एक मुलगी नात नातवंड असा परिवार असून त्यांच्यावर शुक्रवारी दि २५ सप्टेंबर रोजी दुपारी त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. कॉंग्रेस पक्षाचे जिल्हा सरचिटणीस अनिल कांबळे यांचे ते वडील होते.

### इंद्राळ येथील अल्पवयीन मुलीचे अपहरण

देवणी : इंद्राळ येथील अल्पवयीन मुलीस झोपलेल्या ठिकाणाहून पळवून घेऊन गेल्या प्रकरणी देवणी पोलीस ठाण्यात सोमवार दि.२१ सप्टेंबर रोजी रात्री साडे सात वाजण्याच्या सुमारास अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत देवणी पोलिसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी कि १३ वर्षे ६ महिने वय असलेली अल्पवयीन मुलगी दि.२७ ऑगस्ट रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास जेवण करून झोपली होती. फिर्यादीने झोपेतून उठून पाहिले असता त्याची मुलगी झोपलेल्या ठिकाणी दिसली नाही. तीला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी पळवून घेऊन गेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी मुलींच्या वडीलांच्या फिर्यादीवरून देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर १८९/२०२० कलम ३६३ IPC प्रमाणे अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा नोंद झाला आसुन अद्याप अरोपी सापडले नसल्याचे तपास अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक शिंनगारे यांनी सांगितले.




**शासनाच्या आदेशानुसार मौजे नेकनाळ ता.देवणी येथे आपले कुटुंब आपली जवाबदारी अभीयाण अंतर्गत गावितील सर्व कुटुंब व कुटुंबातील सर्व व्यक्तीचे तापमान व आक्सीजनचे प्रमाण आशा कार्यकर्ती यांच्या मार्फत करण्यास सुरुवात केली. याप्रसंगी देवणी येथील डॉ.संजय घोरपडे,व ग्रामसेवक इश्वर मुर्के यांच्या उपस्थित अभियानास प्रारंभ करण्यात आला.**

# बॉलीवडूची गर्दुल्ली गँग

नशा कोणतीही असो. ती माणसाला विनाशाकडे नेत असते. दारू पासून अमली पदार्थापर्यंत जितक्या काही वेगवेगळ्या प्रकारच्या नशा आहेत त्या माणसाचे शरीर आणि मन दोन्ही पोखरून टाकतात. दारूमुळे तर कित्येक कुटुंब उध्वस्त झाली आहेत. तरीही सरकार कडून दारूबंदीची अंमलबजावणी केली जात नाही. कारण दारू पासून सरकारला मोठा महसूल मिळतो. थोडक्यात जिथे सरकारचा फायदा आहे किंवा जिथे सरकारमधील लोकांचे किंवा त्यांच्या कुटुंबियांचे हात गुंतलेले आहेत अशा कुठल्याही बेकायदेशीर पदार्थावर ते हानिकारक असले तरी सरकार मनापासून कारवाई करील असे वाटत नाही. सुशांत सिंह आत्महत्या प्रकरणात ड्रगचा अँगल समोर येताच नोर्कोटिक्स कंट्रोल ब्यूरो अर्थात एनसीबी कडून चौकशीला सुरवात झाली आहे. पण अमली पदार्थाचे साम्राज्य संपूर्ण जगभर पसरलेले असून त्यावर कारवाई करायची म्हटल्यास कुठल्याही देशातील तपास यंत्रणांना ते शक्य नाही. कारण या व्यवसायात बड्या उद्योगपती पासून मोठमोठ्या राजकारण्यांपर्यंत अनेकांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभाग असतो. दारू आणि गांजा जितका स्वस्त मिळतो तितके हेरोयीन, एमडी सारखे अमली पदार्थ स्वस्त मिळत नाही. त्यामुळे या अमली पदार्थाची विक्री हाय सोसायटीतील लोकांमध्ये होते. मुंबई सारख्या शहरात जे ड्रग पेलडर आहेत त्याचे ग्राहक हाय प्रोफाईल आहेत. ज्यात बॉलिवूड मधील नट-नट्या, उद्योगपती आणि पुढाऱ्यांची व्हाय्यात गेलेली मुले, फॅशन डिझायनर, कॉलेजात शिकणारी बड्या अधिकाऱ्यांची मुले, फाईव स्टार हॉटेल मध्ये धंदा करणाऱ्या हाय प्रोफाईल वेश्या या सर्वांना अमली पदार्थ लागतात आणि ड्रग माफियांकडून ते पुरवले जातात. मात्र हे पांढरं विष आजच्या तरुण पिढीला कशा प्रकारे बरबाद करुन टाकतात ते नुकत्याच येवुन गेलेल्या उडता पंजाब या चित्रपटात दाखवले गेले आहे. अमली पदार्थाची नशा इतकी भयानक असते की ड्रग एडिक्ट तरुणीला जर ड्रग मिळाला नाही तर ती इतकी व्याकुळ होते की वेश्या व्यवसाय करायलाही मागे पुढे पाहत नाही. ड्रगच्या आहारी गेलेल्या उच्चभ्रू कुटुंबातील कित्येक मुली आज धंदा करीत आहेत. तर ज्या तरुणांना ड्रगचं व्यसन लागले आहे ते गुन्हेगारीकडे वळालेत. कुणी चोऱ्या करीत आहेत, कुणी दुसऱ्याला फसविण्याचा धंदा करीत आहेत. तर काही सुपारी किलर बनलेत. आज मुंबई सारख्या महानगरांमध्ये जी महाविद्यालये आहेत त्यातील बहुतेक महाविद्यालयांचे म्हणजेच त्या कॉलेजात शिकणाऱ्या काही मुला-मुलींचे ड्रग पेलडर लोकांशी कनेक्शन आहे आणि अगदी आरामात त्यांना घर बसल्या किंवा कॉलेज परिसरात सुधा ड्रग उपलब्ध होतो. आता हे सर्व एनसीबीला माहीत नाही असे होऊच शकत नाही. एनसीबीला सर्व काही माहीत होते. पण या व्यवसायातील बड्या लोकांचा जो वावर आहे, त्यामुळे एनसीबीचे हात बांधलेले होते. त्यामुळे कारवाई करता येत नव्हती. मुंबई पुण्यासारख्या शहरांमध्ये ज्या रेव्ह पार्ट्या आयोजित केल्या जातात त्या प्रत्यक्षात ड्रग पार्ट्या असतात आणि त्यात थोरा मोठ्यांची मुले-मुली सामील झालेल्या असतात. या पार्ट्यामध्ये प्रामुख्याने तीन गोष्टी चालतात. महागडी दारू, ड्रग आणि सेक्स. पोलिसांनी आजवर अनेक रेव्ह पार्ट्यांवर धाडी टाकल्यात. त्यात अनेक बड्या घरातील मुले-मुली सापडल्या. पण त्यांच्यावर कारवाई झाली का? तर अजिबात नाही. आणि हे सगळ ऐवढ्या साठीच सांगायचं आहे की सध्या बॉलिवूड मधल्या नट  नट्यांची जी चौकशी होणार आहे त्यातून काहीच निष्पन्न होणार नाही आणि निष्पन्न झाले तरी बॉलिवूड मधल्या लोकांची एवढी वरपर्यंत पंहुच आहे की त्यांच्यावर कारवाई होईल असे वाटत नाही. आता हेच बघा ना ड्रग रॅकेटमध्ये दीपिका सारख्या बड्या अभिनेत्रींचे नाव येताच आणि तिला चौकशीसाठी एनसीबीकडून समन्स जाताच तिच्या पतीने मुंबईत १२ वकिलांची फौज तयार ठेवली आहे. त्यामुळे दीपिकाचे काय वाकडे होणार? कारण अमली पदार्थावर भारतात बंदी असली तरी अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यात शिक्षेची मोठी तरतूदच नसल्याने ड्रग माफिया आणि त्यांचे ग्राहक बिनधास्त आहेत. बॉलिवूड मधील कुणाचेही नाव या ड्रग रॅकेटमध्ये येऊ देत त्यांचं काहीच वाकड होणार नाही. रिया चक्रवर्ती पोलिसांच्या ताब्यात आहे. ती एका संशयीत आत्महत्येच्या प्रकरणात आरोपी असल्याने आणि याच ड्रगचा वापर करून सुषांतला ठार मारलेले असल्याचा संशय तपास यंत्रणांना असल्याने सीबीआय किंवा एनसीबी सहजा सहजी रियाला सोडायला तयार नाही. बाकी या केसमध्ये अटक झालेल्या दोन ड्रग पेलडरला जामीन झालाच ना! दीपिका, सारा, श्रद्धा, श्रुति, करिश्मा, प्रकाश यांचा जरी या प्रकरणात सहभाग आढळला तरी त्यांना सहजपणे जामीन मिळू शकतो. कारण त्या केवळ ग्राहक आहेत. ड्रग विक्रेत्या नाहीत. त्यामुळेच त्या बिनधास्त आहेत. आता प्रश्न असा येतो की ड्रगमुळे जर एखाद्या माणसाचा जीव गेला असेल आणि माणसाचा जीव घेणारे हे ड्रग अगदी सहज उपलब्ध होत असतील, तर सरकार केवळ तमाशा बघतच राहणार आहे का? ड्रग विक्रेत्यांवर कारवाई करण्यासाठी अमली पदार्थ विरोधी कायद्यात काही बदल करणार आहे की नाही? बरे हे ड्रग प्रकरण केवळ बॉलिवूड पुरतेच मर्यादित असते तर एकवेळ दुर्लक्ष करण्यासारखे होते. पण हे ड्रग आमच्या शाळा कॉलेजपर्यंत पोहचून आमची तरुण पिढी बरबाद करीत आहे त्याचे काय? सरकारला आता या गँग ऑफ गांजपुर बाबत काहीतरी निर्णय घ्यावाच लागेल. वास्तविक हा काही नवीन विषय नाही. पण कुठल्याही सरकारने त्याकडे गांभीर्याने पाहिलेले नाही. त्यामुळे भारतात हे पांढर विष अगदी सहजपणे पोचल आणि त्याचे दुष्परिणाम हळू हळू जाणवू लागले आणि त्याच बरोबर संपूर्ण बॉलिवूडला या ड्रॅगन कसा विळखा घातला ते आता स्पष्ट होऊ लागले आहे. दीपिका सारखी आघाडीची नायिका ड्रग व्हॉट्सअॅसची अॅडमिन होती आणि नियमितपणे तिची ड्रग पेलडर लोकांशी चाट सुरू होती हे आता स्पष्ट झालेलं आहे. त्यामुळे दीपिकाची आणि तिच्या कॉन्टॅक्टमध्ये असलेल्यांची यातून साहजा सहजी सुटका होईल असे वाटत नाही आणि भलेही या प्रकरणातून तिला दिलासा मिळाला तरी गर्दुल्ली म्हणून तिच्यावर जो शिक्का बसलाय तो आयुष्यभर तिची पाठ सोडणार नाही. कदाचित या शिक्क्याचां तिच्या करीयरवर सुद्धा परिणाम होण्याची शक्यता आहे. केवळ तिच्याच नाही तर या ड्रग रॅकेटमध्ये बॉलिवूड मधील जे जे कुणी अडकले आहेत त्यांचे आता काही खरे नाही असेच म्हणावे लागेल.

# महाराष्ट्र द्रोह्यांची कोल्हेकूई...



**लातो के भूत बातो से नही मानते!**
**अर्णव जैसे बेवकुफ महाराष्ट्र की ताकत को नहीं जाणते...**

आर्थिक, सामाजिक आणि औद्योगिक दृष्ट्या देशात अव्वल असलेला शाहू, फुले, आंबेडकरांचा महाराष्ट्र आजही देशातील ७० टक्के जनतेला पोसतो आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातून रोजी रोटीसाठी आलेल्या गोरगरीब माणसाला मुंबई, पुण्यासारख्या महानग्रंमध्ये काम धंदा मिळाला. त्यामुळे तो जिवंत राहिला त्याला महाराष्ट्राने त्याला पैसा, इज्जत आणि वेगवेगळ्या क्षेत्रात मोठे होण्याची संधी दिली. त्या शिवप्रभूंच्या महाराष्ट्राची आज हिंदी इलेक्ट्रॉनिक मीडियाने सुपारी घेतली आहे. असा एकही दिवस जात नसेल की ज्या दिवशी या लोकांनी त्यांच्या चॅनल वरून महाराष्ट्राची बदनामी केली नसेल! पण हे सगळ कशासाठी? आमच्या महाराष्ट्राने यांचे काय घोडे मारलेत? अर्णव गोस्वामी नावाचा एक हरामखोर सतत सुपारी घेतल्या प्रमाणे महाराष्ट्राच्या विरोधात गरळ ओकत आहे आणि गुरुवारी स्वतःला पत्रकार म्हणवून घेणाऱ्या त्याच्या कथित पत्रकारांनी महाराष्ट्रातल्या पत्रकारांना चाय बिस्कीट वाले म्हणून हिणवले अरे तुम्ही आणि तुमचा अर्णव केंद्राने फेकलेल्या शिळ्या पावाच्या तुकड्यावर जगतोय आणि ते जिकडे बोट दाखवत असतात त्यांच्यावर अर्णव भुकतोय याला पत्रकारिता म्हणतात का? या देशात अनेक गंभीर प्रश्न असताना अर्णावच्या भिक्कार रिपब्लिक चॅनलवर सुशांतसिंगचे तुणतुणे दिवसभर वाजवले जातेय. त्या अर्णवला आपल्या चॅनलवर काय दाखवायला हवं आणि काय नाही याची जराही अक्कल नसेल तर त्याचा चॅनल लोकांनी का बघावा? वास्तविक संपूर्ण महाराष्ट्राने रिपब्लिक चॅनलवर बहिष्कार टाकायला हवा केबल ऑपरेटर नी तो चॅनल ब्यान करायला हवा. अरे आपल्या महाराष्ट्राची बदनामी जो माणूस करतोय त्याला तुम्ही कशासाठी वाव देताय, तसेही त्याचे ते भिक्कार चॅनल कोणी बघत नाही. तरीही तो आपणच इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये श्रेष्ठ असल्याचा आविर्भाव दाखवतोय. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना अरे तुरे म्हणण्यापर्यंत त्याची मजल गेलीय.

त्यामुळे आज जर त्याला महाराष्ट्राची ताकत दाखवली नाही तर हा पिसाळलेला कुत्रा कुणालाही चावत सुटेल. म्हणूनच त्याच्या कथित पत्रकारांना गुरुवारी आमच्या पत्रकारांनी फटके दिले ते बरेच झाले. या फटक्यातून अर्णवने धडा घ्यावा आणि भविष्यात महाराष्ट्राच्या नादाला लागू नये. कारण महाराष्ट्र हा लाढवय्यांचा आहे, ज्याने बलाढ्य औरंगजेबाला इथल्या मातीत गाडले, ज्यांनी इंग्रजांना सलो की पळो करून सोडले. त्या महाराष्ट्रासाठी अर्णव सारखे भटके कुत्रे किस झाड की पत्ती आहेत. अरे भारतातल्या पत्रकारितेचा जन्मच महाराष्ट्रात झाला. पत्रकारिता ही महाराष्ट्रात एक लोकजागृतीची, लोक शिक्षणाची एक चळवळ होती. या चळवळीचा भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात मोठे योगदान होते. त्यामुळे अर्णव सारख्या भुरट्या पत्रकारांनी महाराष्ट्राला आणि मराठी पत्रकारांना पत्रकारिता शिकवू नये. चाय बिस्कीट आणि फेकलेल्या शिळ्या पावाच्या तुकड्यावर तुम्ही जगतात. आमचा मराठी पत्रकार मेहनतीची भाजी भाकरी खावून सच्ची पत्रकारिता करतोय. तेंव्हा अशा मराठी माणसाच्या नादाला लागू नका. नायतर काय परिणाम भोगावे लागतील. याची तुम्ही कल्पनाही करू शकणार नाही. गुरुवारी फक्त महाराष्ट्रातल्या पत्रकरांचेच फटाके पडलेत. यापुढे प्रत्येक मराठी माणूस रस्त्यावर उतरेल आणि त्याचा मार काय

**संध्या स्ट्रोक**
**सोनू जाधव**

असतो ते जेंव्हा कळेल, तेंव्हा मुंबई महाराष्ट्राचे नाव घेण्याची सुद्धा तुमची हिम्मत होणार नाही. आम्हाला आश्चर्य वाटते ते एकाच गोष्टीचे ते म्हणजे इतर छोट्या छोट्या गोष्टीत मराठी बाणा दाखवणारे यावेळी मात्र गप्प कसे? अर्णव सारख्या महाराष्ट्राच्या शत्रूच्या पार्श्वभागावर लाथा घालण्याच त्यांच्यात साहस नाही का? महाराष्ट्र खरोखरच इतका कमजोर झालाय का? मराठी माणसाच्या जीवावर मोठे झालेले आणि महाराष्ट्राचा स्वाभिमान कॅश करून निवडणुका जिंकणारे सत्तेसाठी इतके लाचार झालेत की अर्णव सारख्या फडतूस माणसांकडून अपमान सहन करून घेण्याची त्यांच्यावर पाळी आलीय.

अर्णव त्याच्या चॅनल वरून बातम्या सांगताना किंवा डिबेट करताना आज पुरा भारत आपसे पूछ रहा है असे नेहमी म्हणतो. अरे पण भिकार चोटा तुझा रिपब्लिकन चॅनल म्हणजे पुरा भारत आहे का? आणि तुझा रिपब्लिकन चॅनल तू आणि तुझ्या घरच्या लोकांशिवय कोण बघतोय? तरी तुला इतकी मस्ती? अर्णवने सगळ्यांच्या नादाला लागावे पण महाराष्ट्र आणि मराठी माणसाच्या नादाला लागू नये अन्यथा त्याचे दिल्लीत बसलेले बापही त्याला वाचवू शकणार नाही. एखाद्या मोठ्या राज्याची तिथल्या मुख्यमंत्र्यांची तिथल्या पोलिसांची बदनामी करणारी पत्रकारिता त्याला मातीत गाडल्याशिवाय राहणार नाही. हा महाराष्ट्राचा अर्णवला निर्णायक इशारा आहे. गुरुवारी पडलेल्या फटक्यातून त्याच्या पत्रकारांनी आणि त्याने धडा घेतला तरच त्याची धडगत आहे. अन्यथा मराठी माणूस त्याचे काय करेल त्याचा नेम नाही.

**(मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३)**

# डॉ.मनमोहन सिंग राजवट हजारपटीने भारी होती!

'देश रसातळाला गेला आहे', अस विधान माजी मुख्यमंत्री, आजी विरोधी पक्षनेते, जलयुक्त शिवार योजना घोटाळा फेम ' बोलबच्चन देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. त्यांच्या काळात त्यांनी ढोल बडवून, गाजावाजा केलेल्या जल शिवार योजने'च १० ते १२ हजार कोटी रुपयांचा घपला झाल्याचा ठपका मोदी सरकारचे ऑडीटर जनरल कॅग' यांनी ठेवलेला आहे. कॉंग्रेसच्या मुख्यमंत्र्यावर असा ठपका ठेवला गेला असता तर, हेच फडणवीस थयथया नाचले असते. पंतप्रधानांच्या ७० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच अभिनंदन करताना देश रसातळाला गेल्याची आठवण फडणवीसांना झाली. गेले ६ वर्षेमोदी पंतप्रधान आहेत. केंद्रात मोदींच राज्य आहे, सर्वेसर्वा मोदी आहेत. कॅबिनेट नामधारी आहे, जीएसटी पासून नोटाबंदीपर्यंत आणि देशातले दहा विमानतळ अदानींनां विकून टाकेपर्यंत मोदी महाराज हवं ते करत आहेत. देशातले कारखाने बंद पडत आहेत. १८ कोटींच्या संख्येने लोक बेरोजगार झाले आहेत. २०१४ च्या भावाच्या तुलनेत महागाई २०० पट वाढलेली आहे, देश रसातळाला जाण्याची ही सगळी लक्षण आहेत, विकासदर घरसलेला आहे. १ कोटी ७५ लाख उद्योग बंद पडण्याच्या मार्गावर आहेत असे सरकारचे अहवाल आहेत. भाजपाच्या या सहा वर्षाच्या सत्ताकाळात बँक घोटाळ्यातील ३८ आरोपी देशाच्या बाहेर पळून गेले आहेत. अदानी नावाची उद्योग बांडगुळे कमालीची वाढीला लागलेली आहेत. या स्थितीत देश रसातळाला जाणारच आहे. रिझर्व्हबँकेकडून ५४ हजार कोटी रुपये वरकड रक्कम खर्चाला घेण्याची वेळ मोदी सरकारवर आलेली आहे. मनमोहन सिंग सरकारवर ही वेळ कधीही आली नव्हती. विमानतळ विकावे लागले नव्हते, मोदी हवं ते विकायला निघाले आहेत. सरकार विकायची वेळ न येवो म्हणजे मिळवलं! अशी भयानक आर्थिक स्थिती आहे. देश आर्थिक अराजकाच्या उंबरठ्यावर आहे, असे रिझर्व्ह बँकेचे चार-चार माजी गव्हर्नर सांगत आहेत आणि आजी गव्हर्नर सांगत आहेत. एक डॉलरची किंमत ७४-७५ रुपयांवर गेली देश रसातळाला जाण्याची हीच लक्षणं आहेत. कोरोनामध्ये ताप येणं, घसा खवखवणं ही लक्षण जशी मानली जातात, तशी आर्थिक गर्तेमध्ये जाताना देशाची काही लक्षणं आहेत, ही लक्षणं स्पष्ट दिसू लागली आहेत. त्यामुळे देश रसातळाला चाललाय, हे फडणवीसांच म्हणणं अगदी बरोबर आहे. आयुष्यात एवढ खरं ते पहिल्यांदाच बोलले असतील! पण, देश रसातळाला चाललाय हे बोलल्यावर तो कोणामुळे चाललाय? हे सांगावच लागणार. देशाच्या सध्याच्या पंतप्रधानांच नाव घेण्याची हिंमत नाही. सत्य बोलण्याची कुवत नाही, मग सहा वर्षापूर्वीच्या पंतप्रधानांची म्हणजे डॉ.मनमोहन सिंग यांची फडणवीसांना आठवण झाली. देश रसातळाला गेला तो मनमोहन सिंग यांच्यामुळे अशी बौध्दिक दिवाळखोरी त्यांनी जाहीर केली. फडणवीसांना बोलबच्चन का म्हणतात, हे त्यांच्याच मुखाने त्यांनी जणू सांगून टाकलेलं आहे! मनमोहन सिंग २३ मे २०१४ पर्यत पंतप्रधान होते, १८ सप्टेंबर २०२० ला म्हणजे सहा वर्षानी फडणवीसांना त्यांच नाव आठवलं, २४ मे २०१४ ला फडणवीस बोलले असते, तर त्यांच्या बोलण्यात काहीतरी राजकीय शहाणपण दिसलं असतं, महाराष्ट्लासारख्या पुरोगामी राज्याच नशिबान मुख्यमंत्रीपद मिळालेला हा माणूस किती भंपक हे



त्यांनी स्वत: दाखवुन दिलं, मोदींच नाव घेतल तर, मागे ईडीची चौकशी लागली असती, म्हणून मनमोहन सिंगांच्या आड लपून मोदींची चमचेगिरी करण्याचं काम फडणवीसांना कराव लागतयं. देशाच्या अर्थमंत्री निर्मलाकाकू आर्थिक आपत्तीचा खापर कोरोनाची करणी देवाची आहे असे सांगून हात झटकून मोकळ्या झाल्या. कोरोनाची महामारी देवाची करणी असेल, मग देशाची आर्थिक महामारी कोणाची देणगी आहे? देशातल्या सामान्य माणसाचं स्पष्ट मत आहे, हा सगळा आर्थिक विचका मोदींच्याच काळात झालेला आहे. मनमोहन सिंग अर्थतज्ञ होते, मोदी महाराज भाषण तज्ञ आहेत असं त्यांच्या भाषणातून दिसतं. सरकारच्या चालवायला रिर्झव्ह उधार उसनवारी करण्याची वेळ मनमोहन सिंग यांच्यावर आली नव्हती. निवडणुक जिंकण्यासाठी मनमोहन सिंग यांना पुलवामा करायला लागला नव्हता, 'मन की बात' दिल की बात (अशा बाता) आणि भावनात्मक राजकारण करण्याची वेळ मनमोहन सिंग यांच्यावर आली नव्हती. थाळ्या वाजवा आणि पणत्या लावा अशा भंपक घोषणांनी कोरोना हटत नाही हे माहित असताना, लोकांना गुंगवण्याचा तो कार्यक्रम केला गेला. राम मंदिर, कलम ३७० हे सगळे भावनात्मक कार्यक्रम मोदींनी उत्तमपणे पार पाडले, पण देश रसातळाला चाललाय हे त्यांना अजून कळलेलं नाही. किंवा कळलं असल तरी लबाड उद्योगपतींच्या हातात देशाच्या संस्था विकण्याचं काम त्यांनी चालू ठेवलेलं आहे. त्यामुळे देश रसातळाला जाणारच आहे. चॅनेलवाले धुमाकुळ घालताऐत आर्थिक आघाडीवर देश कोसळत असल्याबद्दल देश की बडी बहस' करण्याचा वकूब आणि हिंमत ना अर्णबमध्ये आहे, ना रजत शर्मा मध्ये ना पोरकट मुलाखत घेणाजया अमित देवगणमध्ये आहे, हे सगळे चॅनेलवाले मोदींच्या नावावर पाणी भरताहेत आणि फडणवीसांसारखे बोलबच्चन सहा वर्षापूर्वीच्या पंतप्रधानांना दोषी धरताहेत. डॉ.मनमोहन सिंग यांच्या काळात मोदींच्या आजच्या काळातील आर्थिक स्थितीपेक्षा देश हजारपटीने सक्षम होता, त्यावेळचे पंतप्रधान रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर होते, देशाचे पाच वर्षे माजी अर्थमंत्री होते, ९ वर्षेपंतप्रधान होते, अर्थतज्ञ म्हणून जगात त्यांना मान्यता होती आणि आजही आहे. रेनकोट घालून बाथरुममध्ये आंघोळ केली, असा आरोप त्यांच्यावर झाल्याने ही मान्यता जरासुध्दा कमी झालेली नाही. उलट बाथरुमचे दार बंद करुन अंघोळ करणाजयांची अर्थव्यवस्था सहा वर्षात मात्र उघडी पडलेली आहे.

१) डॉ. मनमोहन सिंग यांच्या काळातील देशाचा विकासदर ८.५ टक्क्यापर्यंत पोहोचला होता. आता हा विकासदर ३ च्या खाली गेला आहे.

२) २०१४ चा पेट्रोल दर लीटरला ६५ रुपये होता, डिझेल ५२ रुपये होत, आता डिझेल ८० रुपये आणि पेट्रोल ८८ रुपये आहे.

३) त्यावेळचा डॉलरचा दर ६१ रुपये होता आता ७५ रुपये आहे

४) देशातल्या सर्व उद्योगांमध्ये औद्योगिक उत्पादन तेव्हा ९८ टक्के होते आज २३ टक्के आहे.

५) २०१४ साली जीवनावश्यक वस्तूंचे भाव काय होते सांगा फडणवीस? तूरडाळ, गोडतेल जाऊ द्या कोंथिबीर, मिरची, कडीपत्ता भाव काय होते आणि आज काय भाव आहेत. आहेत, म्हणे मनमोहन सिंगामुळे वाढले आहेत ना? महगाई की पडी मार, अब की बार मोदी सरकार' अशा घोषणा देऊन तुम्ही सत्तेवर आलात ना, आता महागाईचा बडगा गरीबाला ठार मारुन टाकीत आहे.

६) देश आर्थिक रसातळाला जात आहेत तो मोदी पंतप्रधान असताना मात्र नाव घेतलं जातय मनमोहन सिंग यांच.

७) सहा वर्षातल्या बेरोजगारांची संख्या १६ कोटींनी वाढली. मोदी प्रत्येक वर्षी २ कोटी रोजगार देणार होते, कुठे आहे ती घोषणा? मोदींची तुलना फडणवीसांनी स्वामी विवेकानंदाशी केली, कुठे विवेकानंद आणि कुठे हे मोदी, पुढच्या वाढदिवसाला फडणवीस मोदींची छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी करतील आणि त्यांच्या पुढच्या वाढदिवसाला प्रभू रामचंद्राशीसुध्दा करतील. सत्तेवर असलेल्या मोदींच्या आरत्या उतारणे एवढंच काम, देशाच आर्थिक दिवाळ निघायला आलं तरी यांना काय पडलंय. कोरोना मनमोहन सिंगांमुळे आला असं नाही म्हणाले ते नशिब समजा.

८) मनमोहन सिंग यांनी शेतकजयांचं ७० हजार कोटी रुपये कर्जमाफ केलं होतं

९) देशातल्या गरीबाला २ रुपये किलो गहू आणि १ रुपये किलो तांदूळ (प्रत्येक कुटुंबाला १०-१० किलो) ही योजना मनमोहन सिंग यांची होती. मोदींनी रसोई सिलेंडरच्या जाहीराती केल्या, कोट्यावधी रुपये त्या जाहिरातींवर खर्चकेला, जाहिरातीत स्वत:चे फोटो छापले आणि गरीब महिलांची फसवणूक केली, फक्त पहिला सिलेंडर स्वस्त भावात मिळाला. डॉ. मनमोहन सिंग यांनी अशी खोटी कामं कधीही केली नाहीत. भाषण देऊन बाता मारल्या नाहीत. प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख रुपये चढविण्याच्या भंपक गोष्टी केल्या नाहीत, मोदींची भाषण खोटी, मोदींच्या योजना खोट्या. बेरोजगरी आणि महागाईने मेटाकुटीला आलेला गरीब माणूस त्याचा संताप लोकशाही मार्गाने नक्की व्यक्त करील. फडणवीसांनी जलयुक्त शिवार योजनेत लबाडी केली, त्यांची लबाडी कॅगनेच पकडली. त्यांच्या भंपक भाषणातूनच ते उघडे पडत आहेत. कोरोनाच्या आड लपून देश फार काळ चालवता येणार नाही, आर्थिक विषयाची उत्तर भावनात्मक भाषणाने मिळणार नाहीत. देशाच्या संस्था विकण्याचा मोदींचा कार्यक्रम लोकच हाणून पाडतील. कोरोना महामारी देवाची करणी, आर्थिक महामारी यांचीच देणगी आहे. नेमके फडणवीस त्याबद्दल बोलणार नाहीत. पण भावनेच्या आहारी जावून देश मोदीच्या पाठी जाणार नाहीत, या देशातल्या शेतकजयांचे, कष्टकजयांचे, श्रम करणाजयांचे खरे शत्रू मोदी सरकारच आहे, हा गरीब माणूस जेव्हा लोकशाही मार्गाने पेटून उठेल, त्या दिवशी अंबानी, अदानी आणि हे चॅनेलवाले मोदी सरकार वाचवू शकणार नाहीत. सध्या एवढेच.

**- मधुकर भावे**

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : अॅड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

28 SEPTEMBER TO 04 OCTBER 2020 - 5 (CRIME SANDHYA):Layout 1 26/09/2020 8:06 PM Page 1



# बेकायदा वाळू साठा प्रकरणी 'त्या' पोलिसांवरील कारवाईत टाळाटाळ

**सोलापुर/इरप्पा बोरीकरजगी**

मंगळवेढा पोलिस ठाण्यात कार्यरत असणारे पोलिस नाईक गजानन पाटील (रा.लक्ष्मी दहिवडी) यांनी बेकायदा वाळू साठा केल्याप्रकरणात तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार स्वप्नील रावडे यांनी १ लाख ५६ हजार रुपयांचा दंड केला होता. लोकशाहीत कायदा हा सर्वासाठी समान असताना पोलिस अधिकाऱ्यांनी मात्र अदयापही त्या पोलिस कर्मचाऱ्यावर कुठलीच व कसलीच कायदेशिर कारवाई न केल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

पोलिस नाईक गजानन पाटील यांनी लक्ष्मी दहिवडी येथे अवैध वाळूसाठा केला होता. जिल्हयामध्ये कुठेही शासकीय ठेका गेल्या वर्षभरापासून नसताना या पोलिस कर्मचाऱ्याने अवैध मार्गाने वाळू वाहतूक करणारी वाहने अडवून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याऐवजी स्वतःच्या स्वार्थापोटी ती वाहने नेवून वाळूसाठा केल्याची पंचक्रोशीमध्ये चर्चा आहे. पोलिस प्रशासनाने मागील महिन्यात मारापूर येथून दोन वाळू वाहतूक करणाऱ्या बैलगाडया जप्त करून त्यांच्यावर गुन्हे दाखल केले. येथे पोलिस कर्मचाऱ्यांनी बेकायदा वाळू साठा करूनही गेल्या महिन्याभरात कुठलीच कारवाई त्या पोलिस कर्मचाऱ्यावर न केल्यामुळे पोलिस प्रशासनाचे कामकाज संशयाच्या भोवऱ्यात



> बेकायदा वाळूसाठा प्रकरणाची प्राथमिक माहिती अहवाल पोलिस अधिक्षकांना पाठविण्यात आलेली असून याची सखोल चौकशी केल्यानंतर पुढील अहवाल पाठविला जाणार आहे. पोलिस नाईक गजानन पाटील यांना महसूल प्रशासनाकडून कायदेशिर कारवाईची नोटीस मिळाली नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे.
>
> – जोतीराम गुंजवटे, वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मंगळवेढा

सापडले आहे. त्या वाळूसाठयावर तालुका दंडाधिकारी कारवाई करीत असताना पोलिस प्रशासन त्या पोलिसकर्मचाऱ्यावर का कारवाई करत नाही ? त्या पोलिस कर्मचार्‍ाला पाठीशी घालण्याचे नेमके कारण काय? असा संतापजनक सवाल नागरिकांमधून विचारला जात आहे. कारवाईबाबतच्या वृत्तपत्रातून बातम्याही प्रसिध्द होवून झाल्या असताना सुधा कोणाच्या आदेशाची पोलिस प्रशासन वाट पहातेय असा सुज्ञ नागरिकांतून सवाल केला जात आहे. महसूल प्रशासनाने कायदेशीर पंचनामा करून संबंधितांना दंडाची नोटीस बजावून दंड भरण्याचे फर्मान काढले होते. मुदतीत दंड न भरल्यामुळे पुढे ७/१२ वर बोजा नोंद करण्यात आला आहे.स्वतःला वाचविण्यासाठी पोलिस कर्मचाऱ्यांनी दुसऱ्याचे नाव पुढे करून वाळूसाठा त्याचा असल्याचा दावा केला होता. मात्र चौकशीत हा वाळूसाठा पोलिस कर्मचाऱ्याचा असल्याचे निष्पन्न झाल्याने महसूल अधिकाऱ्यांनी दोघांनाही दंडाची कारवाई केली आहे. त्या पोलिस कर्मचार्याने कारवाईची नोटीसच मिळाली नसल्याचा लेखी अजबाद दावा केला आहे. लक्ष्मी दहिवडीचे तलाठी यांनी दि.

> लक्ष्मी दहिवडी येथील बेकायदा वाळूसाठयाचा रितसर पंचनामा करून कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. पोलिस कर्मचारी गजानन पाटील यांना नोटीस बजावली होती. त्यांना आक्षेप असल्यास त्यांनी खुशाल अपीलात जावे.
>
> – स्वप्नील रावडे, दंडाधिकारी तथा तहसीलदार, मंगळवेढा

१५/०५/२०२० रोजी सकाळी ११.३० मि.दोन पंचासमक्ष पोलिस नाईक गजानन पाटील हे मिळून येत नसल्याने सदर दंडाची नोटीस बंद घरावर चिटकुन लावण्यात आली आहे. त्याचबरोबर ग्रामपंचायत कार्यालय, तलाठी कार्यालयावर चिटकळण्यात आल्याचे महसूल कार्यालयाकडून सांगण्यात आले. यावरून नेमके कोण खरे कोण खोटे असा प्रश्न आता नागरिकांनाच पडला आहे. पोलिस हे कायदयाचे रक्षक असताना ते आपल्या पदाचा गैरवापर कसा करतात याचा या वाळू साठा प्रकरणातून समोर आले आहे. नव्याने रूजू झालेले कोल्हापूर परिक्षेत्राचे महानिरिक्षक मनोज लोहिया यांनीच आता या कामी लक्ष घालून संबंधित पोलिस कर्मचार्यावर योग्य ती कायदेशिर कारवाई करावी अशी मागणी जनतेतून पुढे येत आहे.



# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने नरेंद्र अग्रवाल कोरोना योद्धा म्हणून सन्मानित

**लातूर/प्रतिनिधी**

लातूर येथील सुप्रसिद्ध उद्योगपती, समाजसेवक तथा अग्रवाल मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड एज्युकेशन सोसायटी महाराष्ट्राचे अध्यक्ष नरेंद्र अग्रवाल यांनी कोरोनाच्या काळात गरजूंना केलेल्या कामाची पावती म्हणून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, जिल्हा शाखा लातूरच्या वतीने कोरोना योद्धा म्हणून जिल्हाध्यक्ष अशोक देडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

जगावर कोरोना महामार्गाचे संकट असताना गोरगरीब वंचितांना सातत्याने मदत करणारे नरेंद्र अग्रवाल यांनी या संकटात गरजवंतांना सॅनिटायझर, मास्क वाटप, अन्नधान्य किट,वेळप्रसंगी आर्थिक मदत या कामाची दखल घेऊन पत्रकार संघाने आज त्यांचा कोरोना योद्धा म्हणून सपत्नीक जिल्हाध्यक्ष अशोक देडे यांच्या हस्ते शाल, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी जिल्हा संघटक महादेव डोंबे, जिल्हा सहसंघटक अफसर कारभारी, कोषाध्यक्ष अरुण कांबळे, सदस्य हारूण मोमीन आदींची प्रमुख उपस्थिती होती. समाजसेवेचा ध्यास घेणारे नरेंद्र अग्रवाल यांनी यापूर्वी वीस वर्षे नगरसेवक म्हणून काम पाहिले आहे.

किराणा होलसेल व्यापारी असोसिएशनचे उपाध्यक्ष, अमर गणेश मंडळाचे १० वर्षापासून अध्यक्ष, मूकबधिर मतिमंद विद्यालय, एमआयडीसी लातूरचे सचिव म्हणून काम पाहत आहेत. कुठलंही व्यसन नसलेले नरेंद्र अग्रवाल आजोबा व वडिलांचा समाजसेवा करण्याचा हातखंडा जणू ते जपत आहेत. या कामाची पावती म्हणून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ जिल्हा शाखा लातूरच्या वतीने त्यांचा कोरोना योद्धा म्हणून आज सन्मान करण्यात आला.

# प्रधानमंत्री पिक विमा योजनेमध्ये पिकाचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांनी तात्काळ अर्ज करावा –राज्यमंत्री संजय बनसोडे

**लातूर/करकरे अंबादास**

लातूर जिल्हयामध्ये यावर्षी आजअखेर सरासरीच्या १०५% पाऊस पडलेला असून काही महसूल मंडळामध्ये अतिवृष्टी सुध्दा झालेली आहे. तसेच मागील १० दिवसापासुन सतत पाऊस होत असून यामूळेही काही ठिकाणी पुर/क्षेत्र जलमय होऊन पिकांचे नुकसान होत आहे. यानुषंगाने नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. ज्या शेतकऱ्यांचे वर नमूद कारणाने नुकसान झालेले आहे असा कोणताही शेतकरी पंचनाम्यामधून सूटणार नाही याबाबत दक्षता घेण्याबाबत प्रशासनास सूचना दिलेल्या आहेत. प्रधानमंत्री पिक विमा योजनेमध्ये पिकाचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांनी ७२ तासाच्या आत अर्ज करावा, असे आवाहन संसदीय कार्य, पर्यावरण, सार्वजनिक बांधकाम, पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री



संजय बनसोडे यांनी केले आहे.

जिल्हयामध्ये पिक विमा भरलेल्या शेतकऱ्यांना त्यांचा वैयक्तीक शेतातील पिकाचे नुकसान झालेले आहे, अशा शेतकऱ्यांना ऑनलाईन तसेच ऑफलाईन पध्दतीने पिक नुकसान पूर्वसुचना देण्याकरीता सूविधा उपलब्ध आहे. पिक विमा योजनेमध्ये शेतात पाणी थांबून राहील्यामूळे झालेले नुकसान व पूराचे पाणी शेतात घूसल्याने झालेले नुकसान या दोन बाबींमूळे झालेले नुकसानी संदर्भात नुकसान भरपाई मिळू शकते. ज्या शेतकऱ्यांचे वरील कारणाने नुकसान झालेले आहे. अशा शेतकऱ्यांना ऑनलाईन अथवा ऑफलाईन पध्दतीने अर्ज करता येईल. ऑफलाईन अर्जासाठी प्रत्येक तालूक्याच्या तालूका कृषि अधिकारी कार्यालयामध्ये विमा कंपनीचा प्रतिनिधी उपलब्ध आहे. या संबंधाने शेतकरी या प्रतिनिधीकडे अर्ज करु शकतात अर्जासोबत पिक विमा भरल्याची पावती व ७/१२ उतारा कागदपत्र सादर करावीत.

शेतकरी ऑफलाईन अर्ज बँक/महसूल विभाग/कृषि विभाग यांच्याकडेही करु शकतील. ऑनलाईन अर्ज करण्यासाठी Crop Insurance मोबाइल पचा वापर करुन नुकसानीची सूचना देता येईल. तरी ज्या शेतकऱ्यांचे पिकांचे नुकसान झालेले आहे. त्यांनी घटना घडल्यापासून ७२ तासांच्या आत ऑफलाईन/ऑनलाईन अर्ज करावा असे आवाहन राज्यमंत्री बनसोडे यांनी जिल्हयातील शेतकऱ्यांना केले आहे.

# माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहिमेला नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन

पालघर/प्रतिनिधी

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणे कामी महाराष्ट्र शासनामार्फत माझे कुटुंब, माझी जबाबदारी मोहीम दिनांक १५ सप्टेंबर २०२० ते २५ ऑक्टोबर २०२० या कालावधीत संपूर्ण राज्यात राबविण्यात येत आहे. या मोहिमेंअंतर्गत ग्रामविकास विभाग ,आरोग्य व एकात्मिक बाल विकास विभागामार्फत नियुक्त कर्मचारी व स्वयंसेवक दररोज कार्यक्षेत्रातील किमान ५० घरांना प्रत्यक्ष भेट देऊन प्रत्येक कुटुंबातील सदस्यांचे शारीरिक तापमान व ऑक्सिजनची पातळी तपासतील. ह्या भेटीदरम्यान कोरोनाबाधित व संशयित रुग्णांचा शोध घेतला जाईल. मोहिमेंअंतर्गत मधुमेहसह इतर आजार (उदा.हृदयविकार, मूत्रपिंडाचा आजार, लठ्ठपणा इ.) असलेल्या व्यक्तींना संदर्भित उपचार देखील देण्यात येतील. तसेच कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणे कामी नागरिकांनी सुरक्षेच्या दृष्टीने कोणती महत्वाची पाऊले उचलायला हवीत याची माहिती दिली जाईल. मोहिमेदरम्यान




कर्मचारी व स्वयंसेवक प्रत्येक कुटुंबास दोनदा भेट देतील.

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणे कामी आरोग्य यंत्रणेवर प्रचंड ताण आलेला आहे. सदर मोहीम राबविणे कामी अधिक प्रमाणात मनुष्यबळाची आवश्यकता लक्षात घेता इच्छुक स्वयंसेवकांनी त्यांच्या क्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेट देऊन मोहिमेत सहभागी होणे कामी आपली नोंद करावी.

माझे कुटुंब, माझी जबाबदारी मोहीम लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने व नागरिकांच्या आणि स्वयंसेवी संस्थांच्या सहभागाने राबविण्यात येणार असल्याने अधिकाअधिक स्वयंसेवक मोहिमेसाठी उपलब्ध करून देण्याचे आवाहन उपविभागीय अधिकारी अर्चना कदम, तहसीलदार डॉ.उद्धव कदम, सभापती मोहन गवा, नगराध्यक्ष गीतांजली कोलेकर गटविकास अधिकारी राजलक्ष्मी येरपुडे व तालुका आरोग्य अधिकारी डॉ.संजय बोरपुल्ले यांचे मार्फत लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था व नागरिकांना करण्यात येत आहे.

वाडा तालुक्यातील एकूण ३८ हजार नऊशे पंचवीस घरातील ४३हजार चारशे ब्याऐंशी कुटुंबातील १९ लाख, एक हजार तीनशे तीस लोकसंख्येचे सर्वेक्षण ५९ टीम कडून १५ दिवसात करण्यात येणार सल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय बोरपुल्ले यांनी देऊन या मोहिमेस नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

# मोहोळ तालुक्यात आणखी एका प्रेमी युगलाची गळफासाने आत्महत्या

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील नरखेड येथील प्रेमी युगल आत्महत्या प्रकरण ताजे असताना तालुक्यातील सोहाळे गावात आणखी एका प्रेमीयुगुलाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना २० सप्टेंबर रोजी सकाळी साडेसात वाजता उघडकीस आली. पूजा संजय बचुटे (माहेरचे नाव) वय- २१ वर्षे (रा. जायवाल ता. कवठे महांकाळ) आणि ज्ञानेश्वर रामचंद्र बचुटे (वय २५ वर्षे, दोघे रा. सोहाळे ता. मोहोळ) अशी आत्महत्या केलेल्या प्रेमी युगुलाची नावे आहेत. या घटनेची नोंद कामती पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



या बाबत पोलिस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, पूजा संजय बचुटे (माहेरचे नाव) हिचे लग्न ३० ऑगस्ट २०२० रोजी मौजे जायवाल ता. कवठेमहांकाळ येथील प्रवीण भारत पाटील यांच्याशी झाले होते. १३ सप्टेंबर रोजी ती येती-जाती साठी माहेरी सोहाळे तालुका मोहोळ येथे आली होती. तिचे भावकीतीलच स्पीकर मंडपचा व्यवसाय असणाऱ्या ज्ञानेश्वर रामचंद्र बचुटे याच्याशी गेल्या अनेक महिन्यापासून प्रेम संबंध होते. त्यामुळे तिला झालेले हे लग्न मान्य नव्हते.

> ज्ञानेश्वर आणि पूजा या दोघांनी अत्यंत शांत डोक्याने जीवनयात्रा संपवण्याचा निर्णय घेतला होता. एखाद्या गुन्हेगाराला अशी देताना ज्या प्रकारचा फंदा तयार केला जातो. नेमका तशाच प्रकारचे फाशीचे दोन फंदे त्यांनी एकाच दोरीला तयार केले होते. भावा-बहिणीच्या पवित्र नात्याला कलंक लावणाऱ्या या विचित्र प्रेम कहाणीचा शेवट अत्यंत दुर्दैवी झाल्याने सोहाळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

ज्ञानेश्वर आणि पूजा या दोघांनी एकत्र राहून सुखी संसार करण्याची स्वप्नं पहिली होती. मात्र दोघांचे नाते चुलत भाऊ-बहिणीचे असल्यामुळे त्यांच्या प्रेमाला समाज मान्यता मिळणे खूपच कठीण होते. दरम्यान १९ सप्टेंबर रोजी दोन्ही प्रेमीयुगुलाची भेट झाली. भेटी दरम्यान त्यांनी आपण एकत्र जगू शकत नसलो तर, आपण एकत्र मरु तर शकतो असा निश्चय केला होता. त्यामुळे त्यांनी शनिवारी मध्यरात्री भावकीतील माणिक महादेव बचुटे यांच्या शेतातील पत्राशेड गाठले. त्या ठिकाणी त्या दोघांनी पत्रा शेडच्या अँगलला नायलॉनच्या एकाच दोरीने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली.

रविवार २० सप्टेंबर रोजी सकाळी साडेसात वाजता ही घटना उघडकीस आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच कामती पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत रीतसर पंचनामा करून दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी कामतीच्या ग्रामीण रुणालयात पाठवून दिले. या घटनेची खबर मुलीचे वडील संजय प्रभू बचुटे यांनी दिली असून कामती पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेचा पुढील तपास कामती पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक किरण उंद्रे हे करीत आहेत.


## वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती (बी) नालासोपारा पुर्व**

**मुख्य कार्यालय–विरार (दुरध्वनी क्रमांक ९५२५०–२४०२१७९/२४०३२२४/२४०२५६३**

**जाहिर नोटीस**

महाराष्ट्र मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई–विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'ब' कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकाच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'ब' कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र | रिसीट नं. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | तुळींज ७ | ३२५/३ | ९८०९ | सरस्वती जाणू चिपळूणकर | हेमंत जाणू चिपळूणकर |
| २ | तुळींज ७ | ३२५/२ | ९८१२ | सरस्वती जाणू चिपळूणकर | हेमंत जाणू चिपळूणकर |
| ३ | तुळींज ७ | ३२५/७ | ९८१५ | जाणू बाबाजी चिपळूणकर | बिपीन जाणू चिपळूणकर |
| ४ | तुळींज ७ | ३२५/५ | ९८१४ | जाणू बाबाजी चिपळूणकर | हेमंत जाणू चिपळूणकर |
| ५ | तुळींज ७ | ५३१/२९ | ९८०५ | राहुल दत्ताराम काते | गीतांजली गोविंद महाडिक |
| ६ | तुळींज ७ | ५२५/१४ | ९८०३ | प्रथमेश बिल्डर्स | कपिल गुप्ता |
| ७ | तुळींज ७ | ४२०/१३ | ९७७२ | कमुबाई मंगू रेवाट | भारत मनजी रेवर |
| ८ | तुळींज ७ | ५१४/८३ | ९७३० | जय भवानी कन्स्ट्रक्शन | सुमन आर. मिश्रा व नागेश्वर मिश्रा |
| ९ | तुळींज ७ | ४२१/५४ | ९७१९ | भाग्यश्री भारत नाईक | मनीष वायू पाटील |
| १० | तुळींज ७ | ३२५/६ | ९८१७ | जाणू बाबाजी चिपळूणकर | हेमंत जाणू चिपळूणकर |
| ११ | तुळींज ७ | ५११/२१ | ९७७६ | महेश रेवाळे | मालती प्रताप परदेशी |
| १२ | तुळींज ७ | ५२५/१३ | ९७८३ | प्रथमेश बिल्डर्स | नवीन सी. महाजन |
| १३ | तुळींज ७ | ३३३/५ | ९७०५ | ठाकरशी श्यामजी गोगारी | दिलीप भवरलाल तोरणा |
| १४ | तुळींज ७ | १२/३८ | ९६४७ | सुरेश आंबोकर | सुरेख सुरेश आंबेडकर |
| १५ | तुळींज ७ | ४९५/५३ | ९६८६ | निनाद विलास कांदळकर | रामचंद्र बाबाजी शेळके व हर्षदा शेळके |
| १६ | तुळींज ७ | ३१७/१ | १०५२४ | रूपा धनसिंग पवार | चांदणी रूपा पवार |
| १७ | तुळींज ७ | ४९९/२०१ | १०७८१ | मी. दत्तकृपा इंटरप्राइजेस | विजया विलास शिगवण |
| १८ | तुळींज ७ | ४७३/२४ | १०६३० | मालती मोरेश्वर पाटील | मनोहर मोरेश्वर पाटील |
| १९ | तुळींज ७ | ४७३/५८ | १०६३२ | मालती मोरेश्वर पाटील | कांचन मोरेश्वर पाटील |
| २० | तुळींज ७ | २६/४ | १०८२८ | मधुकर एस. चोरघे | महेश मधुकर चोरघे |

जावक क्र. वविशम/५७/२०२०–२१
दिनांक : २४/०९/२०२०

सही/–
**प्र.सहा.आयुक्त**
प्रभाग समिती 'ब' विरार पुर्व
वसई विरार शहर महानगरपालिका

28 SEPTEMBER TO 04 OCTBER 2020 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 26/09/2020 8:07 PM Page 1



पान १ वरून...

## सात लाखांसाठी सराफांनी इमान विकले...

म्हणून पाहत असल्याने त्यांची बऱ्याच लोकांशी ओळख होती.त्यांनी त्या बँकेच्या माध्यमातून अनेकांशी अर्थिक व्यवहार ही केलेला होता.सकाळी ९च्या दरम्यान त्या बँकेत आल्या की संध्याकाळी उशिराच घरी जात होत्या.त्यांना चिपळून लांब होत असल्याने त्या वेलदुर येथेच भाडयाने घर घेऊन राहत होत्या.विदर्भ कोकण बँक ही कोकण भागात चांगलीच नावारूपाला आलेली आहे.बुधवार दि.१६ सप्टेंबर २०२० रोजी त्या दुपारी ३नंतर वेलदुर येथील बँकेच्या शाखेतून बाहेर पडल्या होत्या.त्यानंतर त्यांनी संध्याकाळी ६.५५च्या दरम्यान रत्नागिरी शाखेत आपल्या कामाचे रिर्पोटिंग ही केले होते.त्यानंतर त्यांनी रत्नागिरीहून चिपळूणला जाण्याचा विचार करुन वेलदुर येथील आपल्या घरमालकाला आपण चिपळूणला जात असल्याने फोन करून सांगितले होते.त्यानंतर त्या बेपत्ता होत्या.दुसऱ्या दिवशी त्या बँकेत आल्या नव्हत्या.बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांच्या मोबाईलवर फोन लावून संपर्क साधण्याचा बराच प्रयत्न केला.परंतु त्याचा फोन सारखा स्विच ऑफ येत होता.त्या संपर्क क्षेत्राच्या बाहेर येत होता.यातच दिवस गेला होता.तिसऱ्या दिवशी ही त्या कामावर आल्या नव्हत्या. म्हणून बँकेच्या अधिकाऱ्यांनी त्याच्या घरच्या लोकांशी संपर्क साधला असता.त्या चिपळूण येथे ही गेल्या नसल्याचे स्पष्ट झाले होते. आता त्याचे घरचे आणि बँकेचे लोक ही शोध घेत होते.दरम्यान गुरूवार दि.१७ रोजी दाभोळ खाडीत काही मच्छिमार हे नेहमी प्रमाणे मच्छिमारीसाठी गेले असता.त्यांना दाभोळ खाडीतील धोपावे व नवानगरच्या धक्कयावर एक मृतदेह पाण्यात तरंगताना दिसून आला.त्या मच्छिमारांनी या घटनेची माहिती लगेचच दाभोळ पोलीस स्टेशनला दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते. दाभोळ खाडीत पाण्यावर उभे अवस्थेत तरंग असणारा मृतदेह बघुन मच्छिमारांच्या मनात ही धस्स झाले होते.त्या दिवशी विषेश म्हणजे सर्वपित्र आमवस्या असल्याने समुद्राच्या भरतीचा जोर वाढला होता.त्यामुळे मृतदेह पाण्यावर उभे तरंगत होता.त्याच्या मनात अनेक तर्क वितर्क येत होते. पोलीसांनी स्थानिक मच्छिमारांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढला. यासाठी त्याना जवळपास दोन तीन तास धडपडावे लागले.मृतदेह हा मयत महिलेचा होता.तिच्या मांडयाना दोरखंड बांधलेला होता. दोरखंडाच्या दुसऱ्या टोकला एक मोठा दगड बांधलेला होता.यावरून हा या महिलेचा घातपात झाल्याचे पोलीसांनी संशय व्यक्त केला. घटनास्थळावर मृतदेहाची ओळख पटविण्यासाठी काय मिळते का याचा तपास पोलीस करत होते.मयत महिलेच्या वर्णनाची माहिती पोलीसांनी सोशल मिडीयावर दिली होती.पोलीसांनी मयत महिलेच्या मृतदेहाचा फोटो काढून सोशल मिडियावर व्हायरल केला.त्यावरून मयत महीलेची ओळख पटविण्याचा प्रयत्न चालू ठेवला.दरम्यान पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी रूग्णालयात पाठवून दिला.याच दरम्यान रत्नागिरी पोलीस स्टेशनमध्ये ५६ वर्षीय महिला बँक व्यवस्थापिका या बेपत्ता झाल्याची तक्रार विदर्भ कोकण बँकेच्या अधिकाऱ्यांनी नोंदवली होती. पोलीस या घटनेचा सावधपणे तपास करीत होते.मयत महिला ही वेलदुर येथील विदर्भ कोकण बँकेची व्यस्थापिका सुनेत्रा दुर्गोले या असल्याची माहिती पुढे आल्याने आणि त्याचा खून झाल्याचे स्पष्ट झाल्याने पोलीसांनी तपास कामाला गती देऊन त्याचा खून कोणी आणि कशासाठी केला याचा तपास दाभोळ पोलीस करू लागले होते.रत्नागिरी जिल्हयातील वेलदुर येथील विदर्भ कोकण बॅंकेच्या व्यस्थापिकांचा खून झाल्याचे वृत्ताने जिल्हयात एकच खलबळ उडाली होती.पोलीस या घटनेचा तपास करीत असताना मयत सुनेत्रा दुर्गेले याच्या मोबाईल कॉलचे रेकॉर्डिग आणि साडीआर पोलीस काढत होते.उपविभागीय पोलीस अधिकारी नवनाथ ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुहागर पोलीसांच्या मदत्तीने पोलीस संशयीता पर्यत पोहचले होते.अवघ्या बारा तासाच्या आत पोलीसांनी नवानगर येथील संजय फुणगुसकर,आणि सत्यजित पटेकर याच्या पर्यत पोलीस पोहचले होते.पोलीसांनी या दोघांना संशयावरून ताब्यात घेऊन त्याच्याकडे या घटनेची चौकशी करीत असताना त्याच्या हाती काही धागादोरा लागलेला होता. नवसागर येथील संजय फुणगुसकर दोघे ही विदर्भ कोकण बॅंकेत सराफाचे काम करीत होते.याची माहिती पोलीसांना मिळाली होती.बॅंकेत ग्राहक सोन तारणसाठी आले की त्याच्या मुल्याकंनासाठी ते सोने बॅंकेकडून त्याच्याकडे पाठवले जात होते.यातूनच या दोघांचा बॅंकेच्या व्यस्थापिका सुनेत्रा दुर्गेले याच्याशी सारखा संपर्क येत होता.त्या दोघांशी ही त्याचा आर्थिक व्यवहार होत होता.पोलीसांनी या दोघांच्या ही मोबाईलचा सीडीआर काढलेला होता.घटनेच्या दिवशी या दोघांशी सुनेत्रा दुर्गेले याच्याशी संपर्क झालेला होता.सुनेत्रा दुर्गेळे यांनी बॅंकेतील सोन्याच्या व्यवहारासाठी सात लाख रूपये आणले होते.ही गोष्ट संजय फुणगुसगेकर याला माहिती होती.म्हणून त्याने त्यावेळी दुर्गेळे याना मोबाईलवर फोन लावून नवासागर येथे बोलावून घेतले होते.म्हणून दुर्गेले या ही बुधवार दि.१६ रोजी आपले बॅंकेतील काम आटोपून दुपारी ३.३०च्या दरम्यान बाहेर पडल्या होत्या. त्या दरम्यान त्या त्याना भेटायला गेल्या, त्यावेळी संध्याकाळ होत आली होती. त्याना परत घरी जाण्याची घाई झाली असल्याने त्यांनी तेथूनच आपल्या मोबाईलवरून बॅंकेच्या रत्नागिरी शाखेत रिर्पोटींग केले होते. त्यानंतर त्यांनी वेलदूर येथील आपल्या घरमालकाला आपण बस मिळाल्याने चिपळूण येथे जात असल्याचे सांगितले होते.दरम्यान सोन्याच्या व्यवहारासाठी त्यांनी बॅंकेतून सात लाख रूपये आणले असल्याचे माहिती संजय याने आपला मित्र सत्यजित पटेकर याला सांगून या बाईची गेम करून आपण तिच्याकडचे सात लाख रूपये हडप करूया असे सांगितले तो येईपर्यंत संजय याने सुनेत्रा याना बोलण्यात गुंतवून ठेवले होते. आता त्यांनी त्या पैशाच्या हव्यासासाठी त्यांना मारून टाकण्याचे ठरविले होते. या व्यवहारातून त्या दोघांनी मुद्दामच त्याचेशी भांडण काढून वाद घालायला सुरूवात केली होती.या वादातच संजय याने त्याचा गळा आवळून धरला होता.तर सत्यजित याने त्याचे हातपाय धरले होते. त्या दोघांच्या ताकदीपुढे त्याचे काहीच चालले नाही. क्षणार्धात त्या जागीच गतप्राण झाल्या.त्याचा मृत्यु झाल्याचे लक्षात येताच त्या दोघांचे धाबे दणाणले होते. त्या दोघांनी त्याच्या मृतदेहाची विल्वेवाट लावणेसाठी आपल्या गाडीतुन त्याचा मृतदेह जेट्टी येथे आणला. त्याच्या मृतदेहाला कमरेला आणि पायला त्या दोघांनी रस्सी बांधली. आणि त्यानंतर त्या रस्सीच्या दुसऱ्या टोकाला एक मोठा दगड बांधून त्यांनी त्याचा मृतदेह धोपवे नवासागर धक्काजवळ खाडीत नेवून टाकला होता. त्या दोघांनी आपल्या गुन्हयाची कबुली पोलीसांना दिल्यावर पोलीसांनी त्यांना सुनेत्रा सुनिल दुर्गोले (वय ५७.रा.सध्या वेलदूर मुळ चिपळून) यांचा खून करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी संजय श्रीधर फुणगुसकर (वय ४०) आणि सत्यजित बबन पटेकर (वय३२) रा.दोघेही नवासागर दाभोळ याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२,२०१ नुसार दाभोळ येथील पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद करण्यात आला.त्या दोघांना पोलीसांनी गुहागर येथील न्यायालयात उभे केले असता. मा.न्यायालयाने त्या दोघांना सात दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.पोलीस कोठडी दरम्यान त्या दोघांनी सुनेत्रा दुर्गोले याचा खून पैशाच्या व्यवहारातून केल्याचे कबुल केला.या घटनेचा तपास करीत पोलीसांनी या घटनेतील दोघा संशयीतांना गुरूवार दि.१७ सप्टेंबर रोजी रात्री १.३० अटक करून ताब्यात घेतले होते. उपविभागीय पोलीस अधिकारी नवनाथ ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक किरणकुमार कदम, स.पो.नी.बी.के.जाधव, स.पो.नी.आनंदराव पवार, पो.हे.कॉ.राजू कांबळे, सचिन पाटील, सचिन चव्हाण,संतोष साळसकर, संतोष माने, वैभव चौगुले, महिला पोलीस हेमलता कदम, आदिनाथ आदवडे,सुभाष भागणे, शांताराम झोरे, राकेश बागुल,अरूण चाळके, गुरू महाडिक, रमोझा शेख,पोलीस उपविभागीय कार्यालयातील मिलिंद चव्हाण, इम्रान शेख, मनोज कुळे यांनी केला. या घटनेचा पुढील तपास दाभोळ पोलीस करीत आहेत.

## दारूच्या नशेत भलताच प्रकार घडला...

हत्या करून प्रेत लपविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे, या दोन्ही घटनांवरून गुन्हेगारांच्या मनात पोलिसांची भीती राहिली नसल्याचे बोलले जात आहे. ओढ्यातील वाहत्या पाण्यातील मासे पकडण्यासाठी लावलेल्या किवातील मच्छीच्या वादातून एका ७० वर्षीय वृद्धाची डोक्यात दगडाने मारून हत्या केल्याची घटना घडली असून या घटनेने कुडूस परिसरात खळबळ माजली आहे. तालुक्यातील कुडूस येथून जवळच असलेल्या दिनकरपाडा येथील नारायण गणपत चौधरी हे किवावर मच्छी पकडण्यासाठी गेले असता तेथे जवळच राहत असलेल्या पती-पत्नीने चौधरी यांच्याकडे मच्छी चोरल्याच्या संशयाने चौकशी करत मच्छि देण्याची मागणी केल्याने ती देण्यास नकार देत दारूच्या नशेत असलेल्या पती-पत्नीने चौधरी यांना शिवीगाळ करून मारण्यास धावून आले असता चौधरी घराच्या दिशेने पळत सुटले मात्र वयोवृद्ध असल्याने ते जास्त पळू शकले नाहीत, जवळच असलेल्या कंपनी समोर त्यांना गाठून त्या दोघा नराधमांनी वडीलांसमान असलेल्या वृद्धाच्या डोक्यात दगडाने वार करून जागीच ठार केले व पुरावा नष्ट करण्याचा इराद्याने प्रेतावर गवत टाकून लपविण्याचा प्रयत्न केला. रात्री बाबा घरी आले नसल्याने सकाळी त्यांचा मुलगा चौधरी यांना शोधायला गेला असता हा प्रकार उघडकीस आला आहे. या बाबत रविवारी संध्याकाळी वाडा पोलीस ठाण्यात भा.दं. वि.सं. कलम ३०२, ३०१ नुसार गुन्हाची नोंद करून संत्याला तात्काळ अटक खेळू तर त्याची पत्नी पिंकी हिला रविवारी गांध्रे गावातून अटक खेळू आहे. आरोपीला अ करण्यात आली आहे, असून पोलीस निरीक्षक जयकुमार सुर्यवंशी हे अधिक तपास करत आहेत.

## पोलिसांना नाव सांगितल्याने तुटली ...

करायवयाची असेल तर मिळूनच ते दोघे ही घरफोडी चोऱ्या करीत होते. त्याच्या या सराईत गुन्हेगारी वृत्तीमुळे त्या भागात त्याचा दरारा आणि वचक होता. दोघे आपआपल्या जवळ नेहमी गुप्ती चाकु सारखे धारदार शस्त्र वापरत होते. दिवसभर दारू प्यायची ज्या ठिकाणी घरफोडी करायवयची आहे त्या भागाची रेखी करायची आणि संधी साधून तेथे घरफोडी करायची त्यातून मिळेल तो माल आपआपसात वाटून घ्यायचा हे त्या दोघांचे ठरलेले होते. तसे ते लोकांना दाखवयला छोठा मोठा धंदा करायचे बबुल तर अलिकडच्या काळात पाण्याचे जार विकण्याचा धंदा करीत होता. ते दोघे ही सराईत गुन्हेगार असल्याने वेगवेगळे गुन्हे त्या दोघांच्या नावाने विविध पोलीस स्टेशनमध्ये दाखल होते. घरफोडया चोऱ्या करणारे सराईत गुन्हेगार ही कितीही एकमेकांचे जवळचे मित्र असले तरी त्यांनी गुन्हे करून मिळविलेल्या मालावरून त्याचेत वाद विवाद भांडण तंटा हा होत असतो. तसाच वाद बबलू नरळे आणि शैलेश कोकाटे याच्यात होत होता. दोघांच्या ही घरच्या लोकांना ते करीत असलेले गुन्हे माहित होते. त्यांनी त्यांना असले धंदे सोडून देऊन चांगल्या मार्गाने पैसे कमवा असा सल्ला ही दिलेला होता. परंतु त्यांना चोऱ्या आणि घरफोडया करण्याची इतकी सवय लागली होती की एखाद्या गुन्हायातुन ते जेलची हवा खावून बाहेर आले की परत ते तेच काम करीत होते. त्यामुळे त्याचे घरचे लोक ही त्याच्याबाबत वैतागलेले होते. सांगून ही ते काही ऐकत नव्हते. अशातच शैलेश कोकाटे याचे आई वडिल हे वयोवृध्द झाले असल्याने त्यांनी त्याच्यापुढे हात ठेकले होते. मागच्या दोन महिन्यापूर्वी त्या शैलेशने एके ठिकाणी घरफोडी करून माल मिळविला होता.त्या गुन्हयात पोलीसांनी त्याला मुद्देमालासह ताब्यात घेतले होते.पोलीस कोठडीत पोलीस त्याच्याकडे या घरफोडीची चौकशी करीत असताना बबलू नरळे याचे नाव शैलेश हा घेत होता. परंतु त्या घरफोडीत बबलूचा काही संबंध नव्हता.या अगोदर ते दोघे ही मिळून घरफोडी करीत असल्याने तसा पोलीसाचा संशय ही या घरफोडी बाबात बबलूवर आलेला होता.त्यातच शैलेश त्याचे नाव घेत असल्याने पोलीसाचा संशय जास्तच बळावला होता.म्हणून पोलीसांनी त्याला ही घरफोडीच्या गुन्हयात ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी आरंभली होती.परंतु पोलीस तपासात त्याचा सहभाग दिसून येत नव्हता. म्हणून पोलीसांनी त्याची चौकशी करून त्याला सोडून दिले होते.तरीही त्या गुन्हयात बबलूचा सहभाग असल्याचे शैलेश पोलीसांना सांगत होता. पुढे पोलीसांनी या घरफोडी संदर्भात त्याच्या विरोधात गुन्हा नोंदवून त्याला जेलची हवा दाखविली होती. त्यांनतर काही दिवसांनी शैलेश हा जामीनावर बाहेर आलेला होता.त्यानंतर ही तो बबलूला या गुन्हयात अडकवून जीवे मारण्याची धमकी देत होता. तर बबलू ही त्याला धमकी देत होता.तुला ही मी बघून घेतो असे सांगत होता.ते दोघे ही सराईत गुन्हेगार असल्याने दोघांच्याकडे धारदार शस्त्र होते. ते शस्त्र नेहमी दोघे ही जवळच बाळगीत होते.दोघेही दारू पिवून समोरा समोर भेटले की एकमेकांना बघून घेण्याची भाषा करीत होते. त्यातुन त्याच्यात वैर वाढत चालले होते. ते दोघे ही अट्ठल पिंडके असल्याने दारू प्यायला एकत्र दारू प्यायला ही तसे तयार असायचे. दारूसाठी ते एकत्र येत असल्याने त्याच्यात भांडणे ही होत होती.शैलेशने घरफोडीच्या गुन्हयात आपले नाव घेतले याचा राग बबलुला येत होता.दोघेही एकमेकांना मारण्याची धमकी देत असल्याने तसे दोघे ही एकमेकापासून सावध होते.तसे दोघे ही एकमेकांना संपविण्यासाठी संधीची वाट पाहत होते.बबुलला तर शैलेशची भिती वाटत होती.त्याला जर आपण नाही संपवले तर तो कदाचित आपल्याला संपवेल अशी भिती त्याच्या मनात होती.म्हणून तो त्याचा कायमचा काटा काढण्याच्या विचारात होता. मंगळवार २२ संप्टेंबर रोजी दुपारी २.३०वाजणेच्या दरम्यान बबलूने शैलेश याला दारू पिण्यासाठी म्हणून बोलावून घेतले होते.ते दोघे ही ३ वाजणेच्या सुमारास जुनी मिल कंपाऊंडच्या शेजारी असणाऱ्या अपार्टमेंटच्या बेसंमेंटमध्ये दारू पित बसले होते.त्यावेळी दारूचा एक एक पेग ते दोघे ही आपआपल्या घशाखाली रिचवत असताना त्याना नशा चढली होती.ते दोघे ही फुल्ल नशेत होते.त्यावेळी बबलूने घरफोडीच्या गुन्हयात आपले नाव का पोलीसांना सांगितले असे शैलेशला विचारले, त्यावेळी त्याने त्याला अर्वाच्च भाषेत शिवी दयायला सुरूवात केल्यावर बबलु त्याच्या अंगावर धावून गेला होता.ते दोघे ही आता एकमेकांना दारूच्या नशेत भिडले होते.त्याचवेळी शैलेशने लपवून ठेवलेला आपल्याकडील चाकु काढला आणि बबलुवर वार केला होता.परंतु तो सावध असल्याने त्याने त्याचा वार चुकवून त्याच चाकूने शैलेशच्या छातीत डाव्या बाजूला वार केला.तो वार इतका जोरात होता की,त्या चाकूचा पुढचा भाग तसाच त्याच्या छातीत रूतून बसला होता. तो जिंवत असल्याचे बघुन बबलूने आपल्याकडील रूमाल काढून त्याचा गळा जोरात आवळला.तरीही त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्याने तेथे बाजुलाच पडलेला मोठा दगड उचलला आणि शैलेशच्या डोक्यात घातला.त्यासरशी त्याच्या तोंडातून फेस येऊ लागल्याने तो मेला असल्याची खात्री बबलुला झाली होती. या घटनेनंतर तो घटनास्थळावरून पळून गेला होता.त्यानंतर काही वेळाने अपार्टमेंटच्या बेसमेटमध्ये एका तरूणाचा खून झाल्याची माहिती तेथील लोकांना लागल्याने घटनास्थळावर बरीच गर्दी झाली होती.या घटनेची माहिती त्याच्यातीलच एकाने चावडी पोलीसाना दिली होती.पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते.पोलीसांनी घटनास्थळी दाखल होऊन घटनेचा आणि मयताचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवून दिला होता.त्याचबरोबर या घटनेची माहिती मयत शैलेशच्या घरच्या लोकांना दिली होती.घटनास्थळावर मयत शैलेशच्या वयोवृध्द आई वडिलांनी केलेला अक्रोश ह्दय पिळवटून टाकणारा होता. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय सांळुखे यांच्या मार्गदर्शनाखाली चावडी पोलीस स्टेशनचे पोलीस या घटनेचा तपास करीत होते. घटना स्थळी पोलीस उपायुक्त डॉ.वैशाली कडूकर गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस उपायुक्त अभय डोंगरे, पोलीस निरीक्षक संजय जगताप यांनी भेट देऊन माहिती घेतली होती. ही घटना कोणत्या कारणातून आणि कुणी केली याची माहिती पोलीसांना मिळाली होती. पोलीसांनी घटनास्थळावरून दारूच्या रिकाम्या बाटल्या,तुटलेली चप्पल मिळालेली होती.तसाच मयताच्या छातीत अर्धवट रूतून बसलेला चाकू पोलीसांनी पंचनाम्यासाठी जप्त केला होता.या घटनेतील संशयीत आरोपीची माहिती पोलीसांनी मिळाल्याने त्याच दिवशी पोलीसांनी दुपारी चारच्या दरम्यान आरोपी बबलू नरळे याला त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेतले होते.त्याला पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची पोलीसांनी चौकशी करीत असतानात त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली.

या घटनेनंतर तो घटनास्थळावरून पळून गेला. त्याने जवळच्या पेट्रालपंपारवर जावून ५० रूपायाचे पेट्रोल विकत घेतले आणि एका निर्जन ठिकाणी जावून गुन्हयातील रक्ताळलेले कपडे जाळून टाकले होते.आणि त्यानंतर नवी पेठेत जावून एका कपडयाच्या दुकानात जावून नवीन कपडे घेतले होते.त्याने दिलेल्या महितीनुसार पोलीसांनी त्याला घटनास्थळावर नेऊन फिरवून आणले होते. त्याच्याकडून गुन्हा कसा घडला आणि कसा केला याचे प्रात्याक्षिक करून घेतले होते.चावडी पोलीसांनी शैलेश गणपती कोकाटे (वय २८ ) याच्या खून प्रकरणी बबलू राजेद्र नरळे (वय ३२) याच्या विरोधात चावडी पोलीस स्टेशनला भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता.मा.कोर्टाने त्याला चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी गुन्हयात वापरलेला चाकू, दगड,आणि रूमाल जप्त केला होता.या घटनेचा पुढील तपास चावडी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय सांळुखे याच्या मार्गदर्शनाखाली त्याचे सहकारी पोलीस करत होते.सराईत गुन्हेगार हे गुन्हा करण्यासाठी कोणत्या ही थराला जातात आणि एखाद्या न केलेल्या गुन्हयात एखाद्याचे नाव घेऊन समोरच्याला अडकवतात आणि त्याचीच परिणीती एखाद्या खूनासारख्या अघटित घटनेत होते हेच या घटनेवरून दिसून येते.

## अंबरनाथमध्ये अपहरणकर्त्यांच्या ...

असता तो मिळुन आला नाही. तेव्हा त्याच्या आईने अंबरनाथ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. दरम्यान पोलिसानी तपासाची चक्रे फिरवत तीन पथके तयार केली आणि विकास चा फोटो शहरातील सर्व रिक्षावर लावले. तेव्हा एका रिक्षा चालकाने विकास ला उल्हासनगर कॅंप ४ येथिल भरत नगर मध्ये नेल्याचे पोलिसाना सांगितले. तर भरत नगर येथिल राहुल निकम व पुजा हे त्या मुलाला घेवुन विठ्ठलवाडी पोलिस ठाण्यात गेले व पोलिसाना सांगितले की या मुलाला कोणी तरी दारात सोडुन गेले. पण पोलिसाना यांच्यावर संशय आला व त्यानी पुजा ला दम देवुन विचारताच तिने खर सांगितले. अंबरनाथ येथिल सर्कस मैदाना जवळ राहणाऱ्या जयतनबी खान हिच्या कडुन या मुलाला ७० हजार रुपयात विकत घेतल्याची कबुली दिली. तेव्हा अंबरनाथ पोलिसानी मुलाला विकत घेणारी ग्राहक महिला पुजा शेट्टीयार (२८) जयतनबी मोहम्मद खान (३३) शेरु सरोज (४८) माया काळे (३०) मुकेश खारवा (४५) या पाच आरोपीना सहाय्यक पोलिस आयुक्त विनायक नरळे यांच्या मार्गर्शनाखाली अटक केली आहे .आणि विकास याला त्याच्या पालका कडे स्वाधिन केले आहे तर या गुंह्याचा पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय धुमाळ हे करत आहेत .

## म्हाताऱ्याच्या रागाची परिसीमा झाली...

कारणीभूत ठरु शकतो. रागाचे दुष्परिणाम लवकर लक्षात आले तर मनुष्य त्यातून सावरु शकतो. मात्र वृद्धापकाळ आला तरी मनातून व अंगातून राग जात नसेल तर मात्र ते चुकीचेच असते. उफाळून येणारा राग हा समुद्राच्या लाटेप्रमाणे असतो. रागाची एखादी जोरदार लाट आली तर ती खुप मोठे नुकसान करुन जाते. आग आणि राग शांत झाल्यावरच लक्षात येते की नुकसान किती झाले आहे. जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुक्यातील नेहेते या गावी फकीरा वैदकर व कमला वैदकर हे शेतकरी वृद्ध दाम्पत्य रहात होते. फकीरा वैदकर यांच्या दोन्ही मुलांचे लग्न झाले आहे. त्यामुळे फकीरा वैदकर व त्यांची पत्नी कमला हे दोन्ही आपल्या सर्व जबाबदा-यांमधून मुक्त झाले होते. त्यांनी वडीलोपार्जीत शेती व घराची दोन्ही मुलांमधे वाटणी केली होती. दोन्ही मुले आपापल्या परिवारासह वेगवेगळी रहात होते तर फकीरा व कमला हे वृद्ध दाम्पत्य वेगळे रहात होते. एकंदरीत सर्व काही सुरळीत सुरु राहण्यास काहीच हरकत नव्हती. मात्र फकीरा वैदकर यांचा स्वभाव मोठ्या प्रमाणात तापट होता. त्यांचे वय ७३ वर्ष होते. तरीदेखील त्यांच्या तापट व भांडखोर स्वभावात तसूभर देखील फरक पडला नव्हता.

आजची पिढी अशा रागीट व तापट स्वभाव असलेल्या जेष्ठ नागरिकांना जुने खोड म्हणून संबोधतात. तापट व रागीट स्वभावामुळे फकीरा वैदकर हे पत्नी कमलाबाई सोबत नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणाने वाद घालत असत. त्यांना पत्नीसोबत वाद घालण्यास कोणतेही निमीत्त पुरेसे ठरत होते. वय झाले तरी त्यांना रागावर आवर घालता आला नव्हता. रागीट स्वभावाचे दुष्परिणाम कित्येक लोकांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी आपल्या रागावर नियंत्रण मिळवल्याचे उदाहरणे आहेत. मात्र फकीरा वैदकर यांचा माझेच खरे हा स्वभाव काही केल्या जात नव्हता. जरा काही मनाविरुद्ध झाले म्हणजे फकीरा वैदकर हे त्यांची पत्नी कमलाबाईला विळ्याने छाटून टाकण्याची भाषा करत होते. रागीट नवरा कमलाबाईच्या पदरी पडला होता. त्यामुळे ती माऊली बिचारी मुकाट्याने सहन करत होती. मुले मोठी झाली होती. त्यांची लग्ने देखील झाली होती. नातू व नात देखील डोक्याच्या वर गेले होते. तरीदेखील आजोबा झालेले फकीरा यांचा तापट स्वभाव जसा होता तसाच होता. २१ सप्टेबर रोजी भल्या पहाटे नेहमीप्रमाणे दोघा पती पत्नीत कोणत्या तरी कारणावरुन खटके उडण्यास सुरुवात झाली. त्यावेळी कमलाबाई स्वयंपाक खोलीत इलेक्ट्रीक शेगडीवर आयुष काढा तयार करत होत्या. दोघा पती पत्नीत वादाचे जे काही कारण असेल नसेल त्यावरुन फकीरा वैदकर यांच्या मनात संतापाची एक मोठी लाट उसळली. ज्याप्रमाणे समुद्राची एक जोरात लाट उसळून येते व त्या लाटेत खडक देखील झिजून तुटण्याची वेळ येते तशी अवस्था यावेळी झाली होती. संतापाच्या भरात फकीरा वैदकर यांनी हातातील विळ्याने आयुष काढा तयार करत असलेल्या कमलाबाईवर वार करण्यास सुरुवात केली. या हल्लयात कमलाबाईच्या गालावर, तोंडाच्या जबड्यावर व गळ्यावर सपासप वार फकीरा वैदकर यांनी सुरु केले. या अनपेक्षीत हल्लयामुळे बेसावध कमलाबाई सुरु असलेल्या इलेक्ट्रीक शेगडीवर धाडकन कोसळल्या. इलेक्ट्रीक शेगडीचा शॉक देखील त्यांना त्याचवेळी लागला. एकाच वेळी विळ्याचे वार व इलेक्ट्रीक शेगडीचा शॉक असा दुहेरी आघात त्यांच्यावर झाला होता. विजप्रवाह सुरु असलेल्या शेगडीवर कोसळल्यामुळे विजेच्य तारेची अर्थात कॉईलच्या जखमा त्यांच्या छातीवर, पोटावर व मांडीवर झाल्या. काही क्षणातच होत्याचे नव्हते झाले. काही क्षणापुर्वी चालत्या फिरत्या कमलाबाईच्या मृत्यूच्या दाढेत गेल्या. त्यांचा जिव गेला होता. त्या निपचीप पडल्या होत्या. आज त्यांच्या जिवनातील अखेरचा दिवस इतका क्रुर असेल याची त्यांनी कधी कल्पना देखील केली नसावी. आपल्या हातून हे काय विपरीत घडले याची जाणीव घटना घडून गेल्यावर फकीरा वैदकर यांना आली असावी. क्षणभराचा राग किती नुकसानदायक असतो याचा प्रत्यय या घटनेतून आला. कदाचीत फकीरा वैदकर यांना आपल्या कृत्याचा पश्चाताप झाला असावा. त्यांनी लागलीच दुसऱ्या खोलीत जावून संतापाच्या भरात अथवा पश्चातापाच्या भरात छताच्या लोखंडी हुकाला दोरीच्या मदतीने गळफास घेत आपली जीवनयात्रा संपवली. काही क्षणातच दोघे पती पत्नी हे जग सोडून गेले. काही वेळाने नेहमीप्रमाणे वरच्या मजल्यावर राहणारी त्यांची नात सकाळी सव्वा सहा वाजेच्या सुमारास आजोबा फकीरा यांना पिण्यासाठी दुध देण्यास गेली. त्यावेळी समोरचे आजीचे रक्ताच्या थारोळ्यात पडलेले दृश्य बघून ती काही वेळ भांबावली. काय करावे हे तिला सुचत नव्हते. ती मनातून प्रचंड घाबरली. तिने तेथून लागलीच पळ काढत हा प्रकार वडील रविंद्र वैदकर यांच्या कानावर घातला. मुलगी सांगत असलेला प्रकार ऐकून मुलगा रविंद्र देखील काही वेळ बिथरला. त्याने लागलीच लहान भाऊ गणेश वैदकर यास सोबत घेत आई रहात असलेली खोली गाठली. खोलीत दोघा भावांनी आपल्या परिवारासह येवून पाहिले असता त्याठिकाणी त्यांची आई कमलाबाई रक्ताच्या थारोळ्यात इलेक्ट्रीक शेगडीजवळ निपचीप पडलेली होती. हा भयावह प्रकार बघून दोघा भावांनी आरडाओरड करण्यास सुरुवात केली. भल्या पहाटे सहा वाजेच्या सुमारास हा प्रकार बघण्यासाठी आजुबाजूचे लोक तेथे जमा झाले.

शेजाऱ्यांच्या मदतीने त्यांनी कमलाबाईला उचलून सुरक्षीत ठिकाणी हलवले. त्यानंतर त्यांनी वडील फकीरा वैदकर यांचा शोध घेण्यासाठी दुसऱ्या खोलीत पाहण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या खोलीचे दार आतून बंद होते. खिडकीचा दरवाजा बाहेरुन आत लोटून पाहिले असता फकीरा यांनी आत्महत्या केल्याचे दृश्य दिसून आले. गळफास घेत छताला लटकलेल्या अवस्थेत फकीरा वैदकर सर्वांना दिसून आले. त्यामुळे लोकांच्या मदतीने तो दरवाजा तोडून आत प्रवेश मिळवण्यात आला. इतरांच्या मदतीने त्यांना खाली उतरवण्यात आले. त्यांना देखील इलेक्ट्रीक शेगडीचा चटका लागल्याचे दिसून आले. त्यांच्या अंगावर ठिकठिकाणी रक्ताचे डाग व जखमा उपस्थितांना दिसून आल्या. आपल्या भांडखोर वडीलांनी आई कमलाबाईचा विळयाने खून करुन स्वत: आत्महत्या केल्याची रविंद्र वैदकर व त्याचा भाऊ गणेश या दोघांची खात्री झाली. या घटनेची माहीती रावेर पोलिस स्टेशनला देण्यात आली. माहिती मिळताच डीवायएसपी नरेंद्र पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. रामदास वाकोडे, स.पो.नि. शितलकुमार नाईक व पोलिस उप निरिक्षक मनोज वाघमारे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळ गाठले. त्यानंतर पुढील कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करण्यात आली. मयत दाम्पत्यांचा मुलगा रविंद्र वैदकर याच्या फिर्यादीनुसार रावेर पोलीस स्टेशनला मयत फकीरा वैदकर यांच्या विरुद्ध कमलाबाई वैदकर यांच्या खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा पुढील तपास फैजपूर उप विभागाचे डीवायएसपी, पो.नि. रामदास वाकोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उप निरिक्षक मनोज वाघमारे करत आहेत.

पान ८ वरून...

## ५२५ कर्मचारी कुटुंबावर टांगती...

४६ निवासस्थाने आहेत त्यांची सध्या दुरवस्था झाली असून सदरची निवास्थाने हि धोकादायक स्थितीत असून पालिकेने त्यांना वारंवार नोटीस दिल्या आहेत.मात्र त्यांच्या राहण्याची सोय करण्याबाबत पर्याय शोधला नसल्याने निवासस्थाने खाली करण्यास पालिका कर्मचारी ,सफाई कामगार तयार नाहीत त्यामुळे पालिका आयुक्त, प्रशासन असमर्थ ठरल्याचे दिसून येत असून या ५२५ कुटूंबांना जीव मुठीत घेऊन राहावे लागत आहे.

शहरातील संगमपाडा येथील कर्मचारी वसाहतीत सुमारे १७२ कुटूंब आहेत, कोंबडपाडा (५६ कुटूंब), पद्मानगर (७२ कुटूंब), धामणकर नाका फायरब्रिगेड (१० कुटूंब), वाजामोहल्ला (३२ कुटूंब), वाटर सप्लाय (१० कुटूंब), कोटरगेट आझाद गार्डन (३२ कुटूंब), भैय्या साहेब आंबेडकर नगर (१२ कुटूंब), शिवाजीनगर भाजी मार्केट (४८ कुटूंब), मिल्लतनगर, कामतघर, पद्मानगर प्रेमाताई हॉल, भावना मंगल कार्यालय ताडाळी फेणे गाव, शास्त्रीनगर (१९ कुटूंब), अजय (१० कुटूंब), फायर ब्रिगेड कासार आळी (८ कुटूंब) अशी ४६ निवासस्थाने पालिका कार्यक्षेत्रात कर्मचाऱ्यांसाठी आहेत. ज्यात सुमारे शेकडो कर्मचारी व अधिकारी आजही राहत आहेत. विशेष म्हणजे यातील अनेक इमारती ३० ते ४० वर्ष जुनी असून सध्या त्यांची दुरावस्था झाली आहे. अडगळीच्या ठिकाणी असलेल्या या घरांची व इमारतींची अनेक आयुक्त व पालिकेच्या अधिकाऱ्यांनी पाहणी केली आहे. मात्र ते दुरुस्त करण्यास असमर्थ ठरल्याने या निवास्थानांची अवस्था दयनिय आहे. विशेष म्हणजे पालिका प्रशासनाने या इमारतींवर दुरुस्तीच्या नावावर कोट्यवधींचा खर्च देखील केला आहे. मात्र तरी देखील या इमारतींची आता दुरावस्था झाली आहे. बहुतांश ठिकाणी घरांचे प्लास्टर निघालेले आहे तर काही इमारतीवर झाडे उगवली आहेत. याबाबत रहिवासी कर्मचाऱ्यांनी पालिकेच्या बांधकाम व उद्यान विभागाकडे तक्रारी केल्या आहेत. मात्र ती झाडे काढली नाहीत. त्यामुळे इमारत कमकुवत झाली आहे अशी माहिती कामगार संघटनेचे कामगार, कर्मचारी संघर्ष कृती समितीचे महेंद्र कुंभारे, भानुदास भसाळे, श्रीपत तांबे, संतोष चव्हाण, भारत तांबे यांनी दिली आहे. विशेष म्हणजे यासंदर्भात पालिका आयुक्त व प्रशासनाकडे कृती समितीच्यावतीने वारंवार निवेदन देण्यात आले आहेत मात्र पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे अशी माहिती कृती समितीच्या सदस्यांकडून देण्यात आली आहे.

## लातूरात शेतकरी संघटनेने केली ...

खरिपाच्या पिकांना राष्ट्रीय आपत्ती कायदा कायद्यानुसार हेक्टरी ५० हजार रुपये भरपाई द्यावी तसेच कांदा निर्यातबंदीचा आदेश तात्काळ मागे घ्यावा, निर्यातबंदी कायमस्वरूपी उठवावी या मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले. शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष मदन सोमवंशी, युवा जिल्हाध्यक्ष रुपेश शंके यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनही देण्यात आले. या आंदोलनात माधवराव कंदे, माधवराव मल्लेशे, हरिश्चंद्र सलगरे, दत्तात्रय भोयबार, किशनराव शिंदे, बालाजी जाधव, अर्जुन कावळे, गुंडेराव उमाटे, सोपान सूर्यवंशी, रतन इंद्राळे, कालिदास भंडे यांच्यासह असंख्य शेतकऱ्यांनी सहभाग घेतला.

## ‘माझे कुटुंब माझी जबाबदारी’ मोहिमेअंतर्गत...

पथकांची आवश्यता आहे. त्यापैकी ६ हजार ७२१ पथके नेमण्यात आलेली आहेत. दररोज २ लाख १७ हजार ५९४ कुटुंबांना भेटी दिल्या आहेत. आज अखेर ही संख्या १० लाख ६४ हजार १४३ एवढी होते. भेटी दरम्यान १ हजार ४०३ तापाचे रुग्ण आढळले तर ३८ हजार ६५८ कोरोना सदृष्य आढळून आले आहेत. कोकण विभागात ६ हजार ७८० ऑक्सिमिटर आवश्यक आहे. त्यापैकी ६ हजार ४२० ऑक्सिमिटर उपलब्ध आहेत. ६ हजार ६६६ थर्मल स्कॅनरची आवश्यकता आहे. त्यापैकी ६ हजार ६०२ थर्मल स्कॅनर उपलब्ध आहेत. राज्यमंत्री, माहिती व जनसंपर्क आदिती तटकरे म्हणाल्या की, कोविड म्हणून बरे झालेले रुग्ण आणि त्यांची माहिती प्रसार माध्यमांद्वारे सर्वत्र प्रसिद्ध करावी. जनजागृती प्रचार प्रसिद्धीवर अधिक भर द्यावा. सर्हेम४ सर्वासाठी आहे. ही भावना सर्वत्र असावी, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. कोकण विभागात या मोहिमेसाठी स्वयंसेवक म्हणून राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, नेहरु युवा केंद्राचे युवक, स्पर्धापरिक्षेचा अभ्यास करणारे विद्यार्थी आणि स्वयंसेवी संस्था यांची मदत घेतली जात आहे. ‘माझे कुटुंब माझी जबाबदारी’ या मोहिमेअंतर्गत फ्लेक्स, बॅनर, वृत्तपत्र प्रसिध्दी आणि सोशल मिडियाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर व्यापक प्रसिध्दी करण्यात येत आहे. कोकण विभागात माझे कुटुंब माझी जबाबदारी’ या मोहिमेअंतर्गत घरोघरी जाऊन तपासणी, क्लोज कॉन्टॅक्टचा शोध आणि प्रभावी उपाययोजना यामुळे रुग्ण दूप्पटीचा वेग ५५ दिवसांवर आला असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. कोकण विभागात ‘माझे कुटुंब माझी जाबाबदारी’ मोहिमेअंतर्गत विविध नाविण्यपूर्ण उपक्रम राबविले गेले आहेत. त्यात पालघर जिल्हयात वारली पेंटिंग आणि वारली भाषेमध्ये प्रसिध्दी, सिंधुदूर्ग मध्ये दशावताराच्या माध्यमातून प्रसिध्दी, रत्नागिरी जिल्हयात गुडी महोत्सव आणि महापालिकेअंतर्गत ४० जाहिरात फलके, ५ कमाने, १०० बसस्टॉप आणि ७५ बसेसवर प्रसिध्दी करण्यात आली आहे. रायगड जिल्हयात पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांच्या संयुक्त पत्रकार परिषदा, कल्याण डोंबिवली महापालिकाअंतर्गत ऑनलाईन निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या बैठकीसाठी पालघर जिल्हाचे पालकमंत्री दादासाहेब भुसे, जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ वसई-विरार महानगरपालिका आयुक्त गंगाथरन डि., जिल्हा पोलीस अधिक्षक, दत्तात्रय शिंदे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, सी. सालीमठ जिल्हा शल्य चिकित्सक डॉ कांचन वानेरे तसेच जिल्हा कोरोना टास्क फोर्सचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## ‘माझे कुटुंब माझी जबाबदारी’ ॲपद्वारे ...

संख्या विवीध दुर्दर आजार या अँप द्वारे शासनापर्यंत जानार असुन कोविड-१९ विषयी विविध प्रकारचे मार्गदर्शन केले जाणार असल्याचे आरोग्य विभागाने ११ सप्टेंबर रोजी काढलेल्या शासन आदेशात सांगितले आहे. कोविड रुग्णांचे मृत्यू व बाधित संख्येमध्ये मागच्या काही दिवसापासून वाढ होताना दिसत आहे त्यामुळे यावर नियंत्रण आणण्यासाठी जनतेच्या सहभागाने माझे कुटुंब माझी जबाबदारी ही मोहीम राज्यभर दिनांक १५ सप्टेंबर ते २४ ऑक्टोंबर या कालावधीत सर्वत्र राबविले जाणार आहे या मोहिमेत शहर ,गाव, वाडी तांड्यावरील प्रत्येक व्यक्तीची आरोग्य तपासणी कोमाबर्डीक आजार असल्यास उपचार आणि प्रत्येक व्यक्तीला भेटून त्याची माहिती दिली जाणार आहे मोहीम राबविताना गृहभेटी देण्यासाठी आरोग्य पथके तयार केले आसुन अहमदपूर शहाराची शासनाने २०११ नुसार केलेल्या जनगनने नुसार ४४ हजार ५१६ लोकसंख्या असुन यासाठी एकुण १३ ग्रुपची नेमनुक करण्यात आली असुन अहमदपूर ग्रामीण भागाची एकुण संख्या २ लाख १८ हजार ३१३ असुन या साठी १५८ ग्रुप बनविण्यात आले असुन एका ग्रुप मधे तिन व्यक्ती असुन एकुण १७१ ग्रुप मधे ५१३ महीला व परुष असे संख्याबल आहे तसेच या ग्रुप मधे आरोग्य कर्मचारी, आशाताई, अंगणवाडी व शिक्षक यांचा समावेश असुन त्यांना तसे प्रशिक्षण देण्यात आले असुन एका दिवसात एका ग्रुपने ५० कुटुंबाना भेट द्यावी असे नियोजन आखन्यात आले असल्याची माहीती तहसीलदार सावंत यांनी दिली. अहमदपूर तालुक्यात एकुण ३२ जनांचा कोविड -१९ आजाराने मृत्यु झाला असुन यातील २८ जन हे आगोदरच दुर्दरआजारी होते तर होम कॉरनटाईन ४७, मरशिवणी कोविड सेंटर येथे ५० तर लातुर येथे ५८ रूग्ण उपचार घेत असुन ९७२ जनांची उपचार करुण घरी गेले आहेत तर आजतागत अहमदपुर ग्रामीण भागातीत ६९४ तर शहरीभागात ४६५ असे एकुण अहमदपुर तालुक्यात ११५९ रुग्ण संख्या होती.

# बिल्डरकडून खंडणी घेताना एमआयएमच्या जिल्हा अध्यक्षासह चौघांना पोलिसांनी केली अटक

**भिवंडी/अभिजित हिरे**

ठाणे गुन्हे अन्वेषण विभाग युनिट क्र. एकच्या पोलीस पथकाने स्थानिक शहर पोलिसांच्या मदतीने सापळा लावून भिवंडी एमआयएमचा जिल्हाध्यक्ष मोहम्मद खालिद मुख्तार अहमद शेख उर्फ खालिद गुड्डू (४८ रा. समदनगर) याच्यासह चार खंडणीखोरांना एका बांधकाम व्यवसायिकाकडून एक लाख रुपयांची खंडणी स्वीकारताना रंगेहात अटक केल्याची घटना समदनगर येथील मेहबूब बंगला येथे शुक्रवारी मध्यरात्री घडली आहे. या घटनेमुळे भिवंडीतील राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली असून खालिद गुड्डू याच्यासह त्याचे साथीदार ईफ्तेखार अहमद उर्फ बबलू मुक्तार शेख उर्फ कानिया (५० रा.समद नगर), फैज आलम नूर शेख (५० रा.गौरीपाडा), गुलाम मोहम्मद अब्दुल रजाक खान (५४ रा.रोशन बाग) या चौघांनाही पोलिसांनी अटक केली आहे.या चौघांनाही शुक्रवारी दुपारी भिवंडी न्यायालयात हजार केले असता न्यायालयाने त्यांना २ ऑक्टोबरपर्यंत सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या गंभीर गुन्ह्याचा पुढील तपास ठाणे गुन्हे अन्वेषण विभाग करीत आहे.तर आज या अटक कारवाई दरम्यान दुपारपर्यंत भिवंडी न्यायालय परिसरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आल्याने परिसराला पोलीस छावणीचे स्वरूप आले होते.

भिवंडी शहरातील बांधकाम व्यवसायिक तकविम उर्फ भुट्टू एजाज खान (४५, दर्गारोड, समरू बाग) याने सन २०१४ पासून दिवांशहा येथे रंगाडी या पाच मजली इमारतीचे बांधकाम हाती घेतले आहे. हे बांधकाम ट्रस्टच्या जागेवर असून ते अवैध आहे. त्यामुळे या बांधकामाची तक्रार पालिका प्रशासनाकडे करून बांधकाम तोडण्यास लावू अशी भीती दाखवून आम्हांला ५० लाख रुपये द्यावे लागतील अशी धमकी देऊन खंडणीखोरांनी २०१४ पासून ते आजपावेतो बिल्डर तकविम याच्याकडून २४ लाख आणि एक मोटार सायकल



उकळली आहे.त्यानंतर उरलेले पैसे लवकर दे नाहीतर गँगस्टर मुन्ना बजरंगीच्या टोळीकडून तुला ठार मारू अशी धमकी देण्यात आली.त्यामुळे भयभीत झालेल्या बिल्डर तकविम खान याने ठाणे गुन्हे शाखेच्या पथकाकडे याबाबत काही दिवसापूर्वी खालिद गुड्डू व त्याच्या साथीदारांविरोधात तक्रार दाखल केली होती.त्या तक्रारीनुसार गुन्हे शाखेच्या पथकाने स्थानिक पोलिसांच्या मदतीने आरोपी खालीद गुड्डू याचे भिवंडीतील समदनगर येथील मेहबूब बंगल्यासमोर रात्रीच्या सुमाराला सापळा रचला होता. त्यावेळी ईफ्तेकार याने बिल्डर तकविम यास त्याचा साथीदार साजीद मोहम्मद आरिफ मोमीन याच्या मदतीने हॉटेल इसरार येथून बंदुकीचा धाक दाखवून मोटार सायकलवर बसवून खालिद गुड्डू याच्या बंगल्यावर पाचव्या मजल्यावर जबरदस्तीने घेऊन गेले. या ठिकाणी खंडणी खोरांनी तकविम याच्याकडून एक लाख रुपये बळजबरीने काढून घेऊन त्याची आपसात वाटणी करून घेतली व बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या लोकांकडून पैसे वसूल करून दिल्यावर त्यातील अर्धे पैसे आम्हांला द्यावे लागतील अशी धमकी दिली.यावेळी खालीद गुड्डू व त्याच्या साथीदारांना तक्रारदार याच्याकडून एक लाख रुपये खंडणीची रक्कम स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले आहे.

यातील एक लाख रुपायांपैकी खालिद गुड्डू याच्याकडून ५४ हजार रुपये, गुलाम खानकडून २७ हजार, फैजकडून २७ हजार तर ईफ्तेकार याच्याकडून २५ हजार ८०० रुपये व ७५ हजार रुपये किंमतीचे पाच मोबाईल, आधार कार्ड व एक बंदूक जप्त करण्यात आली आहे.या प्रकरणी भिवंडी शहर पोलीसठाण्यात भादवि कलम ३६४ अ, ३८६, ३८७, ३४ आर्म कायदा ३, २५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास गुन्हे शाखा घटक क्र.१ हे करीत आहेत.

दरम्यान खालिद गुड्डू याच्यावर गुजरात, पुणे, अलिबाग व भिवंडी अशा विविध पोलीस ठाण्यांमध्ये एकूण २३ गुन्हे नोंद असल्याची माहिती भिवंडी पोलीस उपायुक्त राजकुमार शिंदे यांनी दिली आहे. तर खालिद गुड्डू यांनी मागील वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा देऊन भिवंडी पश्चिम विधानसभा मतदारसंघातुन एमआयएमच्यावतीने निवडणूक लढवली होती मात्र या निवडणुकीत त्याचा पराभव झाला होता.

## भिवंडीत जिलानी इमारत दुर्घटना शोधकार्य थांबले मात्र अडीच वर्षांच्या चिमुरड्याच्या शोधात शब्बीरची वणवण



**भिवंडी/प्रतिनिधी**

शहरातील धामणकर नाका परिसरात असलेल्या पटेल कंपाउंडमधील तीन मजली जिलानी इमारत कोसळल्याची दुर्घटना सोमवारी पहाटे तीन वाजेच्या सुमारास घडली होती. या दुर्घटनेत आतापर्यंत ३८ जणांचा बळी गेला असून २५ जण जखमी झाले आहेत. गुरुवारी तब्बल चार दिवसानंतर म्हणजेच सुमारे ८० तासानंतर शोध मोहीम थांबविण्यात आली आहे. या दुर्घटनेत शब्बीर कुरेशी यांनी आपल्या पत्नीसह दोन लहानगी मुले गमावली आहेत. मात्र अडीच वर्षाच्या मुसिफचा शोध शोधमोहीम थांबल्यानंतर देखील लागला नसल्याने शब्बीर मागील चार दिवसांपासून कोसळलेल्या इमारतीच्या ढिगाऱ्यात आपल्या मुलाला शोधत आहे. शब्बीर हा दुर्घटनाग्रस्त जिलानी इमारतीच्या पहिल्या माळ्यावर राहत होता. इमारत कोसळली त्याआधी शब्बीरने आपल्या आजूबाजूच्या नागरिकांना झोपेतून उठवले व बाहेर जाण्याचा सल्ला दिला. मात्र आपल्या परिवारातील त्यांची पत्नी व दोन मुलांना ते वाचवू शकले नाहीत याचे दुःख शब्बीर यांच्या मनात कायम सलत राहणार आहे. माझा अडीच वर्षाचा मुसिफ या दुर्घटनेत गेला आहे तो अजूनही सापडला नसल्याने मी शोध पथकाला त्याला शोधायला सांगितले. मात्र तो मिळाला नाही अखेर आज शोध मोहीम थांबलीय मात्र मी माझ्या चिमुरड्याची कायम वाट पाहत राहीन अशी भावना विवंश प्रतिक्रिया अडीच वर्षाच्या मुसिफचे वडील शब्बीर कुरेशी यांनी दिली आहे.

## शिवाजी नगर पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस उपनिरीक्षक राजेश घाडगे यांचे उत्कृष्ट कामगिरी!

**लातूर/करकरे अंबादास**

लातुरच्या एका खासगी रुग्णालयात उपचारा दरम्यान ७५ वर्षीय एका महिला रुग्णाचा मृत्यू झाला, निमोनिया आणि इतर आजारामूळे या आजीना रुग्णालयात भरती करण्यात आले होते. त्या त्यांच्या मुलीकडेच राहत होत्या असं सांगण्यात येत आहे, त्यांना मुलगा नाही नातेवाईकांनी २० हजार ऍडव्हान्स रक्कम भरली होती, मात्र हॉस्पिटलचे बिल झाले ४८ हजार एक तर मृत्यूचं दुःख आणि त्यात बिल भरण्याची परिस्थिती नाही. हॉस्पिटल बिल भरल्या शिवाय काही डेथबॉडी ताब्यात देईना या सगळ्यात नातेवाईक आणि हॉस्पिटल यांच्यात तणाव निर्माण झाला. मग काय हॉस्पिटल बाहेर गर्दी झाली, संघटना आली, कार्यकर्ते आले, कॅमेरा आला. आणि पोलीसही पोहचले कार्यकर्ते डॉक्टरांना चर्चेसाठी बाहेर या,बाहेर या, अश्या घोषणा देत होते. मात्र डॉक्टर यायला तयार नव्हते. अखेर सुट्टीवर असतानाही तिथे पोहचलेल्या पोलीस उपनिरीक्षक राजेश घाडगे यांनी परिस्थिती लक्षात घेऊन डॉक्टर आणि कार्यकर्त्यांशी सवांद सुरू केला, डॉक्टरांचं म्हणणे होते, आम्ही थोडं सहन करतो -तुम्ही थोडं सहन करा, उर्वरित डॉक्टरांची संघटना भरेल मात्र नातेवाईकांची पैसे भरण्याची परिस्थिती नव्हती. अश्यात पोलीस उपनिरीक्षक राजेश घाडगे यांनी पुढाकार घेतला, खिश्यातून दोन हजार रुपये काढत त्यांनी आपण ही मदत बिल भरण्यासाठी नातेवाईकांना देत असल्याचे



जमलेल्या लोकांना सांगितले. मग काय पोलिसांच्या या भूमिकेने उपस्थित कार्यकर्तेही पुढे आले. त्यांनीही जमेल तशी मदत द्यायला सुरुवात केली. प्रशांत चव्हाण २०००/- संजयकुमार सुरवसे ५००/- असे करता करता काही रक्कम जमा झाली.. त्यामुळे हॉस्पिटलचे २८ हजार पैकी १८ हजार ५००/- बिल अदा करता आले, आणखी दहा, अकरा हजार उरले ते भरण्याची हमी डॉक्टरांच्या संघटनेने दिली. त्यानंतर तणाव निवळला, नातेवाईकांना डेथबॉडी ताब्यात देण्यात आली. नातेवाईक, संघटनेचे कार्यकर्ते आणि हॉस्पिटलचे संचालक सगळे समाधानी झाले. पोलिसांची समयसुचकता आणि पुढाकाराने कितीही तणावाच्या परिस्थितीत कसा मार्ग निघू शकतो, याचंच हे उत्तम उदाहरण म्हणून लातुरच्या शिवाजी नगर पोलीस स्टेशनचे,पोलीस उपनिरीक्षक राजेश घाडगे यांचं अभिनंदन आणि ज्यांनी ज्यांनी या प्रसंगी सढळ हाताने मदत केली त्यांचही कौतुक, रुग्णहक्क संघर्ष समितीचे ऍड. निलेश करमुडी, सुहास कुलकर्णी आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांच सर्व स्तरातील नागरिकांतून करण्यात येत आहे.

## भिवंडी पालिका ऑनलाईन महासभेत आठ स्थायी समिती सदस्यांची निवड

**भिवंडी/अभिजित हिर**

भिवंडी महापालिकेतील स्थायी समितीची रचना लक्षात घेता स्थायी समितीच्या सोळा सदस्यांपैकी आठ सदस्य निवृत्त झाल्याने नव्या आठ सदस्यांच्या निवडी करीता विशेष महासभा ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आली होती. यावेळी पिठासिन अधिकारी म्हणून महापौर प्रतिभा विलास पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या महासभेत कोणार्क विकास आघाडी तर्फे विलास पाटील, भारतीय काँग्रेस पक्षातर्फे अरुण राऊत, मोहम्मद हलीम अन्सारी,आरिफ मोहम्मद हनीफ खान, प्रशांत अशोक लाड, डॉ. जुबेर अन्सारी, शिवसेनेतर्फे संजय म्हात्रे आणि वंदना मनोज काटेकर अशा नवीन आठ सदस्यांची निवड महासभेत करण्यात आली. पक्षीय बलाबल पाहता काँग्रेस पाच, शिवसेना दोन आणि कोणार्क विकास आघाडी एक सदस्यांची वर्णी लागली आहे. स्थायी समिती वरील आठ सदस्यांचा दोन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने काँग्रेसचे सिराज ताहीर मोमीन, मोहम्मद हलीम अन्सारी, अंजुम अहमद हुसैन सिद्दिकी, परवेज अहमद सिराज अहमद मोमीन, मोहम्मद वसीम अन्सारी, शिवसेनेचे बाळाराम चौधरी आणि मदन कृष्णा नाईक व कोणार्क विकास आघाडीचे विलास पाटील हे आठ सदस्य निवृत्त झाल्यामुळे या आठ सदस्यांच्या जागी नवीन आठ सदस्यांची निवड करण्यात आली. एकूण सोला सदस्य असलेल्या स्थायी समितीची रचना लक्षात घेता शिवसेना दोन सदस्य, भाजपा चार, कोणार्क विकास आघाडी दोन आणि भारतीय काँग्रेस पक्ष आठ असे पक्षीय बलाबल आहे. आजच्या ऑनलाईन महासभेत गटनेत्यांनी स्थायी समिती सदस्यांच्या नियुक्तीबाबत पिठासन अधिकारी यांच्याकडे सीलबंद लिफाफ्यात नाव दिली असता त्या शिफारशी नुसार नवीन स्थायी समिती सदस्यांची निवड करण्यात आल्याचे महापौर प्रतिभा पाटील यांनी महासभेत जाहीर केले. सर्व नवनिर्वाचित सदस्यांचे महापौर प्रतिभा पाटील, अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, उपमहापौर इम्रान खान यांनी अभिनंदन करून महासभेचे कामकाज तहकूब केले. या ऑनलाईन महासभेच्या सुरवातीला नुकताच भिवंडीत झालेल्या इमारत दुर्घटने बाबत नगरसेवकांनी या दुर्घटनेस प्रशासनाची कारवाई करण्यात केली जाणारी हयगय कारणीभूत असल्याचा आरोप केला, तर निलेश चौधरी यांनी या दुराघटनेस पालिका प्रशासनास जबाबदार धरून कारवाई करताना प्रशासन कोणाला तरी वाचवू पाहत असल्याचा आरोप केला आहे.

## एमपीडीए कायद्याची मोठी कारवाई; पाच जण स्थानबद्ध







दंगली घडवून आणणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई होणार

**जळगाव/क्राईम रिपोर्टर**

जळगाव जिल्ह्यातील रावेर हे तालुक्याचे ठिकाण असून जातीय दृष्टीने अतिशय संवेदनशील शहर म्हणून ओळखले जाते. या शहरात हिंदू मुस्लीम अशा दोन गटात नेहमीचे लहान मोठे वाद अथवा दंगलीचे गुन्हे होत असतात. या शहराला दंगलीची पार्श्वभूमी असल्याचे विविध घटनेतून वेळोवेळी दिसून आले आहे. रावेर शहराचा इतिहास व शासकीय अभिलेखाची पहाणी केली असता सन १९४६ साली जातीय दंगलीची पहिली घटना घडली असल्याची नोंद आढळून येते.

अशा संवेदनशील स्वरुपाच्या घटनांना तीव्र स्वरुपाचा आळा बसावा तसेच अशा दंगली घडवून आणणाऱ्या व्यक्तींवर कठोर स्वरुपाची कारवाई करुन रावेर शहरात शांतता नांदावी, तेथील नागरिकांनी सुखाने रहावे यासाठी पोलिस अधिक्षक डॉ. पंजाबराव उगले, अप्पर पोलिस अधिक्षक भाग्यश्री नवटके यांनी अधिकारी वर्गाला सुचना दिल्या होत्या. त्या सुचनांना अनुसरुन उप विभागीय पोलीस अधिकारी नरेंद्र पिंगळे, पो.नि.बापू रोहोम, पो.नि. रामदास वाकोडे, स.पो.नि.शितल नाईक, पो.उ.नि. संदिप पाटील, मनोज वाघमारे यांच्या अख्त्यारीत दत्तात्रय बडगुजर, किरण चौधरी, महेश महाजन, राजेंद्र करोडपती, विजय जावरे, नंदु महाजन, महेंद्र सुरवाडे, ज्ञानेश्वर चौधरी, तुषार मोरे, सुरेश मेढे, जितेंद्र पाटील, मंदार पाटील, पुरुषोत्तम पाटील, मनोज म्हस्के, निलेश लोहार, ईस्माईल शेख, भरत सोपे, नितीन डांबरे, जितेंद्र जैन आदी कर्मचारी वर्गाने परिश्रम घेत पाच जणांना एमपीडीए कायद्यानुसार ताब्यात घेण्याची कारवाई केली. ताब्यातील पाचही जणांना नाशीक येथील मध्यवर्ती कारागृहात एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले आहे.

मधुकर उर्फ मधु पैलवान रामभाऊ शिंदे (६२) रा. शिवाजीचौक रावेर, स्वप्नील मनोहर पाटील (महाजन) (२६) बक्षीपुर ता. रावेर, शे. मक्बुल अहमद शेख मोयीउद्दीन (५७) मन्यारवाडा रावेर, शे. कालु शेख नुरा (५३) मन्यारवाडा रावेर, आदिलखान उर्फ राजू बशिरखान (२२) फुकटपुरा रावेर अशी अटकेतील पाच जणांची नावे आहेत. या पाच जणांविरुद्ध दाखल असलेल्या सर्व गुन्ह्यांची माहिती संकलीत करण्यात आली. त्यांच्याविरुद्ध एमपीडीए कायद्यान्वये प्रस्ताव तयार करुन तो प्रस्ताव मंजुरीसाठी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांचे कडे सादर करण्यात आला होता.

जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी पाचही जणांना एक वर्षासाठी एमपीडीए कायद्यानुसार त्यांना स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले. त्यानुसार त्यांना तात्काळ विनाविलंब ताब्यात घेवून आज मध्यवर्ती कारागृह नाशिक येथे एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले. सदर प्रस्ताव करण्यासाठी पोलिस उप निरिक्षक संदिप पाटील (एमआयडीसी पोलिस स्टेशन) यांच्यासह कर्मचारी विजय जावरे व ज्ञानेश्वर चौधरी (रावेर पो.स्टे.) यांनी परिश्रम घेतले आहे. रावेर शहराची जातीय दंगलीची पार्श्वभुमी लक्षात घेता रावेर शहर अशांतता क्षेत्र घोषीत करण्याबाबत महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५१ नुसार शासनास अहवाल सादर करण्यात आला आहे.

क्राईम Reporter
औरंगाबाद, कोल्हापूर, सातारा, परभणी, जळगाव, सांगली आणि नवी मुंबई, पनवेल येथील बातम्या व गुन्हे कथा या क्रमांकावर पाठवा
9890718873

## थोडक्यात वृत्तांत

### आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

वसई : नालासोपारा पश्चिमेकडील परिसरात राहणाऱ्या ३३ वर्षीय महिलेने आत्महत्या केल्याप्रकरणी तिच्या नातेवाईकाने तक्रार दिल्यावर नालासोपारा पोलिसांनी बुधवारी दोघांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केले म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नालासोपारा पश्चिमेकडील श्रीप्रस्था परिसरातील बिल्डिंग नंबर ८५ मधील सदनिका नंबर ए/०३ मध्ये राहणाऱ्या जया राजकुमार शर्मा (३३) यांनी मंगळवारी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. सन २०१८ ते १५ सप्टेंबर २०२० यादरम्यान अली शेख याने पाहिले त्याचे लग्न झालेले असतानाही खोटे सांगून तिच्यासोबत लग्न करून राहत होता. तसेच आरोपी राजेश कपाडिया याच्यासोबत अनैतिक संबंध होते. राजेश आणि अली हे दोघे मित्र होते. ते दोघे जयाला जीवनातून निघून जाण्यास नेहमी सांगून मानसिक त्रास दिला. तर अलीने तू माझ्यावर खरे प्रेम करत असशील तर लटकून जीव देऊन दाखव असे वारंवार बोलून मानसिक त्रास देत आत्महत्येस प्रवृत्त केल्याने शेवटी दोघांना कंटाळून तिने आत्महत्या केली. हे दोघे तिच्या आत्महत्येस जवाबदार असल्याचे नातेवाईकाने बुधवारी नालासोपारा पोलीस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

### पतीने किरकोळ वादातून केली पत्नीची हत्या

भिवंडीः भिवंडी तालुक्यातील पुर्णा या गावात चाळीत राहणाऱ्या पतिपत्नी मध्ये झालेल्या भांडणात पतीने पहाटेच्या सुमारास लोखंडी पाईप डोक्यावर, तोंडावर, पायावर मारून गंभीर दुखापत करीत होत्या केल्याची घटना घडली आहे. कविता अशोक पांडव, वय २५ रा. अरुण टावरे चाळ, पुर्णा असे हत्या झालेल्या पत्नीचे नाव आहे. वरील ठिकाणी मयत कविता ही हमाली काम करणारा पती अशोक विष्णू पांडव वय ३४ या सोबत राहत होती, गुरुवारी पहाटे चार वाजताच्या सुमारास या पतिपत्नी मध्ये क्षुल्लक कारणावरून वाद होऊन तो विकोपास गेल्या नंतर संतप्त पती अशोक ने पत्नी कविता हिस लोखंडी पाईपने मारहाण करून तिची हत्या केल्यावर तो त्या ठिकाणा हुन पळून गेला या घटनेची माहिती कोणाला नसताना फरार झालेल्या अशोक याने पुणे येथील आपल्या नातेवाईकांस आपण केलेल्या कृत्याची माहिती दिली असता त्यांच्याकरवी ही बातमी नारपोली पोलिसांना समजली. या हत्येची माहिती समजताच नारपोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मालोजी शिंदे यांनी तातडीने पोलीस पथक घटनास्थळी रवाना केले असून पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी स्वर्गीय इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात रावण केला असून या प्रकरणी पोलिसांनी फरार पती अशोक पांडव या विरोधात हत्या केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

### खड्ड्याने घेतला आर्ट डायरेक्टरचा बळी

भिवंडी : भिवंडी- वसई रोडवरील कालवार गेट इथं पाऊस सुरु असल्याने रोडवरील खड्ड्यात पाणी साचल्याने दुचाकी आदळून दुभाजकाला आदळून अपघात झाल्याने आर्ट डायरेक्टर जागीच ठार झाला आहे. हर्ष विनोद सिंह (२६, रा.ठाणे) असे मृत्यू झालेल्या आर्ट डायरेक्टर नाव असून तो नायगाव इथं शूटिंगचे लोकेशन पाहण्यासाठी भिवंडी - वसई मार्गाने जात असताना खड्ड्यामुळे अपघात झाला. त्यामध्ये त्याचा मृत्यू झाला असून भोईवाडा पोलिसांनी नोंद केली असून माणकोली ते चिंचोटी रोड वर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने नाहक नागरिकांचे बळी जात आहे. मात्र टोल वसुली कायम असल्याने शासनाच्या विरोधात संताप व्यक्त करण्यात येत आहे.

### विना मास्क फिरणाऱ्यांवर कारवाई

ठाणे : ठाणे शहरातील करोनारुग्णांची वाढती संख्या चिंताजनक आहे. करोनावर नियंत्रण आणण्यासाठी पालिकेने आता सार्वजनिक ठिकाणी विनामास्क फिरणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उचलला आहे. सहा दिवसांपूर्वी सुरू केलेल्या या मोहिमेत ४४१ जणांवर कारवाई करत २ लाख २० हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तर नऊ प्रभाग समितींपैकी सर्वाधिक दंडवसुली नौपाडा-कोपरी आणि वर्तकनगर प्रभाग समितीमधून झाली आहे. गणेशोत्सवानंतर ठाण्यातील कमी झालेला करोनाबाधितांच्या आकड्याने पुन्हा उच्चांक गाठला. मात्र तरीही ठाण्यातील अनेक जण विनामास्क फिरत असल्यामुळे दिवसागणिक करोनाबाधितांच्या संख्येत भर पडत आहे. काही दिवसांपूर्वी महापालिकेने सार्वजनिक ठिकाणी, सरकारी कार्यालय या परिसरात अनेक व्यक्ती विना मास्क फिरत असल्याचे निदर्शनास आले होते. याच पार्श्वभूमीवर सहा दिवसांपूर्वी महापालिका आयुक्तांनी विना मास्क फिरणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. आदेशाच्या पहिल्याच दिवशी महापालिका हद्दीमध्ये विनामास्क सार्वजनिक ठिकाणी फिरणाऱ्या एकूण ११६ व्यक्तींवर दंडात्मक कारवाई करण्यात आली होती. तर या कारवाई अंतर्गत एकूण ५८ हजारांचा दंड वसूल करण्यात आला होता. गेल्या सहा दिवसांत एकूण ४४१ व्यक्तींवर कारवाई करण्यात आली असून २ लाख २० हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांच्या आदेशानुसार गेल्या सहा दिवसांपासून शहरातील सार्वजनिक ठिकाणी विना मास्क व्यक्तींवर कारवाई करण्यात येत आहे. यासाठी महापालिकेच्या वेगवेगळ्या विभागातील ४५हून अधिक कर्मचारी सार्वजनिक ठिकाणी विनामास्क व्यक्तींवर नजर ठेवून आहे, असे अशोक बुरपुल्ले, उपायुक्त, ठाणे महापालिका यांनी सांगितले.

### तलाठ्याची कॉलर पकडून धक्काबुक्की

नालासोपारा : शुक्रवारी सकाळी रेतीची चोरटी वाहतूक करणाऱ्या ट्रकवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या तलाठ्याला चौघांनी कॉलर पकडून धक्काबुक्की करत सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याची घटना घडली आहे. वालीव पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यावर सोमवारी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मुंबई अहमदाबाद महामार्गावरील मालजीपाडा गावाजवळील सातीवली खिंडीतून विनापरवाना रेतीची चोरटी वाहतूक करणाऱ्या ट्रकवर कारवाई करण्यासाठी तलाठी नामदेव पांडुरंग धूम (५६) गेले. ते कारवाई करत असताना चार चाकी गाडीतून चार जण आले व सरकारी कामात अडथळा निर्माण करून अश्लील शिवीगाळ आणि दमदाटी केली. तसेच रेतीने भरलेला ट्रक पळवून लावला. तलाठ्यांनी पाठलाग करून त्याला पकडले असता गाडीतून आलेल्या सागर पाटील यांनी त्यांच्या गाडीच्या समोर त्याची गाडी आडवी लावली. व गाडीतून आलेल्या दोघांनी परत रेतीचा ट्रक पळवून लावला आणि शर्टाची कॉलर पकडून धक्काबुक्की केली.

28 SEPTEMBER TO 04 OCTBER 2020 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 26/09/2020 8:09 PM Page 1



## भिवंडी पालिकेतील कर्मचाऱ्यांचे धोकादायक इमारतींमध्ये वास्तव्य
# ५२५ कर्मचारी कुटुंबावर टांगती तलवार




**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी शहरातील पटेल कंपाउंड येथे तीन मजली धोकादायक जिलानी इमारत कोसळल्याची घटना पाच दिवसांपूर्वीच घडली असून या दुर्घटनेत आतापर्यंत ३८ जणांचा मृत्यू तर २५ जण जखमी झाले आहेत. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींसह राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे तसेच मुंबई उच्च न्यायालयाने देखील या या दुर्घटनेची दखल घेतली आहे. मात्र भिवंडीतील अनधिकृत बांधकाम व अतिधोकादायक इमारतींमधील राहणाऱ्या रहिवाश्यांच्या निवाऱ्यासाठी कोणताही ठोस निर्णय शासन व पालिका स्तरावर घेतला जात नाही हे मोठे दुर्दैव आहे. भिवंडी पालिका प्रशासनाकडून शहरातील धोकादायक व अतिधोकादायक इमारतींना नोटीस देण्याचा दिखावा केला जातो मात्र पुढे काय ? हा प्रश्न अनुत्तरीतच राहत आहे.



त्यामुळे आजपर्यंत सुमारे ७८२अतिधोकादायक इमारती आजही उभ्या असून या इमारतींमध्ये आजही नागरिक मुठीत जीव धरून राहत आहेत.असे असतांनाच भिवंडी पालिकेच्या अखत्यारीत असलेल्या व पालिका कर्मचारी राहत असलेल्या अनेक इमारती देखील धोकादायक असून पालिकेचे कर्मचारी आजही या धोकादायक इमारतींमध्ये राहत आहेत.त्यामुळे जिलानी इमारत दुर्घटनेप्रमाणे पालिकेच्या कर्मचाऱ्यांची एखादी इमारत कोसळून मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही मात्र पालिका प्रशासन आपल्याच कर्मचाऱ्यांच्या जीवाशी खेळत असल्याने पालिका आयुक्त डॉ.पंकज आशिया हे आतातरी या धोकादायक इमारतींची व आपल्या कर्मचाऱ्यांच्या धोकादायक वास्तव्याची दखल घेतील का ? हाच प्रश्न पडला आहे.

शहरात पालिकेच्या अखत्यारीत असलेल्या कर्मचारी वसाहतींमधील अनेक इमारती आज धोकादायक आहेत.पालिकेचे सुमारे ५२५ कर्मचारी कुटूंब या धोकादायक इमारतींमध्ये वास्तव्यास आहेत. भिवंडी महापालिकेच्या प्रभाग समिती एक ते पाचमध्ये पालिकेचे कर्मचारी व अधिकाऱ्यांसाठी ...पान ६ वर

# लातूरात शेतकरी संघटनेने केली कांदा निर्यातबंदीच्या आदेशाची होळी



**लातूर/प्रतिनिधी**

अतिवृष्टीने झालेल्या खरीप पिकांच्या नुकसानीची भरपाई देण्याच्या मागणीसह कांदा निर्यातबंदीच्या विरोधात शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर राखरांगोळी आंदोलन करण्यात आले.यावेळी कांदा निर्यातबंदीच्या आदेशाची होळी करण्यात आली. यावर्षी वेळेवर झालेल्या पावसाने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. पीकही चांगले आले होते. परंतु निसर्गाने घात केला. काढणीस आलेले मूग व उडीद पावसामुळे वाया गेले. यासंदर्भात शेतकऱ्यांनी विमा कंपन्यांकडे तक्रारी केल्या परंतु वेळेत पंचनामे झाले नाहीत. आता सोयाबीन काढणीस आलेले असताना पावसामुळे त्याचेही नुकसान होत आहे. उभ्या सोयाबीनला मोड फुटत आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे पूर्ण नुकसान होत असले तरी अद्याप पंचनामेही सुरू झालेले नाहीत. यासंदर्भात प्रशासनाला जाणीव करून देण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. केंद्र सरकारने कांदा निर्यातबंदी करण्याचा निर्णय नुकताच घेतला आहे.यामुळे कांद्याच्या दरात २ हजार रुपयांपर्यंत घसरण झाली आहे. निर्यात सुरू राहिली तर शेतकऱ्यांच्या पदरी काही पैसे पडणार आहेत. त्यामुळे निर्यातबंदी मागे घेण्यात यावी अशी मागणी यावेळी करण्यात आली.सरकारच्या निर्यातबंदीच्या आदेशाची होळी करण्यात आली. ...पान ६ वर

# सकल धनगर समाजाच्या वतीने ढोल बजाव सरकार जगाव आंदोलन!



**लातूर/करकरे अंबादास**

दिनांक २६/०९/२०२० रोजी लातूर जिल्हाधिकारी कार्यालयावर सकल धनगर समाज घटनादत्त अनुसूचित जमातीच्या आरक्षण मागणीसाठी आंदोलन करण्यात आला होता. आणि अंमलबजावणीच्या मागणीसाठी आजवर अनेकदा अनेक सरकारांनी आश्वासने दिली गेली घटनेमध्ये ३४२ व्या कलमानुसार दिलेल्या अनुसूचित जमातीच्या आरक्षण यादीत स्पष्टपणे समावेश केलेला असताना केवळ धनगड हा अस्तित्वहीन समाज पुढे करून धनगर समाजावर अन्याय केला जात आहे. आपण यापूर्वी धनगर समाजाच्या मागणीची पूर्तता करण्याचे आश्वासन दिले आहे ते पूर्ण करावे ही विनंती या प्रमुख मागणीसह खालील मागण्या तात्काळ पूर्ण कराव्यात ही विनंती.

प्रमुख मागण्या धनगर समाजाच्या घटनादत्त अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची अध्यादेश काढून त्वरित अंमलबजावणी करावी. मुंबई उच्च न्यायालयात एसटी आरक्षणाची दाखल केलेली याचिका वेळ न लावता फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवावी. मागील सरकारने धनगरांसाठी जाहीर केलेल्या आदिवासींच्या सवलती त्वरित लागू करून मंजूर केलेल्या एक हजार कोटी रुपयांच्या निधीची तात्काळ तरतूद करावी. धनगर समाजातील मेंढपाळावर अलीकडे होत असलेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर मेंढपाळाच्या सुरक्षेसाठी कडक कायदे करून संरक्षण मिळावे. धनगर समाजाच्या घटनादत्त अनुसूचित जमातीच्या आरक्षण अंमलबजावनी होईपर्यंत कोणतीही सरकारी नोक भरती करू नये. सकल धनगर समाज, लातूर समन्वयक -अनिल गोयकर, देवा गडदे, राहुल पाटील, अतिश बैकरे, ॲड.विक्रम मदने, राजू काळे, सोमनाथ काळे, पप्पू सुरनर, अनिरुद्ध यचाळे, ॲड. प्रकाश काळे, अभिजीत मदने, गणेश सरवदे, रमेश सुरवसे, लालासाहेब डोलारे, अमोल घायाळ, अनिल पुजारी, दत्ता सरवदे, दिलीप गोटकें इत्यादी उपस्थित होते.

# भाजपा महीला आघाडी तालुका अध्यक्षपदी अंकिता दुबेले यांची निवड; कार्यकारिणी जाहीर




**वाडा/प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीच्या निष्ठावंत व सक्रिय कार्यकर्त्या अंकिता दुबेले यांची भाजपा महीला आघाडीच्या वाडा तालुका अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. यावेळी विविध आघाड्यांची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७०व्या वाढदिवस हा भाजपतर्फे राष्ट्रीय पातळीवर १४ ते २० सप्टेंबर पर्यंत सेवा सप्ताह म्हणून साजरा करण्यात येत आहे. या निमित्ताने वाडा तालुक्यात भाजपचे ज्येष्ठ नेते व ठाणे ग्रामीण जिल्ह्याचे प्रभारी बाबाजी काठोळे व जिल्हाध्यक्ष नंदकुमार पाटील यांच्या नेतृत्वाखालील विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याच अनुषंगाने प्लाझमा दान शिबीराचे आयोजन वाडा येथील जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात करण्यात आले होते. यावेळी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विषेश मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये मोजक्याच कार्यकर्त्यांच्या बैठकीत या विविध आघाड्यांची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

या बैठकीत सामाजिक अंतराचे पालन केल्याचे दिसून आले. अंकिता दुबेले या माजी पं.स वाडा सदस्या असुन त्यांनी महीला आघाडीच्या जिल्हा चिटणीस, तालुका उपाध्यक्ष, तालुका खजिनदार अशी विविध पदे भूषविली आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत ही निवड करण्यात आली आहे. तालूका सरचिटणीस - रोहन पाटील, राजेश रिकामे, चिटणीस नितीन घरत, कोषाध्यक्ष पंढरीनाथ घोडविदे, महीला आघाडी-अंकिता दुबेले, युवा मोर्चा- मोनिष पाटील, कृषीआघाडी- भालचंद्र कासार, ओबीसी आघाडी - कांतीलाल गोरे, दलित आघाडी- नितिन जाधव अल्पसंख्याक आघाडी- खलील मुल्ला कामगार आघाडी- भरत जाधव कायदा आघाडी- जितेंद्र गायकवाड शिक्षक प्रकोष्ठ आघाडी-जनार्दन भोईर आदी नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. यावेळी भाजपचे जेष्ठ नेते व ठाणे ग्रामीण जिल्ह्याचे प्रभारी बाबाजी काठोळे, जिल्हाध्यक्ष नंदकुमार पाटील,संघटन सरचिटणीस संतोष जनाठे, उपाध्यक्ष संदीप पवार, तालुकाध्यक्ष मंगेश पाटील, जेष्ठ नेत्या शुभांगी उत्तेकर, समीर पाटील, मनिष देहेरकर, रोहन पाटील, ड. संतोष डेंगाणे, कुणाल साळवी, आदी मान्यवरांच्या उपस्थितीत ही कार्यकारणी जाहीर करण्यात आली.

# 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' मोहिमेअंतर्गत कोकण विभागात १० लाख ६३ हजार १६३ कुटुंबांची पाहणी

## कोकण विभागाचे काम अव्वल-उध्दव ठाकरे



**पालघर/प्रतिनिधी**

कोकण विभागात 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' ही मोहीम गाव पातळीपर्यंत राबविण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. कोरोनाच्या समूळ उच्चाटनासाठी या योजनेचा निश्चित उपयोग होईल, असा विश्वास मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री यावेळी म्हणाले की,वैद्यकीय अधिकाऱ्यांना ट्रीटमेंट करताना काही अडचण असल्यास टास्क फोर्सशी सल्लामसलत करावी.ग्रामपंचायत पातळीवर अधिक लोक सहभागी होतील याकडे लक्ष द्यावे. प्रचार प्रसिद्धीसाठी विशेष प्रयत्न करावेत. आज कोकण विभागीय आयुक्त अण्णासाहेब मिसाळ आणि कोकणातील जिल्हाधिकारी यांच्याशी झालेल्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंगव्दारे घेतलेल्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. कोकण विभागात ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग या जिल्ह्यांमध्ये सरासरी २५ टक्के आरोग्य सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. या बाबात मुख्यमंत्री यांनी समाधान व्यक्त केले. स्थानिक पालिकेच्या माध्यमातून घरोघरी तपासणी, सर्वेक्षण आणि मार्गदर्शन करण्यात येत आहे. यासाठी संपूर्ण राज्यात ५५ हजार २६८ आरोग्य पथके तैनात करण्यात आली असून, काल अखेर ७०.७५ लाख कुटुंबांची तपासणी करण्यात आली आहे. यात २.८३ कोटी व्यक्तींची तपासणी झाली आहे. ३७ हजार ७३३ संशयितांपैकी ४ हजार ५१७ कोविड रुग्ण आढल्याची माहिती देण्यात आली. कोकण विभागात १ कोटी ९२ लाख ७२ हजार ०६५ लोकसंख्या असून, ४८ लाख ६६ हजार ३७२ कुटुंब संख्या आहे. यासाठी ७ हजार ४२५ ...पान ६ वर



**नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त दिव्यांगांना साहित्य वाटप**

**देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या सेवासाप्ताहा निमीत्त भाजपा पालघर जिल्ह्याच्या वतीने मनोर येथील दिव्यांगांना साहित्य वाटप करण्यात आले या प्रसंगी जिल्हा अध्यक्ष नंदकुमार पाटील, जेष्ठ नेते बाबाजी काठोले सरचिटणीस संतोष जनाठे, सुजित पाटील, प्रसिद्धी प्रमुख पुंडलीक भानुशाली, महिला आघाडी अध्यक्ष ज्योती भोये, उपाध्यक्ष प्रशांत पाटील, युवा मोर्चाचे अध्यक्ष समीर पाटील व सर्व मंडळ अध्यक्ष तसेच प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.**

# 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' ॲपद्वारे होणार अहमदपूरात कोविड विषयी जनजागृती




**अहमदपूर/फिरोज शेख**

सध्या संपुर्ण देशात कोविड संसर्गाने थैमान घातले आहे.त्यामुळे सर्व सामान्याचे जीवन विस्कळीत झाले, यावर शर्तीचे प्रयत्न सुरू आहेत राज्य शासनाच्या आरोग्य विभागाने जनजागृती करण्यासाठी 'माझे कुटुंब माझी जवाबदारी' हे ॲप तयार केले असुन अहमदपूर तालुक्यासाठी १७१ ग्रुप तयार केले असुन एका ग्रुप मधे तिन व्यक्ती व १० ग्रुप पाठीमागे एक डॉक्टर नेमनुक केली असुन २ लाख ६२ हजार ८२९ लोकसंख्या असलेल्या अहमदपूर तालुक्यातील नागरिकांना आरोग्य शिक्षण, टेंप्रेचर, spot व दुर्दर आजार तपासणी करुन गरज भासल्यास कोविड-१९ ची तपासनी व उपचार करण्यात येणार असल्याची माहीती तहसीलदार महेश सावंत, तालुका आरोग्य अधिकारी सुनिल दासरे व मुख्यअधिकारी त्र्यंबक कांबळे यांनी तालुक्यात राबविण्यात येत आसलेल्या माझे कुटूंब माझी जबाबदारी या मोहीमेच्या शुभारंभ प्रसंगी घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

शहर, गाव, वाडी - तांड्यावर ही मोहिम ॲप द्वारे राबवीण्यात येणार असुन प्रत्यक व्यक्तीच्या कुटुंब प्रमुखासह कुटूंब ...पान ६ वर

### आरोग्य विभागाच्या कार्यात सहभाग नोंदवावा

अहमदपूर तालुक्यातील प्रत्येक नागरिकांनी माझे कुटूंब माझी जबाबदारी या महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या माध्यमातुन सुरू करण्यात आलेल्या जनहिताच्या मोहिमेस साथ देऊन आपली योग्य माहीती निडरपने सांगणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी गाव, वाडी, वस्तीवरील नागरीकांनी आरोग्य विभागाच्या कार्यात आपला पुर्ण सहभाग नोदवून माझे कुटूंब माझी जबाबदारी ही मोहिम व्यापक करावी. या मोहिमेनुसार आपल्या सर्वांच्या आरोग्याची काळजी घेतली जाईल.

– महेश सावंत, तहसीलदार अहमदपूर

### कोविडमुक्त तालुक्यासाठी नागरीकांनी पुढे यावे

अहमदपूर तालुक्यात कोविड -१९ चा दररोजचा होणारा वाढता प्रसार लक्षात घेता महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाने सुरू केलेल्या माझे कुटूंब माझी जबाबदारी या मोहिमेत १७१ ग्रुप काम करणार असुन ते आपल्या घरापर्यंत येवुन आपनास आरोग्य शिक्षण, टेंप्रेचर व दुर्दर आजार ही माहीती देणार आहेत. त्यामुळे नागरीकांनी न घाबरता आपली व आपल्या कुटुंबातील सदस्यांची तपासणी करून घ्यावी व आरोग्य विभागाच्या मोहिमेला प्रतिसाद द्यावा. नागरीकांच्या आरोग्य तपासणीनंतरची उपलब्ध माहिती एकत्र करुन ती ॲप मधे संकलन करून त्यानुसार आपल्या परिवारातील व्यक्तींवर योग्य ते उपचार करण्यात येतील.

– सुनिल दासरे, तालुका आरोग्य अधिकारी, अहमदपूर

CMYK